## बीपीसीएल कंपनीत कामगाराचा मृत्यू

**रसायनी :** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीत काम करत असताना दुसऱ्या मजल्यावरून खाली पडून एकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपाळ रेवू चव्हाण (वय ६९, रा.दापिवली, वावेघर) हे बीपीसीएल कंपनीमध्ये काम करीत असताना अचानक दुसऱ्या मजल्यावरून खाली पडले. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यांना कामोठे येथील एमजीएम रूग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.


१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग


## डिझेल खरेदीवर सरकारची मर्यादा

**मुंबई :** जागतिक भू-राजकीय परिस्थिती, आंतरराष्ट्रीय पेट्रोलियम पुरवठा साखळीतील अडचणी आणि देशातील काही भागांत पेट्रोल-डिझेलच्या असामान्य खरेदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोटर स्पिरिट आणि हाय स्पीड डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे तात्पुरते नियमन) आदेश जारी केला आहे. पेट्रोल पंपावर एका वाहनाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल मिळणार आहे. हा आदेश ११ जून २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला असून •> पान २ वर


रायगड | शनिवार | दि. १३ जून २०२६ | अंक ७ | पृष्ठे १० | किंमत ४ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**पावसाळी हंगाम सुरु होण्याच्या वाटेवर आहे. जिल्ह्यात पाऊस कधीही कोसळण्याची शक्यता आहे. अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यामुळे रायगड जिल्ह्यातील ३९२ गावांना दरडीचा धोका निर्माण झाला आहे. अडीच लाख नागरिकांवर दरडीचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. दरडीपासून बचाव करण्यासाठी आपत्कालीन विभागाने कंबर कसली आहे. अपदा मित्रांसह रेस्क्यू टीम आदी यंत्रणाशी संवाद साधण्याचे काम करण्यात आले आहे.**

रायगड जिल्ह्यामध्ये यापुर्वी महाड व पोलादपूर तालुक्यात दरड कोसळून तीनशेहून अधिक जणांचा बळी गेला. काहीजण त्या दरडीखालीच दबले गेले. २०२१ मध्ये महाड येथील तळीये येथे झालेल्या दरडीत ८४ जणांचा मृत्यू झाला होता. २०२३ मध्ये १९ ते २० जूलै मध्यरात्रीच्या सुमारास इरसालवाडीत दरड कोसळली. या दरडीमध्ये अनेकांचा मृत्यू झाला. तर काही जण दरडीखाली दबून गेले. रायगड जिल्ह्यामध्ये दरड कोसळण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. डोंगर भागाजवळील नागरिकांना जीव मुठीत घेऊन राहण्याची वेळ आली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये पोलादपूरपासून पनवेलपर्यंत, कर्जत, •> पान २ वर

### गर्भवतींसाठी विशेष सुविधा

आपत्कालीन परिस्थितीत गर्भवती महिलांसाठी आरोग्य विभागामार्फत विशेष सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. प्रसुतीची तारीख जवळ आलेल्या गर्भवती मातांना आठ दिवस अगोदरच प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले जाणार आहे. त्यांची राहण्याची व जेवणाची मोफत सोयी केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. पुराच्या वेळेला अनेक गावांचा संपर्क तुटण्याचा धोका कायमच असतो. रुग्णांसह गरोदर मातांना दवाखान्यात पोहोचविणे कठीण होते. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आरोग्य विभागाने पाऊल उचलले आहे. पूरग्रस्त भागातील ज्या महिलांची प्रसुतीची तारीख जवळ आली असेल, त्या गर्भवती महिलांना आठ दिवस अगोदरच प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले जाणार आहे. त्यानुसार आरोग्य विभागाने नियोजन केले असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

# सीटच्या वादातून हल्ला

- प्रवाशाच्या पोटात चाकू खुपसला
- १२ तासांत गंभीर गुन्ह्याचा लावला छडा

**| कर्जत| प्रतिनिधी |**

मुंबईकरांची जीवनवाहिनी मानली जाणाऱ्या लोकलमधून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. यामुळे लोकलमध्ये नेहमीच प्रवाशांची मोठी गर्दी असल्यामुळे वादाच्या घटना घडतात. मात्र अशातच लोकलमध्ये दोन प्रवाशांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून चाकूहल्ला झाल्याची घटना घडली.

लोकलमध्ये सीटवर बसण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रौद्र रूपांतर झाले. ज्यामध्ये हाणामारीनंतर प्रवाशावर चाकूने हल्ला करण्यात आला. या घटनेप्रकरणी कर्जत रेल्वे पोलिसांनी अवघ्या १२ तासांत गंभीर गुन्ह्याचा छडा लावला आहे. ज्यामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आली असून एकजण फरार आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

फिर्यादी, सतीश कुमार बोलामनी पाठक हे गुरुवारी (दि.११) सकाळी ६ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास खोपोली लोकलच्या लगेज डब्यातून प्रवास करत होते. यावेळी लोकल वांगणी रेल्वे स्थानक पार केल्यानंतर सीटवर बसण्याच्या कारणावरून त्यांचा काही तरुणांशी वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर आरोपींनी पाठक यांच्या पोटात चाकूने वार करत त्यांना मारहाण आणि शिवीगाळ केली.या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक प्रविण कड व गुन्हे तपास पथकाने तातडीने तपास सुरू केला. यावेळी पोलिसांनी उल्हासनगर, शेलू आणि नेरळ रेल्वे स्थानकांसह शहरातील विविध सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. या घटनेनंतर कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी इब्रान इद्रिस अन्सारी आणि करण कन्हैयालाल अग्रवाल या दोघांना ममदापूर परिसरातून ताब्यात घेत अटक करण्यात आली. तसेच या गुन्ह्यातील तिसरा आरोपी सिद्धार्थ गायकवाड फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

### ट्रेनमध्ये दादागिरी

लोकल ट्रेनमध्ये जागा पकडण्याची पद्धत आता जीवघेणी बनत चालली आहे. लोकलचे शेवटचे ठिकाण असणाऱ्या ठिकाणी ग्रुप बनले जातात. या ग्रुपमधील असणाऱ्या प्रवाशांना त्या डब्यात बसायला जागा मिळते. त्या डब्यात त्या ग्रुपची दादागिरी असते. त्यामधूनच जागा पकडण्यावरून वाद होत असतात. हे वाद मिटवणे सुरक्षा यंत्रणांना न जमणारे आहे. वडिलोपार्जित जागेचा वाद होण्याचे प्रकार घडतात. आता प्रवासात जागा मिळवण्यावरून वाद होत आहेत. हे वाद शाब्दीक चकमकीवरून हाणामारी आणि शस्त्रांची लढाई बनत आहेत.

## वेधक

### मोटर वाहन निरीक्षकास धक्काबुक्की

**नवीन पनवेल :** मोटार वाहन निरीक्षकावर शासकीय कर्तव्य बजावत असताना धक्काबुक्की, शिवीगाळ आणि धमकी दिल्याची गंभीर घटना तळोजा एमआयडीसी परिसरात घडली आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना येथे कार्यरत असलेले अविनाश पाटील हे महाराष्ट्र राज्य परिवहन आयुक्त आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या आदेशानुसार सध्या प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे विशेष तपासणीसाठी नियुक्त आहेत. १० जून रोजी तळोजा एमआयडीसी परिसरात वाहन तपासणी सुरू असताना (एम एच ४६ एफ २६४२) वाहन ओव्हरलोड वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान •> पान २ वर

### प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय

**मुंबई :** यंदा केरळमध्ये मान्सून उशिराने दाखल झाला. देशाच्या ईशान्यकडे मान्सूनची वाटचाल सुरू असली तरीही महाराष्ट्रात त्याची वाटचाल सध्या स्थिर असून काहीशी संथ गतीने सुरू आहे. सध्या राज्यात उन्हाचा तडाखा वाढण्याचा अंदाज आहे. हवामानात झपाट्याने बदल होत असतानाच प्रशांत महासागरात एल निनो स्थिती विकसित झाल्याची घोषणा अमेरिकेतील हवामान संस्थेने केली आहे. एल निनो स्थितीमुळे जगभरात हवामान बदलाचे परिणाम तीव्र होण्याचा अंदाज आहे.

मागील काही महिन्यांपासून प्रशांत महासागरात जून महिन्यात एल निनो स्थिती विकसित होईल, असा अंदाज जगभरातील हवामान संस्थांनी व्यक्त केला होता. त्यानुसार, ही स्थिती विकसित होण्यास सुरुवात झाल्याची माहिती •> पान २ वर

### सेलिब्रेशन रिसॉर्ट प्रकरण

# आरोपीकडून अटी-शर्थींचे उल्लंघन

**जामीन रद्द करण्यासाठी पोलिसांचा न्यायालयात पत्रव्यवहार**

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील बोरगाव हद्दीतील बहुचर्चित सेलिब्रेशन रिसॉर्ट प्रकरणात आता नवे वळण आले आहे. २३ मार्च रोजी पेण पोलिसांनी या रिसॉर्टवर छापा टाकून कथित कुंटणखाना उघडकीस आणला होता. या कारवाईत तीन महिलांची सुटका करण्यात आली होती, तर घटनास्थळावरून चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

या प्रकरणातील आरोपींच्या चौकशीतून रिसॉर्ट मालक गणेश गायकर, गणेश अण्णा, राजू मंडळ आणि सुरेश मेहता यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित आरोपी फरार होते. त्यानंतर गणेश गायकर, गणेश अण्णा आणि राजू मंडळ यांनी अलिबाग सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता; मात्र न्यायालयाने तो अर्ज फेटाळून लावला.यानंतर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. यामध्ये राजू मंडळ यांचा जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केला, तर गणेश गायकर यांना काही अटी व शर्तींवर जामीन मंजूर करण्यात आला.




मात्र, उच्च न्यायालयाने जामीन मंजूर करताना घातलेल्या महत्त्वाच्या अटींपैकी एक अट म्हणजे सेलिब्रेशन रिसॉर्ट संदर्भातील कराराची प्रत १२ मे २०२६ पर्यंत पेण पोलीस ठाण्यात जमा करणे ही होती. परंतु मुदत उलटून गेल्यानंतरही संबंधित कराराची प्रत पोलिसांकडे जमा करण्यात आली नसल्याचा दावा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर गणेश गायकर यांनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप होत असून, पेण पोलिसांनी १४ मे रोजी न्यायालयाकडे पत्रव्यवहार करून त्यांचा जामीन रद्द करण्याची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे.

# लिफ्टमध्ये अडकलेल्या चौघांची सुटका

- कुटुंबीयांनी प्रशासनाचे मानले आभार
- अग्निशमन दलाने केले यशस्वी प्रयत्न

**| पनवेल | वार्ताहर |**

खारघर सेक्टर ३४ बी, ट्युलिप को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीमध्ये एका इमारतीच्या लिफ्टमध्ये चार तरुण-तरुणी अडकल्याची घटना घडली. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे ही लिफ्ट चौथ्या मजल्यावर अडकली होती. मात्र, सिडको अग्निशमन केंद्र खारघरच्या जवानांनी तत्परता दाखवत तब्बल दीड तासांपासून अडकलेल्या या सर्वांची सुखरूप सुटका केली.

मिळालेल्या माहितीनुसार, खारघर-तळोजा जेल रोड परिसरातील ट्युलिप सोसायटीमधील वीज अचानक खंडीत झाली. याच दरम्यान इमारतीच्या लिफ्टमधून प्रवास करणारे २ तरुण आणि २ तरुणी लिफ्ट अचानक बंद पडल्याने चौथ्या मजल्यावर अडकले. या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलीस स्टेशनचे कर्मचारी दांडेकर व त्यांचे सहकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन केंद्राला दुपारी ४:२५ वाजता या घटनेची रेस्क्यू वर्दी (कॉल) मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून अवघ्या एका मिनिटात, म्हणजेच ४:२६ वाजता अग्निशमन वाहन केंद्रातून रवाना झाले आणि ४:३५ वाजता घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी उपस्थित पोलीस कर्मचाऱ्यांनी जवानांना परिस्थितीची कल्पना दिली. सोसायटीत लाईट नसून मुले चौथ्या मजल्यावर अडकल्याचे त्यांनी सांगितले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ कारवाई करत त्यांच्याकडील रेस्क्यू टूलमधील कटवणी आणि स्प्रेडरच्या सहाय्याने लिफ्टचा दरवाजा यशस्वीपणे उघडला. लिफ्ट उघडताच आतमध्ये सुमारे १ ते दीड तासांपासून अडकून पडलेल्या चारही जणांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. वेळेवर मदत मिळाल्याने या तरुणांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सुटकेचा श्वास सोडला आणि प्रशासनाचे आभार मानले.



या यशस्वी रेस्क्यू ऑपरेशनमध्ये सिडको अग्निशमन केंद्र खारघरचे अग्निशमन प्रणेता प्रशांत दरेकर, ड्रायव्हर ऑपरेटर दीपक पाटील, आणि फायरमन गुरुनाथ तांडेल, केतन पाटील, विकास सूर्यवंशी व कुणाल पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# रेवदंडा-अलिबागच्या वीज समस्यांवर मुंबईत खल



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा तसेच अलिबाग परिसरातील नागरिकांना अखंड आणि सुरळीत वीजपुरवठा मिळावा, •> पान २ वर

> ग्रामस्थांच्या वीज समस्यांबाबत आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. रेवदंडा व अलिबाग परिसरातील नागरिकांना अखंड आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच त्याचे परिणाम दिसून येतील.
>
> – संतोष उर्फ बाबू मोरे, उपसरपंच, रेवदंडा ग्रामपंचायत.

# पेणच्या दीपक कला केंद्रातून बाप्पांची परदेशवारी

**युद्धजन्य परिस्थितीचा व्यवसायावर परिणाम**

**| पेण | प्रतिनिधी |**

गणेशमूर्तींसाठी जगभरात प्रसिद्ध असलेल्या पेण नगरीतील कासारळी येथील दीपक कला केंद्रातून यंदाही गणरायाच्या मूर्ती परदेशातील भाविकांसाठी रवाना झाल्या आहेत. दुबई, कॅनडा, अमेरिका (यूएसए), ऑस्ट्रेलिया यांसह विविध देशांमध्ये पेणच्या बाप्पांची मागणी कायम असून, यावर्षी या कला केंद्रातून जवळपास १५ ते १७ हजार गणेशमूर्ती परदेशात पाठवण्यात आल्या आहेत.





पेणच्या गणेशमूर्तींना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरातील मराठी आणि भारतीय समुदायाकडून मोठी मागणी असते. दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यापर्यंत परदेशातील गणेशमूर्तींच्या बुकिंगला सुरुवात होते आणि फेब्रुवारी-मार्च महिन्यात मूर्ती परदेशात पाठवण्याची प्रक्रिया सुरू होते. मात्र यंदा जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थिती आणि निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे या प्रक्रियेला विलंब झाला.

अनेक भाविकांनी यंदा मूर्ती घेण्याचे प्रमाण काहीसे कमी केल्याचे दिसून येत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय वाहतूक, खर्च आणि परिस्थितीचा थेट परिणाम मूर्तींच्या मागणीवर जाणवत असल्याचे सांगण्यात येत आहे.

याबाबत दीपक कला केंद्राच्या धनश्री सचिन समेळ यांनी आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना सांगितले की, दरवर्षी ठरलेल्या वेळेत परदेशातील बुकिंग पूर्ण होते आणि त्यानुसार मूर्ती रवाना केल्या जातात. मात्र यंदा परिस्थिती वेगळी असल्यामुळे बुकिंगला उशीर झाला. तरीही पेणच्या गणेशमूर्तींवरील भाविकांचा विश्वास कायम असून मोठ्या प्रमाणात बाप्पा परदेशात रवाना झाले आहेत.

**टोकेखार-तुरुंवाडी पूल वेगाने उभारणीच्या मार्गावर** | **कोकण पर्यटनाला मिळणार नवी चालना**

# सागरी महामार्गाचे स्वप्न साकार होणार

**सुधीर नाझरे**

**| मुरुड-जंजिरा |**

कोकणातील सागरी महामार्गाचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. माजी मुख्यमंत्री स्व. बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी मांडलेली ही संकल्पना लवकरच पूर्णत्वास जाणार असून या महामार्गावरील महत्त्वाचा दुवा ठरणाऱ्या टोकेखार ते तुरुंवाडी पुलाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. हा पूल मुरुड आणि श्रीवर्धन तालुक्यांना जोडणार असून परिसराच्या विकासाला नवी दिशा देणार आहे.



समुद्रावर उभारला जाणारा हा पूल अभियांत्रिकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना टेकड्या असल्याने समुद्रातील खांबांची उंची वाढविण्यात आली आहे. त्यामुळे या पुलावरून प्रवास करताना पर्यटकांना समुद्राच्या सान्निध्यातून अनोखा अनुभव मिळणार आहे. सागरी महामार्गातील करंजा-रेवस आणि टोकेखार-तुरुंवाडी हे दोन टप्पे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. या पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबईहून श्रीवर्धनपर्यंतचा प्रवास दोन तासांत शक्य होणार असून पर्यटकांना किनारपट्टीवरील निसर्गसौंदर्याचा आनंद घेत •> पान २ वर

# अवचितगड रहाल परिसरात तोफेचा शोध

**विश्वास निकम**

**| कोलाड |**

बा रायगड परिवार तसेच शिवशंभू प्रतिष्ठान तर्फे गेली दोन दिवस अवचितगड रहाल परिसरात भटकंती आणि शोधमोहीम करत असताना एक तोफ निदर्शनास आली. या शोध मोहिमेत उपस्थित मावळे सौरभ घरट (रेवोली), मनोज थिटे (पोलीस पाटील बाहे), संस्कार घरट (रेवोली), आर्यन काशीद (रेवोली), रोहन शेलार (रेवोली) उपस्थित होते.



शोधमोहिमेत सापडलेली तोफ पूर्णपणे नामशेष •> पान २ वर




# जेएनपीए प्रशासनाविरोधात रांजणपाडा पेटले

## ● रहिवासी जमीन औद्योगिक क्षेत्रात बदलण्यास भूमिपुत्रांचा तीव्र विरोध

**। उरण । प्रतिनिधी ।**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने उरण तालुक्यातील रांजनपाडा जासई (सेक्टर-११) येथील रहिवासी वापरासाठी आरक्षित असलेली तब्बल ५१.७४ एकर (२०.९४ हेक्टर) जमीन औद्योगिक क्षेत्रात बदलण्याचा घाट घातला आहे. प्रशासनाच्या या मनमानी आणि अन्यायकारक प्रस्तावाविरोधात स्थानिक भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त आणि ग्रामस्थ कमालीचे संतप्त झाले असून उरणमध्ये पुन्हा एकदा संघर्षाची ठिणगी पडली आहे.



ग्रामस्थ मंडळ रांजनपाडा यांच्या वतीने जेएनपीए प्रशासनाला कायदेशीर कलमांचा आधार घेत तीव्र जाहीर हरकत व आक्षेप पत्र पाठवण्यात आले असून हा प्रस्ताव त्वरित रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.४५ वर्षांच्या ऐतिहासिक कराराचे उल्लंघन आणि फसवणुकीचा आरोप करत ग्राम स्थांनी प्रशासनाला थेट कायदेशीर आणि नैतिक सवाल केला आहे.

उरणच्या भूमिपुत्रांनी आपल्या जमिनी दिल्यानंतर, दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील साहेबांच्या नेतृत्वाखाली साडेबारा टक्के (१२.५%) विकसित भूखंडांची ऐतिहासिक मागणी केली होती. त्यावेळी जेएनपीटी प्रशासनाने जमीन कमी आहे, असे अधिकृत लेखी कारण पुढे करून प्रकल्पग्रस्तांचे हक्काचे प्लॉट २५ टक्क्यांनी कमी केले होते.आता ग्रामस्थांचा रोकडा सवाल आहे की, जर आज सेक्टर-११ मध्ये तब्बल ५१.७४ एकर जमीन उपलब्ध आहे, तर मग तेव्हा जमीन कमी असल्याचे खोटे कारण सांगून भूमिपुत्रांची फसवणूक का करण्यात आली? प्रशासनाने या कायदेशीर तत्त्वाचा स्पष्ट भंग केला असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सदर निर्णयामुळे आरोग्य आणि पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र हे थेट रहिवासी वस्तीच्या लागून येणार आहे. यामुळे होणारे वायू, जल आणि ध्वनी प्रदूषण थेट मानवी वस्तीवर आघात करेल. हा निर्णय नागरिकांच्या संविधानाच्या अनुच्छेद २१चे उघड उल्लंघन करणारा आहे. या परिसराजवळ आधीच बेकायदेशीर डंपिंग आणि वाढत्या औद्योगिकीकरणामुळे निसर्गाचा प्रचंड ऱ्हास झाला आहे. पर्यावरण कायद्याचा दाखला देत ग्रामस्थांनी या जागतिक नियमांची प्रशासनाकडून सर्रास पायमल्ली होत असल्याचे निदर्शनास आणले आहे.यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघातांची भीती निर्माण झाली आहे. या ५१ एकर क्षेत्रफळावर औद्योगिक कारखाने आल्यास अंतर्गत रस्त्यांवर दररोज शेकडो डंपर, कंटेनर्स आणि अवजड वाहनांची वर्दळ वाढेल. परिणामी अंतर्गत रस्त्यांवर मोठी वाहतूक कोंडी होऊन शाळकरी मुले, महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या अपघातांचा धोका कमालीचा वाढेल आणि सार्वजनिक सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होईल, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

सचिव मनीषा जाधव यांच्याशी चर्चा झाली तेंव्हा ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.या गंभीर विषयावर रांजनपाडा गावातील प्रमुख शिष्टमंडळाने सचिव मनीषा जाधव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली.

या महत्त्वपूर्ण चर्चेप्रसंगी गावातील प्रमुख मान्यवर आणि रमाकांत म्हात्रे, मुरलीधर ठाकूर, अलंकार कडू, सुदर्शन पाटील, सुरेश पाटील, प्रविण नाईक, विजय नाईक, तेजस पाटील, माधव पाटील आणि संतोष ठाकूर उपस्थित होते.

# कर्जत-मुरबाड मार्गावर कंटेनर पलटी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत-मुरबाड मार्गावरील पिंगळेवाडी गावासमोरील वळणावर मालवाहू कंटेनर पलटी होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी मध्यरात्री घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत कर्जत पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद घेण्यात आलेली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हरियाणा राज्यातील मेवात जिल्ह्यातील रहिवासी तौफिक सिकंदर हे पुष्पक फ्रेट कॅरिअर ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये चालक

### चालकाचा मृत्यू

म्हणून कार्यरत होते. ते आयसर प्रो ५०१९ कंपनीचा कंटेनर (सीजी-०४ एमझेड-८२४५) घेऊन खालापूर येथील स्काय बॉल वेअरहाऊसमधून कोल्ड्रिंक्सच्या रिकाम्या बाटल्या इंदोरकडे घेऊन जात होते. गुरुवारी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास पिंगळेवाडी गावासमोरील तीव्र वळणावर कंटेनरवरील नियंत्रण सुटले.

वाहनाने रस्त्यालगतच्या संरक्षक कट्ट्याला जोरदार धडक दिल्यानंतर कट्टा तोडून खोल खड्ड्यात पलटी घेतली. या भीषण अपघातात चालक तौफिक सिकंदर यांच्या डोक्याला, छातीला व तोंडाला गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी त्यांना तातडीने कर्जत ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी ट्रान्सपोर्ट कंपनीचे व्यवस्थापक अख्तर महेबुब शेख यांच्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अपघाताच्या कारणांचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# डॉ. विजय कोकणे पुरस्काराने सन्मानित

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांना नॅशनल वर्क वेलनेस रेकग्नेशन हबच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारत गौरव सन्मान २०२६ घोषित करण्यात आला आहे. कौशल्य विकास, जनजागृती प्रबोधन पर लेखन व समाजसेवा कार्यासाठी




त्यांना हा राष्ट्रीय सन्मान पुरस्कार घोषित करण्यात आला आहे

ह्यूमन कॅपॅसिटी डेव्हलपमेंट ट्रेनिंग सर्व्हिसेसचे संचालक हिरामण कोकणे व समाजसेविका सुमन कोकणे ह्यांचे डॉ. विजय कोकणे हे चिरंजीव आहेत ही विशेष नमूद करण्यासारखी बाब आहे. त्यांच्या डॉ. मेधा सोमैया, डॉ. नितीन गांधी, नरेन जाधव यांच्या प्रदीर्घ मार्गदर्शनाखाली डॉ. विजय कोकणे हे सातत्याने प्रगती करीत आहेत.

# न्हावे गावात भीषण पाणीटंचाई

## ● १५ दिवसांनी अवघ्या ३० मिनिटांचा पाणीपुरवठा; ग्रामस्थ संतप्त

**। उरण । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील न्हावे गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे.

गावात ग्रामपंचायतीमार्फत तब्बल १४ ते १५ दिवसांनी केवळ ३० मिनिटांसाठी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवावा, अशी मागणी ग्रामसुधारक मंडळ न्हावे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी केली आहे.

योगेश पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरापासून गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना पाणी साठवून ठेवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. अनेक कुटुंबांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचे हाल होत आहेत.

गावातील मुख्य जलवाहिनीवरून काही व्यक्तींनी अनधिकृत जोडण्या घेऊन पाणीचोरी सुरू ठेवल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी बेकायदेशीर जोडण्या तोडण्यात आल्या होत्या. मात्र त्या पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत असल्याने पाणीचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या प्रकारामुळे अधिकृत ग्राहकांना मिळणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात मोठी घट होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

योगेश कुंडलिक पाटील यांनी सांगितले की, गावातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी सिडको प्रशासन, संबंधित शासकीय विभाग आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

सध्याची परिस्थिती पाहता गावात तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच पाणीचोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशीही मागणी पुढे आली आहे.

पाणीपुरवठा अनियमित असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी साठवून ठेवावे लागत आहे. त्यामुळे पाणी दूषित होण्याचा धोका वाढला असून संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ पाणीपुरवठ्यापुरता मर्यादित नसून सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर विषय बनला आहे.

न्हावे गावातील नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. प्रशासनाने तातडीने पाणीचोरी रोखून टँकरची व्यवस्था करावी व दीर्घकालीन उपाययोजना जाहीर कराव्यात. अन्यथा ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,असा इशारा ग्रामसुधारक मंडळ न्हावे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी दिला आहे.

# ‘व्यासांचे महाभारत’ कादंबरीचे प्रकाशन

**पनवेल ग्रामीण :** ज्येष्ठ लेखक व संपादक कांतीलाल कडू लिखित व्यासांचे रहाभारत या महत्त्वाकांक्षी मराठी कादंबरीचा प्रकाशन सोहळा रविवारी, २१ जून रोजी सकाळी १०.३० वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात संपन्न होणार आहे. उत्तराखंड येथील ज्योतिष मठाचे शंकराचार्य वासुदेवानंद सरस्वती यांच्या हस्ते या कादंबरीचे प्रकाशन होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस असतील.५१२ पानांच्या या कादंबरीत महर्षी व्यासांच्या संपूर्ण जीवनाचा वेध घेत महाभारतातील विविध व्यक्तिरेखा, घटनाक्रम आणि तत्त्वज्ञान नव्या दृष्टिकोनातून उलगडण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ थांबवा!

**। उरण । प्रतिनिधी ।**

### ■ उरणमधील शाळांच्या वेळा तातडीने बदला

### ■ पालकवर्गाने केली मागणी

उरण तालुक्यात दिवसेंदिवस वाढणारी प्रचंड उष्णता, लांबलेला पाऊस आणि वाढते तापमान यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असतानाही प्रशासन मात्र हातावर हात धरून बसल्याचे चित्र आहे. सकाळीच उन्हाचे चटके बसू लागल्याने शाळेत जाणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ थांबवा आणि शाळांच्या वेळा तातडीने बदला, अशी संतप्त मागणी आता उरणमधील पालकवर्गातून जोर धरू लागली आहे.

उरण तालुक्यातील अनेक विद्यार्थी दररोज दूरवरच्या गावांमधून पायी, सायकलने किंवा बसने शाळेत ये-जा करतात. पहाटे घराबाहेर पडणाऱ्या या विद्यार्थ्यांना वाढत्या उष्णतेचा सामना करावा लागत आहे. सकाळीच तापमानाचा पारा चढू लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये चक्कर येणे, अशक्तपणा, उष्माघात, डिहायड्रेशन आणि इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती पालक व्यक्त करत आहेत.

शाळेत पोहोचण्यापूर्वीच अनेक विद्यार्थ्यांची अवस्था बिकट होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. तरीही शिक्षण विभाग आणि प्रशासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

यावर्षी मान्सून उशिरा दाखल होत असल्याने उष्णतेची तीव्रता आणखी वाढली आहे. हवामान विभागाकडूनही उष्णतेबाबत इशारे दिले जात असताना प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे एखादा अनुचित प्रकार घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल पालक उपस्थित करत आहेत.

उरण शहरासह ग्रामीण भागातील अनेक पालकांनी एकत्र येत शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना तातडीने हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थी हे भविष्यातील भारताचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या जीवाशी खेळ करून शिक्षणाचा दिखावा करण्यात अर्थ नाही, अशी तीव्र भावना पालक व्यक्त करत आहेत.

पान १ वरून

## २,५०,००० नागरिकांना दरडीचे संकट

रोहा, अलिबाग अशा अनेक ठिकाणी विकासाच्या नावाखाली डोंगरांचे खोदकाम करण्यात आले आहेत. स्थानिकांसह पर्यटकांचा डोंगर भागात फिरण्याचा आनंद नष्ट झाला आहे. डोंगराचे भाग ढिसूळ झाले आहेत. आहे. त्याचा परिणाम पावसाळ्यात अतिवृष्टीमध्ये होण्याची भिती निर्माण झाली आहे.

जमिनीची धुप होऊन दगड, माती व झाडे उन्मळून कोसळण्याच्या घटना घडण्याची भिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात पाऊस कधीही कोसळणार आहे. पावसाचा हंगाम सुरु होण्याच्या वाटेवर आहे. वादळी वाऱ्यासह अतिवृष्टीमुळे होणारी आपत्ती टाळण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. आपत्ती व्यवस्थापनाकडून आराखडा तयार करण्यात आला आहे. दरडग्रस्त भागांचे सर्वेक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि नागरिकांची सुरक्षितता यावर भर देण्यात आला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. रायगड जिल्ह्यातील १३ तालुक्यांत ३९२ दरडग्रस्त गावे आहेत.

या गावांमधील सुमारे अडीच लाख नागरिकांना दरडीचा धोका असण्याची शक्यता आहे. त्यात पोलादपूरमधील १३९, महाडमधील १२२, अलिबागमधील ९, कर्जतमधील ५, खालापूरमधील १२, तळामधील ३, पनवेलमधील ३, पेणमधील १३, रोहामधील २०, सुधागडमधील ९, म्हसळामधील १४, श्रीवर्धनमधील १२, मुरूडमधील ९ ,माणगांवमधील २२ गावांचा समावेश आहे. अलिबाग तालुक्यातील चिंचोटीसह, सोगाव आदीवासीवाडी, सागाव आदिवासीवाडी, वाडगाव, ताजपूर, जांभूळपाडा, वेलेटवाडी. रोहामधील किल्ले, खारगाव, तिसे, वाळुंजवाडी, कवळठे आदिवासीवाडी, वरसगाव मधली आळी, मेढा, घोसाळे, आरे बुद्रुक, संभे, नादवली, वावेखार, पाले खुर्दे, महादेववाडी, शेणवई आदीवासीवाडी, भागीरथी खार, कुंभोशी. मूरूडमधील सर्वे वावे, सावली, हिलसरडा सोसायटी, चेहेर, फोफळी, मिठेखार, राजपुरी, एकदरा या गावांसह वाड्यांचा समावेश आहे.

**दरडप्रवण गावांमध्ये उद्घोषणा प्रणाली**

भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात ३९२ दडरडग्रस्त गावे आहेत. दरडग्रस्त गावांची एकपासून पाचपर्यंत वर्गवारी करण्यात आली आहे. २४० गावांमध्ये सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली बसवण्यात आली आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातून एकाचवेळी हवामानाची पूर्व सूचना प्रसारित केली जाणार आहे. धोक्याच्या सूचनेसाठी सायरन वाजविले जाणार असल्याचे सांगण्यात आल आहे.

**६०० अपदा मित्रांची घेणार मदत**

आपत्कालीन परिस्थितीत स्थानिकांची मदत मिळावी म्हणून जिल्ह्यातील ६०० अपदा मित्र आणि सखींची मदत घेतली जाणार आहे. यांना प्रशिक्षण देण्यात आले असून शोध, बचावाचे कीट, ओळखपत्र आदी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

## मोटर वाहन निरीक्षकास धक्काबुक्की

वाहनाचा कर भरलेला नसल्याचे तसेच प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना आणि नॅशनल परमिट ऑथोरायझेशन यांची वैधता संपलेली असल्याचे आढळून आले. विविध कलमांनुसार संबंधित वाहनावर ई-चलान क्रमांक ५० हजार ५०० तडजोड शुल्काची कारवाई करण्यात आली.

दरम्यान, या कारवाईचा राग मनात धरून नितीन रॉय व त्याच्यासोबत असलेल्या एका अज्ञात व्यक्तीने मोटार वाहन निरीक्षक अविनाश पाटील यांच्या शासकीय कामात अडथळा आणल्याचा आरोप आहे. त्यांनी अधिकाऱ्याच्या अंगावर धावून जात धक्काबुक्की केली, अश्लील शिवीगाळ केली तसेच खोट्या ॲट्रॉसिटी प्रकरणात अडकवण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पाटील यांनी तात्काळ तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास तळोजा पोलीस ठाण्याकडून करण्यात येत आहे.

## प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय

अमेरिकेच्या नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन (नोआ) या संस्थेच्या क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरने (सीपीसी) गुरुवारी दिली. गेल्या काही महिन्यांत समुद्रपृष्ठ तापमानात मोठी वाढ झाली असून सध्या ते सरासरी तापमानाहून ०.५ अंश सेल्सिअसने अधिक आहे, असे निरीक्षणही हवामान अभ्यासकांनी नोंदविले आहे. सध्या विकसित झालेली एल निनो स्थिती डिसेंबर महिन्यापर्यंत अधिक तीव्र स्वरूपाची होईल, असाही अंदाज संस्थेने व्यक्त केला आहे. दरम्यान, मागील काही वर्षांच्या हवामान नोंदीचा विचार करता मागील ७६ वर्षांच्या नोंदींमधील यंदाची एल निनो स्थिती सर्वाधिक तीव्र असेल, अशी शक्यता ६३ टक्के इतकी आहे, असेही सीपीसीने अहवालात म्हटले आहे. मध्य ते पूर्व विषुववृत्तीय प्रशांत महासागराचे तापमान वाढेले असून यामुळे एल निनो स्थिती विकसित झाल्याचे निष्पन्न झाले. तसेच प्रशांत महासागरातील निनो ३.४ भागाचे तापमान सरासरीपेक्षा ०.५ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. याचबरोबर मध्य प्रशांत महासागरात जमिनीलगतच्या वातावरणात पश्चिमेकडून वाहणारे वारे आणि वातावरणाच्या वरच्या थरात पूर्वेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांच्या बदललेल्या गतीमुळे एल निनो सक्रिय झाल्याचे मानले जाते.

## डिझेल खरेदीवर सरकारची मर्यादा

तो तात्काळ लागू झाला आहे. पेट्रोल (मोटर स्पिरिट) आणि डिझेल (हाय स्पीड डिझेल) या अत्यावश्यक वस्तू असून मालवाहतूक, प्रवासी वाहतूक, शेतीची कामे, आपत्कालीन सेवा, राष्ट्रीय सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी त्यांचा अखंड पुरवठा आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या निरीक्षणानुसार, किरकोळ विक्री केंद्रांवरील (पेट्रोल पंपांवरील) आणि घाऊक विक्रीतील किंमतींमध्ये असलेल्या फरकामुळे अनेक औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहक मोठ्या प्रमाणात पेट्रोल पंपांवरून डिझेल खरेदी करत आहेत. यामुळे सामान्य ग्राहकांसाठी राखीव असलेला पुरवठा वळविला जात असून काही भागांत स्थानिक तुटवड्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच साठेबाजी, अनधिकृत विक्री आणि इतर गैरप्रकारांना चालना मिळण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

## अवचितगड रहाल परिसरात तोफेचा शोध

होण्याच्या मार्गावर होती. जी दगड मातीच्या ढिगाऱ्या खाली गाडली गेली होती. प्रथमतः तोफेच्या बाजूचा एक कान निदर्शनास आला. सर्वांनी हर हर महादेव अस जयघोष केला. शोधमोहीम यशस्वी झाल्याचा आनंद साजरा केला.

प्रथम तेथील झाडे, माती, पालापाचोळा, दगड बाजूला करून तोफ साफ करून वर काढली तर ही तोफ ४.५ ते ५ फूट लांबीची असून तोफेवर टि.डी अशी अक्षरे व त्याखाली तारीख किंवा तोफेचे वजन कोरलेले पहायला मिळाले. ही तोफ ब्रिटिश बनावटीमधील असून ती अवचितगडावरील दक्षिणेकडील बुरुजावरून खाली पडलेली असावी जी पिंगळसईकडील दक्षिण बुरुजाच्या खाली जी नाळ आहे, त्या नाळेत शोधमोहीम करीत असतांना आढळून आली.

ही बाब बा रायगड परिवार तसेच शिवसंभू प्रतिष्ठान यांनी पुरातत्व खाते, वनविभाग रोहा, रोहा पोलीस प्रशासन व तहसीलदार यांना पंचनामा करण्यासाठी कळवले आहे. लवकरच या तोफेला नवं संजीवन देऊन ती तोफ पुन्हा गडावर ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. या अगोदर बा रायगड परिवार तसेच शिवशंभू प्रतिष्ठान तर्फे १५ डिसेंबर २०१६ रोजी व ६ जुन २०२२ रोजी तोफांचा शोध लावण्यात आला आहे.

## सागरी महामार्गाचे स्वप्न साकार होणार

प्रवास करता येणार आहे. त्यामुळे कोकणातील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पुलाच्या दोन्ही बाजूंना जोडल्या जाणाऱ्या रस्त्यांसाठी काही जागांचे संपादन अद्याप प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. या कामात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी संबंधित पातळीवर प्रयत्न सुरू असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.

दरम्यान, पुलासाठी संपादित होणाऱ्या जमिनीबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी योग्य मोबदल्याची मागणी केली आहे. तसेच परिसरातील बेरोजगार तरुणांना या प्रकल्पामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. हा पूल पूर्ण झाल्यानंतर केवळ वाहतूक सुलभ होणार नाही, तर कोकणातील पर्यटन, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## रेवदंडा-अलिबागच्या वीज समस्यांवर मुंबईत खल

यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात असून याच अनुषंगाने १० जून रोजी मुंबई येथील भांडुप परिमंडळ महावितरण कार्यालयात विशेष बैठक पार पडली.

या बैठकीत महावितरणचे सहाय्यक महाव्यवस्थापक रहांगदले यांची भेट घेऊन रेवदंडा महावितरणचे उपअभियंता जितेंद्र पाटील आणि रेवदंडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच संतोष उर्फ बाबू मोरे यांनी रेवदंडा व अलिबाग परिसरातील वीजपुरवठ्याच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. बैठकीत विशेषतः पावसाळ्यात उद्भवणारे वीज खंडित होण्याचे प्रकार, जुन्या वीजवाहिन्यांची दुरुस्ती, तांत्रिक बिघाडांवर तातडीने उपाययोजना, झाडांच्या फांद्यांमुळे होणारे अडथळे, वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पायाभूत सुविधा आणि आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद यासंदर्भातील मुद्दे मांडण्यात आले. उपसरपंच संतोष मोरे यांनी रेवदंडा ग्रामस्थांच्या वतीने नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती देत, वीजपुरवठा अधिक सक्षम व विश्वासार्ह करण्याची मागणी केली. यावर सहाय्यक महाव्यवस्थापक रहांगदले यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

रेवदंडा हे पर्यटन आणि मत्स्यव्यवसायासाठी महत्त्वाचे केंद्र असल्याने येथील वीजपुरवठा सुरळीत राहणे अत्यंत गरजेचे आहे. वीज खंडित झाल्यास नागरिकांसह व्यावसायिक, मच्छिमार, व्यापारी आणि पर्यटन व्यवसायावर परिणाम होतो. त्यामुळे या बैठकीकडे रेवदंडा आणि अलिबाग परिसरातील नागरिक आशेने पाहत आहेत.

दरम्यान, रेवदंडा ग्रामपंचायत आणि महावितरण प्रशासन यांच्यातील समन्वयामुळे आगामी काळात वीजपुरवठ्याच्या समस्या कमी होतील आणि नागरिकांना अधिक दर्जेदार सेवा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**मुरूड जंजिरा नगरपरिषद जि. रायगड**
**निविदा सूचना**
**सन २०२६-२७**

मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे खालील काम करणेसाठी इच्छुक व अनुभवी असलेल्या ठेकेदार यांचेकडे द्विलिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागवित आहोत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची इसारा रक्कम रू. | सुरक्षा अनामत २% | सुरक्षा अनामत ७% | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत नैऋत्य भागात (South West) CCTV कॅमेरे पुरवठा करणे व बसविणे | २,०००/- | ४,०००/- | १४,०००/- | १,०००/- |
| २ | मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत मध्य भागात (Central) CCTV कॅमेरे पुरवठा करणे व बसविणे | २,०००/- | ४,०००/- | १४,०००/- | १,०००/- |
| ३ | मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत आग्नेय भागात (South East) CCTV कॅमेरे पुरवठा करणे व बसविणे | २,०००/- | ४,०००/- | १४,०००/- | १,०००/- |
| ४ | मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत वायव्य भागात (North West) CCTV कॅमेरे पुरवठा करणे व बसविणे | २,०००/- | ४,०००/- | १४,०००/- | १,०००/- |
| ५ | मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत ईशान्य भागात (North East) CCTV कॅमेरे पुरवठा करणे व बसविणे | २,०००/- | ४,०००/- | १४,०००/- | १,०००/- |

उपरोक्त निविदाबाबतची फॉर्मची विक्री, स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे राहील.

१. कोणतीही निविदा अगर सर्वच निविदा त्याबाबत कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.
२. सदर कामाची निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
३. लिफाफा क्र. १ मध्ये भरावयाची कागदपत्रे ही निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आलेली आहेत. त्यानुसार कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
४. लिफाफा क्र. २ मध्ये निविदापत्रक दर भरून सादर करावयाचे आहे.

| वेळापत्रक | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| निविदा प्रसिद्धी | १३/०६/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | | |
| निविदा भरण्याचा कालावधी | १३/०६/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | १९/०६/२०२६ | सायं. ५.०० वाजता |
| निविदा उघडण्याचा कालावधी | २०/०६/२०२६ सायं. ५.०० वाजता किंवा प्रशासकीय सोईनुसार | | | |

म्यु.जा.क्र.५५२/बांध/२०२६-२७
मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालय
मुरूड जंजिरा, जि. रायगड
दिनांक १२/०६/२०२६

सही/-
**(सचिन बच्छाव)**
मुख्याधिकारी
मुरूड जंजिरा नगरपरिषद

## निवडक

### आंबेळीत टँकरद्वारे पाणी पुरवठा



तळाः शहरातील आंबेळी आदिवासी वाडी येथे पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून आंबेळी ग्रामस्थांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. आंबेळी येथील ग्रामस्थांना येथे असलेल्या बोरिंगच्या माध्यमातून पाणी पुरवठा केला जातो. मात्र, येथील पंपामध्ये बिघाड झाल्यामुळे नगरपंचायतीला कळवले असता त्यांनी हा महावितरण विभागाचा काम असल्याचे सांगितले तर महावितरण विभागाने हा नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा काम असल्याचे सांगितले. यामुळे येथील बोरिंग बंद अवस्थेत असून महिलांना दूरवरून डोक्यावर हंड्याने पाणी आणावे लागत आहे. येथील आदिवासी महिला या रोजंदारीवर कामाला जात असून पाण्याची टंचाई असल्यामुळे त्यांना कामावरही जाता येत नाही. पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेता रितेश मुंढे यांच्या माध्यमातून आदिवासीवाडीला टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

### आरटीओ अधिकाऱ्यास मारहाण करणाऱ्यास पोलीस कोठडी

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीत क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई केल्यानंतर आरटीओच्या अधिकाऱ्याला धमकावत मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी एका इसमाविरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, मारहाण करणे, धमकी देणे यांसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. प्रादेशिक परिवहन विभागाच्या भरारी पथकाकडून तळोजा औद्योगिक वसाहतीतील मुख्य रस्त्यावर पकोटेक्स कंपनीसमोर वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येत होती. यावेळी एमएच-४६-एफ-२६४१ क्रमांकाच्या वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून निर्धारित क्षमतेपेक्षा चार टन अधिक वजनाची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. तसेच वाहनाची कागदपत्रे तपासल्यानंतर मार्च २०२३ नंतर वाहन कर भरलेला नसल्याचे समोर आले. याशिवाय प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, विमा, योग्यता प्रमाणपत्र, परवाना आणि राष्ट्रीय परवाना अधिकृततेची वैधता संपल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे आरटीओच्या भरारी पथकाने ई-चलनद्वारे ५० हजार ५०० रुपयांचे तडजोड शुल्क आकारून कारवाई केली. या कारवाईमुळे संतप्त झालेल्या नितीन रॉय (वय २५) याने संबंधित आरटीओ अधिकाऱ्यांशी वाद घालून त्यांना मारहाण केल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलीस ठाण्याचे अजयकुमार मोहिते यांनी रॉय याला ताब्यात घेतले. रॉय याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने आरोपीला सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक मोहीते यांनी दिली.

### छत्रपती शिवाजी महाराज रोडपर्यंत ई-रिक्षा सेवा सुरू ठेवा

**नेरळ :** माथेरानमधील छत्रपती शिवाजी महाराज रोडपर्यंत ई-रिक्षा नेण्यावर घालण्यात आलेली बंदी कायम ठेवू नये, अशी मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पोलीस प्रशासन आणि नगरपरिषदेची भेट घेऊन निवेदन दिले. पर्यावरणपूरक ई-रिक्षा दस्तुरी नाका ते हुतात्मा स्मारक आणि छत्रपती शिवाजी महाराज रोड या मार्गांवर सुरू आहेत. मात्र पर्यटकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी काही दिवसांसाठी हा मार्ग बंद केला होता. त्यामुळे वन ट्री हिल परिसरातील नागरिकांची गैरसोय होत असल्याची तक्रार करण्यात आली.माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर, प्रियांका कदम, किशोर मोरे यांच्यासह नागरिकांनी प्रभारी पोलीस अधिकारी सरिता मुसळे यांची भेट घेऊन सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेले मार्ग बंद करू नयेत, अशी मागणी केली. त्यानंतर मुख्याधिकारी राहुल इंगळे यांची भेट घेऊन ई-रिक्षा सेवा व मार्गांबाबत सर्वमान्य निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. यावर सर्व संबंधितांची बैठक घेऊन निर्णय केला जाईल, असे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले आहे.

# उरण तालुक्यात पाणीटंचाईचे संकट


● (संग्रहीत छायाचित्र)

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. अनेक भागांमध्ये पाणीपुरवठ्यावर कपात करण्यात आली आहे. यावर्षी मान्सून उशिरा दाखल होत असल्याने आणि वाढत्या उष्णतेमुळे जलसाठा झपाट्याने घटत असल्याने उरणकरांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे या संकटाचा इशारा उरण तालुका मराठी पत्रकार संघाने काही महिन्यांपूर्वीच दिला होता. मात्र, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू यांनी केला आहे.

उरण तालुका मराठी पत्रकार संघाने नगरविकास मंत्री, रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती, गटविकास अधिकारी, उरण नगरपरिषद, नगराध्यक्षा आणि संबंधित विभागांना लेखी निवेदन देऊन रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करणे, जुन्या विहिरींचे सर्वेक्षण व पुनरुज्जीवन, तलावांचे संवर्धन आणि जलसंधारणाची व्यापक मोहीम राबविणे यासंदर्भात मागणी केली होती. मात्र प्रशासनाने या मागण्यांची कोणतीही गंभीर दखल घेतली नसल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यात दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनते. अनेक गावांमध्ये महिलांना पाण्यासाठी मैलोनमैल भटकावे लागते. काही भागांमध्ये टँकरवर अवलंबून राहावे लागते, तर शहरातील अनेक भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असतात. आता पाऊसही लांबल्याने नागरिकांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे.

विशेष म्हणजे तालुक्यातील अनेक पारंपरिक विहिरी, तलाव आणि जलस्रोत आजही दुर्लक्षित अवस्थेत पडून आहेत. अनेक विहिरी गाळाने भरल्या असून त्यांची साफसफाई किंवा पुनरुज्जीवन करण्यासाठी कोणतीही प्रभावी मोहीम राबविण्यात आलेली नाही. अनेक गावांतील पाणवठे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

उरणमध्ये मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प, उंच इमारती, व्यावसायिक संकुले आणि औद्योगिक प्रकल्प उभे राहत आहेत. मात्र, या प्रकल्पांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे वास्तव समोर येत आहे. अनेक ठिकाणी ही योजना केवळ कागदावर असून प्रत्यक्षात पावसाचे कोट्यवधी लिटर पाणी थेट नाल्यातून समुद्रात वाहत जात आहे.

#### एका थेंबासाठी करावा लागेल संघर्ष

अन्यथा दरवर्षीप्रमाणे पाणीटंचाई, टँकर माफियांचा सुळसुळाट, नागरिकांची फरफट आणि प्रशासनाची निष्क्रियता हेच चित्र कायम राहील. पाऊस लांबल्यामुळे संकटाची घंटा वाजली आहे. अजूनही प्रशासन जागे झाले नाही तर भविष्यात उरणकरांना पाण्याच्या एका थेंबासाठी संघर्ष करावा लागेल, असा इशारा उरण तालुका मराठी पत्रकार संघाने दिला आहे.

■ **पारंपरिक विहिरी, तलाव दुर्लक्षित**

■ **रेन वॉटर हार्वेस्टिंग कागदावरच**

पत्रकार संघाने प्रशासनाला यापूर्वीच स्पष्ट सूचना केली होती की, पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविले नाही तर भविष्यात उरणला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागेल. प्रत्येक शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय, गृहनिर्माण सोसायटी, औद्योगिक प्रकल्प आणि मोठ्या इमारतींमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करणे गरजेचे आहे. तसेच बंद पडलेल्या विहिरी, तलाव आणि पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले होते.

मात्र, प्रशासनाने वेळेत पावले उचलली नाहीत आणि आता उरणमध्ये पाणीकपातीची वेळ आली आहे. पाऊस आणखी लांबला तर परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संकट दारात आल्यानंतर बैठका घेण्यापेक्षा संकट येण्यापूर्वी नियोजन करणे आवश्यक असते. परंतु उरणमध्ये आजही ठोस जलधोरण आणि कृती आराखडा नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढू लागला आहे.

मराठी पत्रकार संघाने पुन्हा एकदा मागणी केली आहे की, तालुक्यातील सर्व विहिरी, तलाव आणि जलस्रोतांचे तातडीने सर्वेक्षण करून त्यांचे पुनरुज्जीवन करण्यात यावे, रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करण्यात यावे आणि जलसंधारणासाठी विशेष कृती आराखडा जाहीर करण्यात यावा.

## दोन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार

**पनवेल :** खारघर येथे झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात २ जण ठार झाल्याची घटना घडली आहे. खारघर येथील हिरानंदानी ब्रीजपासून ४०० मीटर अंतरावर डिलेव्हरी बॉय सुजितकुमार वर्मा हा त्याच्याकडील इलेक्ट्रीक बाईकवरुन डिलेव्हरी देण्यासाठी जात होता. त्यावेळी डावीकडून येणाऱ्या भरधाव टँकरने त्याच्या बाईकला धडक दिल्याने जखमी होऊन मयत झाला. तर दुसऱ्या घटनेत खारघर जवळील कोपरा बस स्टॉप समोरुन रस्ता ओलांडत असलेल्या रबीश दास या पादचाऱ्याला अज्ञात वाहनाची धडक बसून झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाला आहे.

## गणेश मार्केट परिसरात टपऱ्यांवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार प्रभाग समिती 'ड' अंतर्गत नवीन पनवेल येथील गणेश मार्केट परिसरातील अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे तसेच उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रूपाली माने आणि प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागाचे कर्मचारी तसेच एमएसएफ सुरक्षारक्षकांच्या पथकाच्या माध्यमातून कारवाईसाठी करण्यात येत होती. यावेळी संबंधित अनधिकृत टपरीधारकांकडून कारवाईस विरोध करण्यात आला. अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या टपऱ्या व अतिक्रमणांविरुद्ध महानगरपालिका नियमितपणे कारवाई करत असून, कारवाईदरम्यान विरोध करणाऱ्या संबंधितांवरही नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. शहरातील रस्ते, पदपथ व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## पाऊस नसल्याने शेतकरी हवालदिल

**। खांब । प्रतिनिधी ।**

पावसाळी हंगामातील शेतीची मशागत व धुळवाफा पेरणीची कामे पुर्ण झाली तरीही अद्याप पावसाचा पत्ताच नसल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. सर्वसाधारणपणे मे महिना सुरू झाल्यावर पहिल्या पंधरवड्यात शेतीच्या मशागतीच्या कामांना प्रारंभ करणे व रोहिणी नक्षत्रावर धुळवाफ्याच्या पेरणीची कामे करण्याची शेतकरी वर्गाची पुर्वापार परंपरा आहे. त्यादृष्टीने मशागत व पेरणीची कामे पुर्ण झाली असून अद्याप पावसाचा पत्ताच नसल्याने शेतकरी वर्गासमोर विविध समस्या उभ्या राहिल्या आहेत.

शेतामध्ये भाताचे दाणे तसेच पडून राहिल्याने भाताच्या दाण्यांवर प्रखर ऊन पडून ते निकामी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच उघडे दाणे पाखरेही खाण्याची भीती व्यक्त केली जाऊ लागली आहे. पाऊस सुरू झाला असता तर एव्हाना पेरणी केलेले बियाणे रूजून वर आले असते.

पुढील शेतीची कामेही सुरळीतपणे पार पडली असती. परंतु पावसाचाच पत्ता नसल्याने व पाऊस पुढे लांबल तर शेतीचा सर्वच हंगाम पुढे सरकून शेतकरी वर्गाला प्रचंड आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागणार आहे.

# डिझेल चोरी प्रकरणी दोघं ताब्यात

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



पनवेल परिसरात उभ्या असणाऱ्या ट्रेलरमधून डिझेल चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघा सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले असून त्यांचा तिसरा साथीदार गुन्ह्यातील गाडीसह पसार झाल्याने त्याचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. पनवेल जवळील गोवाकडे जाणाऱ्या मार्गावर शिरढोण गावाच्या हद्दीत साईकृपा हॉटेल समोर उभ्या करून ठेवलेल्या ट्रेलरमधून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपये किंमतीचे डिझेल चोरल्याची तक्रार रामप्रताप राजभर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती. या तक्रारीनुसार नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद लभडे, परेश म्हात्रे, अविनाश गंथडे, महेंद्र वायकर, योगेश दिवेकर, विनोद देशमुख आदींचे पथक तांत्रिक तपासाद्वारे आरोपींचा शोध घेत असताना परेश म्हात्रे यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराद्वारा सदर गुन्ह्यातील दोन आरोपी खारघर परिसरातील डोंगर भागात लपले असल्याचे समजले. त्यानुसार या पथकाने आरोपी सुरज खरात (२१) व भुपेंद्र सिंग (२१) या दोघांना ताब्यात घेतले. दरम्यान या गुन्ह्यातील तिसरा आरोपी पप्पू कुमार हा चोरीनंतर वापरलेल्या वाहनासह पसार झाला होता. या दोन आरोपींकडून जवळपास १ लाख ११ हजार ६०० रुपये किंमतीचे १२०० लिटर डिझेलचे ३० कॅन हस्तगत करण्यात आले आहेत. तर उर्वरित माल हा फरार झालेल्या आरोपीकडे असल्याने त्याचा शोध पनवेल शहर पोलीस ठाण्याचे अविनाश गंथडे करीत आहेत.

## महानगरपालिकेकडून अनधिकृत होर्डिंगवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**




पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड' अंतर्गत तक्का पेट्रोल पंपासमोरील अनधिकृत होर्डिंग हटविण्याची कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार महापालिका क्षेत्रातील अनधिकृत जाहिरात फलकांवर प्रभावी कारवाई करण्यात येत आहे.

ही कारवाई अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे तसेच उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या निर्देशानुसार करण्यात आली. सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांच्या नेतृत्वाखाली व प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे यांच्या देखरेखीखाली ही मोहीम राबविण्यात आली. या कारवाईसाठी प्रभाग समिती ङ्गडफ मधील अतिक्रमण पथक, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी, रायगड सुरक्षा रक्षक तसेच एमएसएफ सुरक्षा रक्षक यांच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत होर्डिंग हटविण्यासाठी एक मोठी क्रेन व एक हायड्रा यंत्राचा वापर करण्यात आला. महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग्ज व अतिक्रमणांविरोधातील कारवाई यापुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अनधिकृत होर्डिंग अथवा जाहिरात फलक उभारू नयेत तसेच महानगरपालिकेच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# म्हसळा स्थानक बनतोय डंपिंग ग्राऊंड ?

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा शहरातील दिघी नाका येथील एसटी बस स्थानक व ग्रामीण रुग्णालय परिसरात खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या हातगाडी व्यावसायिकांच्या निष्काळजीपणामुळे परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण होत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. दिवसभर व्यवसाय केल्यानंतर सायंकाळी उशिरा हातगाडी चालक तेथून निघून जातात. मात्र, व्यवसायातून निर्माण होणारा कचरा येथेच टाकून दिला जात असल्याने परिसराचे रूपांतर डंपिंग ग्राऊंडमध्ये होत आहे.

खाद्यपदार्थांच्या वापरातील कागदी व प्लास्टिक डिश, ग्लास, चमचे, पिशव्या तसेच खरकटे अन्नपदार्थ यांचा ढिगारा सकाळी परिसरात सर्वत्र विखुरलेला दिसून येतो. त्यामुळे दुर्गंधी पसरत असून मोकाट जनावरे व भटक्या कुत्र्यांचाही परिसरात वावर वाढतो. याचा फटका एसटी प्रवासी, रुग्णालयात उपचारासाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना बसत आहे. एसटी स्थानक व ग्रामीण रुग्णालय हा तालुक्यातील अत्यंत वर्दळीचा भाग मानला जातो.या परिसरातील वाढत्या घाणीमुळे स्वच्छतेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण झाला असून सार्वजनिक आरोग्यालाही धोका निर्माण होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

हातगाडी व्यावसायिकांनी आपल्या व्यवसायातून निर्माण होणारा कचरा स्वतः गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावावी, तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी म्हसळा नगर पंचायतीकडे केली आहे. नगर पंचायत सफाई कर्मचारी रोज साफसफाई करीत असतात तो पर्यंत नागरिकांना विखुरलेल्या कचऱ्याचा त्रास होत असतो. एसटी स्थानक आणि ग्रामीण रुग्णालय परिसर हा तालुक्याचा चेहरा मानला जातो. त्यामुळे येथील स्वच्छता राखणे ही केवळ नगर पंचायतीचीच नव्हे तर व्यावसायिकांचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## शेतकऱ्यांस मार्गदर्शन

**। पाताळगंगा। प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी सुनिल निंबाळकर व आत्मा अंतर्गत आयोजित अल निनो व खेत बचाओ अभियाना अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांनी शेतकऱ्यास मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात भारतीय कृषी संशोधन परिषद, सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज टेक्नॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. अभय शर्मा यांनी सूक्ष्म अन्नद्रव्ये, मत्स्य संवर्धन व मत्स्य प्रक्रिया याविषयी माहिती दिली. कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी नाजीम मुलानी, सहाय्यक कृषी अधिकारी शेटे, दर्शना पवार व दर्शना शेलार उपस्थित होते.

# ठासणीची बंदूक वापरणाऱ्यास अटक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**




ठासणीची बंदुकीचा गैरवापर करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी या गुन्हेगाराकडून एक ठासणीची बंदूक देखील हस्तगत केली असून या सराईत गुन्हेगाराची रवानगी जेलमध्ये झाली आहे.

वारे ग्रामपंचायतीमधील जांभुळवाडी खिंडीत प्रशांत तुकाराम पारधी याच्याकडे हा ठासणी बंदुक आढळून आली. त्यावेळी पोलीसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला प्रशांत पारधी याच्याकडून शिश्याचे छरे, गंधक पावडर बेकायदेशीर रित्या स्वतःच्या ताब्यात आढळून आले. ठासणीची बंदूक वापरण्याच्या गुन्ह्यात त्याला ताब्यात घेवुन त्याच्याविरूध्द गुन्हा दाखल करून त्याला गुन्हयाचे कामी अटक करण्यात आली. नेरळ पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांच्या गुन्हे प्रकटीकरण टीममधील पोलीस उपनिरीक्षक सुशिल काजरोळकर, एस. एस. शेंबडे, आर.एन. वसावे, राजाराम पिंगळे, महेश खंडागळे, सचिन वाघमारे, निलेश कोंडार, राजेभाऊ केकाण, आशु बेदे, विनोद वांगणेकर, कुशल काळेखे यांनी ही कारवाई केली. नेरळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण टीमचे जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक अभिजीत पानसरे,उप अधीक्षक राहुल गायकवाड यांनी अभिनंदन केले आहे.

**वर्ष उलटले, अहवाल गायब | मृतांच्या कुटुंबीयांना न्याय कधी?**

# मैथिली पाटीलच्या आईचा आक्रोश

**। उरण । प्रतिनिधी ।**

१२ जून २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनकडे निघालेले एअर इंडियाचे एआय-१७१ हे विमान उड्डाणानंतर काही क्षणांतच कोसळले आणि अवघ्या काही सेकंदांत २६० जणांचा जीव गेला. या भीषण दुर्घटनेत पनवेलची कन्या आणि एअर इंडियाची हवाई सुंदरी मैथिली पाटील हिचाही दुर्दैवी मृत्यू झाला. संपूर्ण देश हादरला, सरकारने चौकशीचे आदेश दिले, तज्ज्ञ समित्या स्थापन झाल्या, मोठमोठी आश्वासने देण्यात आली; पण एक वर्ष उलटूनही दुर्घटनेचे नेमके कारण जनतेसमोर आलेले नाही.

माझी मुलगी आता कधीच परत येणार नाही, हे मी मान्य केले आहे. पण ज्या दुर्घटनेत २६० निष्पाप लोकांचा मृत्यू झाला, त्या दुर्घटनेचे खरे कारण तरी देशाला कळायला नको का? एक वर्ष उलटले, पण अजूनही आम्हाला सांगितले जात नाही की आमची लेकरं नेमकी कशी मेली. हा अपघात होता की घातपात? दोष कोणाचा होता? आणि त्यावर कारवाई का होत नाही? अशा शब्दांत एअर इंडिया विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या पनवेल तालुक्यातील न्हावा गावची कन्या मैथिली पाटील हिच्या आई प्रमिला पाटील यांनी आपल्या मनातील संताप आणि वेदना व्यक्त केल्या.



मैथिली ही सामान्य कुटुंबातील मुलगी होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून तिने हवाई सेविका होण्याचे स्वप्न पूर्ण केले होते. घरातील आर्थिक परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी तिने स्वतः वर घेतली होती. भावंडांच्या शिक्षणाची, आई-वडिलांच्या आधाराची स्वप्ने तिने पाहिली होती. पण एका क्षणात सर्व काही उद्ध्वस्त झाले. विमान कोसळले आणि पाटील कुटुंबाचे संपूर्ण विश्वच काळोखात बुडाले.

आजही घरातील प्रत्येक कोपऱ्यात मैथिलीच्या आठवणी आहेत. तिचे फोटो आहेत, तिचा आवाज आहे, तिच्या स्वप्नांच्या कथा आहेत. पण ती नाही. आणि तिच्या मृत्यूचे कारणही नाही. याच वेदनेने कुटुंबीय अस्वस्थ आहेत. दुर्घटनेनंतर अनेक तर्क-वितर्क समोर आले. कोणी तांत्रिक बिघाडाचे कारण सांगितले, कोणी मानवी चुकीची शक्यता व्यक्त केली, तर काहींनी घातपाताचाही संशय व्यक्त केला. मात्र या सर्व चर्चांमध्ये मृतांच्या कुटुंबीयांना अजूनही अधिकृत उत्तर मिळालेले नाही.

#### मृत्यूचे सत्य देशासमोर मांडा

आज दुर्घटनेला एक वर्ष पूर्ण होत असताना उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून एकच मागणी होत आहे. आमची लेकरं परत येणार नाहीत, पण त्यांच्या मृत्यूचे सत्य तरी देशासमोर मांडा. दोषी कोण असेल त्याला शिक्षा करा. कारण सत्य दडपले गेले, तर उद्या आणखी कित्येक कुटुंबांवर अशीच वेळ येऊ शकते.

देशाच्या विमान सुरक्षेचा प्रश्न, २६० निष्पाप जीवांचा प्रश्न आणि शेकडो कुटुंबांच्या न्यायाचा प्रश्न आता सरकारने अधिक काळ प्रलंबित ठेवू नये, अशी तीव्र भावना व्यक्त होत आहे.

विनम्र अभिवादन

शालिनीताई जयराम पाटील
शोकाकुल
सौ. शैलजा घरत, नागाव, नवी मुंबई

## फुटबॉलचा महोत्सव

जगभरातील अब्जावधी चाहत्यांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणारा फुटबॉल पुन्हा एकदा जगाला एका धाग्यात बांधण्यासाठी सज्ज झाला आहे. फिफा विश्वचषक २०२६ हा केवळ एक क्रीडा सोहळा नसून जागतिक संस्कृती, उत्साह, स्पर्धात्मकता आणि मानवी एकात्मतेचा भव्य उत्सव ठरणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांच्या संयुक्त यजमानपदामुळे हा विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धांपैकी एक मानला जात आहे. या वेळी स्पर्धेत प्रथमच ४८ संघ सहभागी होणार आहेत. त्यामुळे अधिक देशांना जागतिक व्यासपीठावर स्वतःचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. वाढलेल्या संघसंख्येमुळे स्पर्धा अधिक रंगतदार आणि अनिश्चित होणार असून चाहत्यांना अनेक रोमांचक सामने पाहायला मिळतील. विश्वचषक २०२६ च्या चर्चेत सर्वाधिक उल्लेख होत आहे तो फ्रान्सचा स्टार खेळाडू किलियन एम्बाप्पेचा. आपल्या वेगवान धावा, अचूक फिनिशिंग आणि मोठ्या सामन्यांतील प्रभावी कामगिरीमुळे एम्बाप्पे जगातील सर्वोत्तम फुटबॉलपटूंपैकी एक मानला जातो. फ्रान्सचा संघ पुन्हा एकदा विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानला जात असून एम्बाप्पे त्याच्या मोहिमेचे प्रमुख शस्त्र असेल. इंग्लंडच्या आशा युवा मध्यफळीतील स्टार ज्युड बेलिंगहॅमवर केंद्रित आहेत. खेळावरील पकड, नेतृत्वगुण आणि सर्जनशीलता यामुळे बेलिंगहॅमने अल्पावधीतच जागतिक स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. इंग्लंडचा संघ अनेक वर्षांपासून विश्वविजेतेपदाच्या शोधात असून २०२६ मध्ये त्यांच्याकडे मजबूत संधी आहे. ब्राझीलचा उल्लेख केल्याशिवाय विश्वचषकाची चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. पाच वेळा विश्वविजेता असलेल्या या संघाकडून नेहमीच आकर्षक आणि आक्रमक फुटबॉलची अपेक्षा असते. यावेळी संघाचे नेतृत्व विनिसियस ज्युनियरसारखा वेगवान आणि कौशल्यपूर्ण खेळाडू करेल. त्याच्या ड्रिबलिंग आणि गोलनिर्मिती क्षमतेमुळे ब्राझील पुन्हा एकदा विजेतेपदाच्या शर्यतीत आघाडीवर असेल. स्पेनचा संघही विशेष चर्चेत आहे. युवा सुपरस्टार लामिन यामाल आणि मध्यफळीतील प्रतिभावान पेड्री यांच्या कामगिरीकडे संपूर्ण फुटबॉलविश्वाचे लक्ष लागले आहे. स्पेनची पारंपरिक पासिंग शैली आणि नव्या पिढीतील खेळाडूंचा आत्मविश्वास यांचे मिश्रण संघाला अधिक धोकादायक बनवते.

### कोट्यवधी चाहत्यांची स्वप्ने, अपेक्षा

जर्मनीचा संघ नेहमीच मोठ्या स्पर्धांमध्ये पुनरागमन करण्यासाठी ओळखला जातो. जमाल मुसियाला या तरुण खेळाडूकडून यावेळी मोठ्या अपेक्षा आहेत. त्याचे तांत्रिक कौशल्य आणि आक्रमक वृत्ती जर्मनीला पुन्हा एकदा विश्वविजेतेपदाच्या स्पर्धेत आणू शकतात. नॉर्वेचा संघ पात्र ठरल्यास एर्लिंग हॅलंड हा स्पर्धेतील सर्वात चर्चेचा विषय ठरू शकतो. जगातील सर्वात प्रभावी स्ट्रायकर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हॅलंडची गोल करण्याची क्षमता कोणत्याही बचावफळीला आव्हान देऊ शकते. त्याच्या उपस्थितीमुळे नॉर्वेचा संघ अनेक बलाढ्य संघांसाठी धोकादायक ठरू शकतो. संघांच्या बाबतीत पाहिले तर विद्यमान विश्वविजेता अर्जेंटिना हा संघ दुर्लक्षित करता येणार नाही. युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या संतुलित मिश्रणामुळे अर्जेंटिना पुन्हा एकदा विजेतेपदासाठी दावेदारी करू शकतो. फ्रान्स, ब्राझील, इंग्लंड, स्पेन, जर्मनी आणि पोर्तुगाल हे संघही संभाव्य विजेते म्हणून चर्चेत आहेत. याशिवाय मोरोक्को, जपान आणि यजमान अमेरिका यांसारखे संघ 'डार्क हॉर्स' म्हणून ओळखले जात आहेत. मागील काही वर्षांत या संघांनी सातत्यपूर्ण प्रगती केली असून ते बलाढ्य संघांना धक्का देण्याची क्षमता बाळगतात. तंत्रज्ञानाच्या दृष्टीनेही हा विश्वचषक महत्त्वाचा ठरणार आहे. व्हिडिओ असिस्टंट रेफरी, गोल-लाइन तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित विश्लेषणामुळे खेळ अधिक अचूक आणि पारदर्शक होईल. प्रेक्षकांना अत्याधुनिक प्रसारण तंत्रज्ञानामुळे सामन्यांचा अधिक प्रभावी अनुभव मिळणार आहे. फुटबॉल विश्वचषक २०२६ हा केवळ विजेतेपदासाठीची लढत नाही; तो जगभरातील विविध संस्कृतींना, भाषांना आणि लोकांना एकत्र आणणारा उत्सव आहे. एम्बाप्पे, बेलिंगहॅम, विनिसियस ज्युनियर, यामाल, पेड्री, मुसियाला आणि हॅलंड यांसारखे युवा तारे या स्पर्धेला नवे स्वरूप देतील. तर अर्जेंटिना, फ्रान्स, ब्राझील, इंग्लंड आणि स्पेन यांसारखे बलाढ्य संघ फुटबॉलच्या सर्वोच्च मुकुटासाठी झुंज देतील. जून २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या या महाउत्सवाकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. फुटबॉलचा चेंडू पुन्हा एकदा फिरू लागेल आणि त्याच्यासोबत फिरतील कोट्यवधी चाहत्यांची स्वप्ने, अपेक्षा आणि भावना.

### वाढत्या व्यापारीकरणावरही प्रश्न

विश्वचषकाच्या मैदानाबाहेरचे राजकारण, २०२६ फिफा फुटबॉल विश्वचषक : खेळ, सत्ता आणि जागतिक समीकरणे फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो. दर चार वर्षांनी होणारा फिफा विश्वचषक हा केवळ क्रीडा स्पर्धा नसून जगाच्या राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक शक्तिसमीकरणांचे प्रतिबिंब असतो. २०२६ मध्ये अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणारा विश्वचषकही याला अपवाद नाही. मैदानावरील रोमांचक सामन्यांइतकीच चर्चा यावेळी मैदानाबाहेरील राजकीय घडामोडींची होत आहे. यंदाचा विश्वचषक अनेक अर्थांनी ऐतिहासिक आहे. प्रथमच तीन देश संयुक्तपणे यजमानपद भूषवत आहेत आणि प्रथमच ४८ संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. मात्र या भव्य आयोजनामागे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उभे राहिले आहेत. अमेरिकेच्या स्थलांतर आणि व्हिसा धोरणांबाबत अनेकांनी चिंता व्यक्त केली आहे. विविध देशांतील चाहते, पत्रकार आणि अधिकाऱ्यांना प्रवेश मिळविताना अडचणी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एका बाजूला जगाला एकत्र आणण्याचा फुटबॉलचा संदेश दिला जात असताना दुसऱ्या बाजूला सीमारेषा आणि प्रवेश निर्बंध यांवरून वाद निर्माण होत आहेत. मानवी हक्कांचाही प्रश्न या विश्वचषकाभोवती केंद्रस्थानी आला आहे. विविध स्वयंसेवी संस्थांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आंदोलनाचा अधिकार आणि स्थलांतरित कामगारांच्या स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या आयोजनात स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम हा गेल्या काही वर्षांत महत्त्वाचा विषय बनला असून २०२६ च्या विश्वचषकालाही त्याची छाया पडलेली दिसते. जागतिक राजकारणातील तणावांचाही परिणाम या स्पर्धेवर होऊ शकतो. अनेक देशांतील राजनैतिक संबंध, सुरक्षा प्रश्न आणि आंतरराष्ट्रीय संघर्ष यांचा अप्रत्यक्ष प्रभाव विश्वचषकावर पडण्याची शक्यता आहे. खेळ हा राजकारणापासून वेगळा ठेवण्याचा प्रयत्न केला जात असला तरी वास्तवात दोन्ही क्षेत्रे अनेकदा एकमेकांशी जोडलेली असतात. दरम्यान, यजमान शहरांमध्ये सार्वजनिक खर्चावरूनही चर्चा सुरू आहे. स्टेडियमचे आधुनिकीकरण, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षा यासाठी अब्जावधी डॉलर खर्च केले जात आहेत. या खर्चामुळे रोजगारनिर्मिती आणि पर्यटन वाढेल, असा समर्थकांचा दावा आहे; तर टीकाकारांच्या मते हा निधी शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक कल्याणासाठी वापरणे अधिक योग्य ठरले असते. विश्वचषकाच्या वाढत्या व्यापारीकरणावरही प्रश्न उपस्थित होत आहेत. तिकिटांचे वाढते दर, प्रायोजकांचा प्रभाव आणि व्यावसायिक हितसंबंध यामुळे सामान्य फुटबॉलप्रेमी स्पर्धेपासून दूर जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. खेळाचा उत्सव आणि आर्थिक नफा यांच्यातील समतोल राखण्याचे आव्हान फिफासमोर आहे. एकूणच, २०२६ चा फिफा विश्वचषक हा केवळ फुटबॉलचा महोत्सव नाही. तो जागतिक राजकारण, अर्थकारण, मानवी हक्क आणि सामाजिक बदल यांचा संगम ठरणार आहे. लाखो चाहत्यांचे लक्ष मैदानावरील गोलांकडे असेल; परंतु इतिहासकार, राजकीय विश्लेषक आणि समाजशास्त्रज्ञ यांची नजर मैदानाबाहेर घडणाऱ्या घटनांकडेही तितकीच असेल. कारण विश्वचषक जिंकणारा संघ एकच असतो, पण त्याभोवती निर्माण होणाऱ्या राजकीय कथा अनेक असतात.

## विचार

# परिक्षा 'नीट' का होत नाही?

***यंदा 'नीट'चे पेपर फुटल्याने परीक्षाच रद्द झाली. यामुळे अहोरात्र कष्ट करून परीक्षेची तयारी करणाऱ्या तेवीस लाख विद्यार्थ्यांवर मोठा मानसिक आघात झाला. दर दोन-चार दिवसांनी पेपरफुटीत गुंतलेल्या पालकांची, शिक्षकांची नवनवीन नावे सीबीआयच्या रडावर येत आहेत. पैशाच्या लोभाने पेपरफुटीमध्ये गुंतलेले कोचिंग सम्राट आणि अध्यापक या अत्यंत प्रकरणात गुंतणे, हे अतिशय दुर्दैवी आहे.***



**अजय तिवारी**

यापुर्वीही नीट परीक्षेचे पेपर फुटले, मागील चुकीतून तुम्ही कोणताही धडा घेतला नाही, हे अतिशय दुःखद आहे, अशा परखड शब्दात सर्वोच्च न्यायालयाने देश पातळीवर परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीला (एनटीए) अलिकडेच सुनावले. यंदा 'नीट'चे पेपर फुटल्याने परीक्षाच रद्द झाली. अहोरात्र कष्ट करून परीक्षेची तयारी करणाऱ्या देशातील तेवीस लाख विद्यार्थ्यांवर, त्यांच्या पालकांवर आणि शिक्षकांवर पेपरफुटीमुळे मोठा मानसिक आघात झाला. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या विद्यार्थ्यांची काहीच चूक नसताना पुन्हा एकदा परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. नीट परीक्षेशी संबंधित काही अध्यापक आणि व्यावसायीक कोचिंग क्लासेसचे चालक यांच्या संगनमतातून परीक्षेतील अपेक्षित प्रश्न बाहेर आले. आपल्या लेकरा-बाळांचे भले व्हावे म्हणून श्रीमंत पालकांनी लाखो रूपये मोजून ते खरेदी केले. 'नीट' पेपरफुटीची सीबीआय चौकशी करत आहे. पेपरफुटीशी संबंधित अध्यापक आणि नामवंत कोचिंग क्लासेसचे चालक मिळून किमान तेराजण तरी सीबीआयच्या ताब्यात आहेत. दर दोन-चार दिवसांनी पेपरफुटीत गुंतलेल्या पालकांची, शिक्षकांची नवनवीन नावे सीबीआयच्या रडावर येत आहेत. पैशाच्या लोभाने पेपरफुटीमध्ये गुंतलेले लातूर आणि पुण्यातील शिक्षणक्षेत्रातील कोचिंग सम्राट आणि अध्यापक 'नीट' या अत्यंत प्रतिष्ठेच्या परीक्षेत गुंतले आहेत, हे अतिशय दुर्दैवी आहेच, पण त्यातून देशभर महाराष्ट्राची बदनामी झाली आहे.

परीक्षा घेणाऱ्या एनटीएच्या यंत्रणेतील सर्वांचेच हात स्वच्छ आहेत का? केंद्र सरकारच्या शिक्षण आणि मनुष्यबळ मंत्रालयाची काहीच जबाबदारी नाही का? पेपरफुटीचे प्रकरण २०२४ मध्येही सर्वोच्च न्यायालयात आले होते. तेव्हा एक समिती स्थापन केली गेली होती. या समितीने दिलेल्या शिफारसी एनटीएने स्वीकारल्या होत्या. तरीही यंदा पेपर कसे फुटले? यंदा ३ मे रोजी देशातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ केंद्रांवर 'नीट'ची परीक्षा आयोजित करण्यात आली होती. तिला तेवीस लाख विद्यार्थी बसले होते. ७ मे रोजी परीक्षेत काही गडबड झाल्याचे समजले. नंतर हे प्रकरण केंद्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आले. १२ मे रोजी परीक्षा रद्द करण्यात आली. शिक्षण मंत्रालय आणि एनटीएने नीटची परीक्षा २१ जून रोजी पुन्हा होणार असल्याचे जाहीर केले. नीट म्हणजे नॅशनल एलिजिबिलिटी कम एंट्रन्स टेस्ट ही भारतीय वैद्यकीय आणि दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय प्रवेश परीक्षा आहे. अशा परीक्षेची सुरूवात २०१३ मध्ये सुरु झाली. या परीक्षेच्या गुणवत्तेवरून एमबीबीएस, बीडीएस, आयुष (बीएएमएस, बीएचएमएस), नर्सिंगच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळतो. देशात एमबीबीएसच्या एक लाखाहून अधिक आणि बीडीएसच्या २७ हजाराहून अधिक जागा उपलब्ध आहेत. पेपरफुटीच्या प्रकरणात आजवर तेराजणांना अटक झाली आहे. पेपरफुटीने तेवीस लाख विद्यार्थ्यांचे भविष्य आणि करिअर धोक्यात टाकले. नीट परीक्षेची अवघ्या देशात बेअब्रु झाली असताना केंद्रातील एकही मंत्री याविषयी 'ब्र' सुध्दा काढत नाहीत.

एकूण प्रकरणाचा शोध घेताना सीबीआयचे पथक अनेक दिवस लातूरमधे ठाण मांडून बसले होते. शिवराज मोटेगावकर यांच्या रेणुका केमिस्ट्री कोचिंग क्लासवर छापे घालून अनेक कागदपत्रे, दस्तऐवज जप्त केले. या वर्षीची नीट परीक्षा संपल्यानंतरचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. या क्लासच्या सरांनी प्रश्न विचारल्यानंतर विद्यार्थी उत्तर देतात, सर तुम्ही महत्वाचे म्हणून १०१ प्रश्न दिले होते, त्याच प्रश्नांमधून परीक्षेत प्रश्न आले होते. या व्हिडिओमुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले. लातूर हे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या कोचिंग क्लासेसचे मोठे आगर आहे. येथे क्लासेसमधे उत्तर प्रदेश आणि बिहारमधून आलेले शिक्षक शिकवत असतात. त्यातच मोटेगावकर हा कोचिंग किंग म्हणून ओळखला जाणारा मराठी चेहरा आहे.

गेल्या दहा-वर्षांमध्ये विविध राज्यांमध्ये विविध परीक्षांच्या पेपरफुटीच्या ९० घटना घडल्या आहेत. ४८ वेळा परीक्षा रद्द झाल्या आहेत. सार्वजनिक परीक्षा कायदा २०२४ मध्ये पेपरफुटीला एक कोटी रुपये दंड आणि दहा वर्षे तुरूंगवास अशी शिक्षा असतानाही २०२६ मध्ये पेपर कसे फुटले? कठोर कायदा असुनही अशा शिक्षेची भीती कोणालाच वाटत नाही का? पेपर फोडणारे, पेपर विकणारे आणि पेपर विकत घेणारे सर्व सारखेच दोषी आहेत. आपल्या मुलाबाळांना डॉक्टर करण्यासाठी वाटेल ती किमत मोजण्याची तयारी असलेले अनेक धनवान पालक आहेत. एनटीए यंत्रणेतील काही घटक सामील असल्याशिवाय आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयातील उच्चपदस्थांचे संरक्षण असल्याशिवाय पेपर बाहेर येणे कसे शक्य आहे?

परीक्षा निकोप आणि पारदर्शक नसेल तर निकाल तरी विश्वासार्ह कसे असतील? म्हणून नीट परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेपुढेच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पेपर विकत घेऊन डॉक्टर बनणारे दवाखान्यात किंवा रुग्णालयात रूग्णाला कशी सेवा देतील? केवळ पैसे कमावण्यासाठी आणि प्रतिष्ठा मिळवण्यासाठी ते डॉक्टर म्हणून वावरत राहतील आणि रूग्णांच्या जीवाशी खेळ खेळतील. एनटीएचे कार्यालय असलेल्या शोधात पेपर सेट केला जातो, तिथे पेनसुध्दा बरोबर घेऊन जाता येत नाही. तिथे कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास मनाई आहे. मग तेथून पेपर बाहेर कसा येऊ शकतो? फुटलेला पेपर हा मूळ पेपरची फोटोकॉपी आहे काय? बरोबर कॅमेरा घेऊन जाता येत नाही, मग फोटो किंवा फोटो कॉपी काढणे तरी कसे शक्य आहे? म्हणूनच नीट यंत्रणेतील काहींचा सहभाग असल्याशिवाय पेपर फुटू शकत नाही. अटक केलेल्या तेरा आरोपींनी आपल्या मोबाईलवरील चॅटींग आणि फोटो डिलीट करून टाकले आहे. पण फॉरेन्सिक तपासणीनंतर सर्व पुरावे मिळू लागले आहेत. पेपर सेट करणाऱ्या जीवशास्त्र विषयाच्या लेक्चरर मनीषा गुरूनाथ मांढरे, पेपर सेटर प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी, विद्यार्थी आणि कोचिंग क्लासशी संपर्क ठेवणारी ब्युटिशियन मनीषा वाघमारे, पेपरचा नेटवर्कमध्ये सौदा करण्यात सहभाग असलेला धनंजय लोखंडे, प्रश्नांची पीडीएफ बनवणारा विद्यार्थी शुभम खैरनार, पीडीएफवरून हार्ड कॉपी बनवणारा हरियाणाचा यश यादव, नीट पेपरचा व्यवहार करणारा मांगीलाल बिंवाल, मांगीलालचा भाऊ दिनेश बिंवाल (राजस्थान), फुटलेले पेपर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणारा कोचिंग क्लासचा संचालक शिवराज माटेगावकर हे सारे सीबीआयच्या जाळ्यात सापडले आहेत.

लातूरचे डॉ. मनोज शिरूरे आणि पुण्याचे प्रा. तेजस हर्षदकुमार शहा यांनाही सीबीआयने ताब्यात घेतले आहे. पेपरफुटीची साखळी आणि कटाचा शोध घेण्यासाठी सीबीआयने किमान ५० ठिकाणी शोध मोहीम घेतली. त्यात दस्तऐवज, लॅपटॉप, मोबाईल जप्त केले गेले. पाच राज्यांमध्ये नीट पेपरची विक्री झाली आणि सर्वाधिक विक्री महाराष्ट्रात झाली, असे तपासात आढळून आले आहे. एनटीएचे चेअरमन प्रदीपकुमार जोशी यांचे नाव चर्चेत येत असते, पण या प्रकरणाशी आपला काही संबंध नाही असे एनटीएने जाहीर करून टाकले. २०२४ मध्ये पेपर फुटले तेव्हा जोशी हेच एनटीएचे अध्यक्ष होते. ते पूर्वी मध्य प्रदेश लोकसेवा आयोगाचे चेअरमन असतानाही वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. गेल्या दहा वर्षांमध्ये नीटचे पेपर चार वेळा फुटले. २०१७ मध्ये पटणा आणि जयपूर येथे, २०२१ मध्ये जयपूर तसेच उत्तर प्रदेश येथे, २०२४ मध्ये झारखंड आणि बिहारमध्ये आणि २०२६ मध्ये सीकर, जयपूर आणि महाराष्ट्रात पेपरफुटीच्या घटना घडल्या.

नीट परीक्षा एनटीएकडून काढून घेऊन युपीएससीकडे सोपवावी आणि पेपरफुटीच्या प्रकरणी जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी अनेक संघटनांनी केली आहे. वर्षानुवर्षे बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या मटक्याचा आकडा वेळेपूर्वी कधीच फुटत नाही मग अनेक स्तरावर कडक सुरक्षा आणि दक्षता असुनही नीटचा पेपर कसा फुटतो, असा सवाल करणाऱ्या पोस्टने सोशल मिडियावर धमाल उडवली, मात्र या विषयाचे गांभिर्य सर्वोच्च मानले जायला हवे, हे ही खरेच.

## चर्चा आजची

# ये रे ये रे पावसा...

**अंतरा पारंगे**

गेल्या काही दिवसांपासून तापमानात कमालीची वाढ झाली असून, तीव्र उकाडा आणि घामाच्या धारांमुळे नागरिक पुरते हैराण झाले आहेत. तर पाणीटंचाईनेही नागरिक त्रस्त झाले आहे. अशातच शेतात पेरणी करण्यासाठी शेतकरी सज्ज झाला आहे. मात्र, जूनच्या पहिल्या आठवड्यात बरसणारा मान्सून यंदा लांबल्याने शेतकरी आणि नागरिक दोघांच्याही नजरा पावसाच्या सरींकडे लागल्या आहेत.

जून महिन्याचे बारा दिवस उलटूनही पाऊस न पडल्याने अनेक धरणांतील पाणीसाठ्याने तळ गाठला आहे. पावसाअभावी धरणांमध्ये नवीन पाण्याची आवक जवळपास थांबली असून पिण्याचे पाणी आणि खरीप हंगामासाठी आवश्यक जलसाठ्याबाबत चिंता वाढली आहे. येत्या काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जून महिना उजाडल्यामुळे आतातरी उन्हाची तीव्रता कमी होईल, अशी आशा असताना उन्हाच्या चटक्याने नागरिकांना नकोसे झाले आहे. सध्या ढगाळ वातावरण असले तरी तापमान व उकाडा कमी होण्याची चिन्ह दिसत नाही. मान्सूनपूर्वी ढगाळ वातावरणामुळे आलेली आर्द्रता आणि दुसरीकडे तापमान वाढले असल्याने नागरिकांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेले नागरिक पाऊस पडून वातावरणात गारवा निर्माण कधी होईल याची वाट पाहत आहेत. मात्र यंदा पाऊस लांबल्यामुळे जून महिन्यातदेखील उकाडा असणार असे हवामान विभागाने सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांना कधी पाऊस पडेल अशी आशा लागून राहिली आहे.

मागील वर्षी मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच पावसाला सुरुवात झाली होती. तर हवामान विभागानेही रोहिणी नक्षत्र सुरू असताना यंदा मान्सून वेळेवर दाखल होणार असा अंदाज वर्तवला होता. यावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी रब्बी हंगाम संपताच शेतांची नांगरणी, बांधबंदिस्ती, शेतातील केर कचरा जाळणे आणि इतर



पूर्वतयारी यासह शेतीतील इतर आवश्यक कामे युद्ध पातळीवर पार पाडली. मात्र जून महिना मध्यावर आला असतानाही अजूनही पावसाने हजेरी लावली नसल्याने पेरणी करावी की नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. दरवर्षीप्रमाणे पावसाच्या लवकर आगमनाच्या अपेक्षेने शेतीच्या मशागतीची कामे उरकलेले शेतकरी आता आभाळाकडे डोळे लावून बसले आहेत.साधारणपणे ७ ते ११ जून हा पाऊस दाखल होण्याचा सरासरी कालावधी मानला जातो. त्यामुळे पावसाच्या पहिल्या सरी पडल्यानंतर पेरणी करण्यासाठी सर्वत्र बळीराजा पूर्णपणे सज्ज आहे. काही शेतकऱ्यांनी तर जुळवा जुळव करून शेतीला लागणारे बी- बियाणे ही साठवून ठेवले आहेत. मात्र, अजूनही पावसाने हजेरी लावली नसल्यामुळे खरीप हंगामाच्या नियोजनात अडथळे येत असून वेळेवर लागवड न झाल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. खरीप हंगाम हा जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेचा कणा मानला जात असल्याने लवकरच चांगला पाऊस पडून पेरणीच्या कामांना गती मिळेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती. त्यातही मृगाची पेरणी खरिपासाठी उत्तम असल्याने शेतकरी मृग नक्षत्राच्या पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत असतात. मात्र मृग नक्षत्र संपण्याच्या मार्गावर असतानाही पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

काही शेतकऱ्यांनी धूळवाफी पेरणी केली. तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली. परंतु, आतापर्यंत केलेली पेरणी पावसाअभावी धोक्यात आली आहे. शेतकऱ्यांनी केलेली पेरणी उन्हाच्या तीव्रतेमुळे धोक्यात आली असून, दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. दुबार पेरणीचे संकट आल्यास शेतकऱ्यांना मोठी आर्थिक झळ बसणार आहे. शेतीची पेरणीपूर्व मशागतीची कामे उरकली असून, शेतकऱ्यांना आता पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा लागली आहे. महिनाभरात शेतकऱ्यांनी शेतातील मशागतीची कामे पूर्ण केली आहेत. वेळेत पाऊस झाला, तर ऐनवेळी धावपळ नको, म्हणून शेतकऱ्यांनी आता बियाणे, खतांची जमवाजमव करण्यास सुरवात केली. कृषी विभागानेही जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी बियाणे, खतांची टंचाई निर्माण होऊ नये, याची पूर्वतयारी केली. मात्र जून महिना निम्मा होऊनही पावसाने दडी मारल्यामुळे कोकणातील बळीराजाचा जीव कमालीचा टांगणीवर लागला आहे. पावसाअभावी शेतजमीन अजूनही कोरडी ठाक असून, हवालदील झालेल्या शेतकऱ्यांच्या नजरा आता आभाळाकडे लागल्या आहेत.

पावसाअभावी अनेक भागात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण लागला आहे. तर डोंगर माथ्यावरील ग्रामीण भागातील भूजल साठ्यांनी तळ गाठला आहे. त्यामुळे नागरिकांसह झाडांना, गुरांना पाणी मिळणार कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. शेताची मशागत करून, महागडी बियाणे आणि खते आणून ठेवलेला शेतकरी आणि तीव्र उकाड्याने हैराण झालेले नागरिक आता दररोज पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

## लोकसंसद

### अपघातांमुळे 'बेस्ट' सेवेची प्रतिष्ठा धोक्यात

खरे तर लोकल ट्रेननंतर 'बेस्ट' ही मुंबईकरांची दुसरी जीवनवाहिनी असून मुंबईकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. कारण १२५ हून अधिक वर्षांचा वारसा लाभलेली 'बेस्ट' सेवा देशातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात सर्वोत्कृष्ट वाहतूक सेवा मानली जाते. पण दुर्दैवाने गेल्या काही वर्षातील सातत्याने होणाऱ्या अपघातांमुळे बेस्टच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला आहे. 'बेस्ट'च्या अधिकृत अहवालानुसार गेल्या ३ वर्षांत झालेल्या ९५८ अपघातात ७७ जणांचा बळी गेला तर २१७ जण जखमी झाले. विशेष म्हणजे या एकूण अपघातांपैकी ८५ टक्क्यांहून अधिक अपघात हे खाजगी कंत्राटदारांच्या बसेसचे आहेत. प्रथम दर्शनी हे सर्व अपघात प्रामुख्याने चालकाच्या चुकीमुळे झालेले दिसत असले तरी या अपघातांना इतरही अनेक कारणे आहेत. 'बेस्ट' बस अपघातांच्या वाढत्या संख्येमागे केवळ चालकांचा निष्काळजीपणा हे एकमेव कारण नाही. या अपघातांची दुसरी बाजू समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. यामध्ये बेजबाबदार कंत्राटी बस कंपन्या, प्रशासकीय त्रुटी, इलेक्ट्रिक बसेस, मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी आणि मुंबईच्या रस्त्यांची सद्यस्थिती कारणीभूत आहे. दादर, कुर्ला किंवा भांडुपसारख्या गजबजलेल्या भागात झालेले अपघात मुख्यतः रस्त्यांच्या कडेला आणि फुटपाथवर बसलेले अनधिकृत फेरीवाले आणि अनधिकृत पार्किंग यामुळे झाल्याचे समोर आले आहे. ज्या 'बेस्ट'च्या सार्वजनिक वाहतूक सेवेने आशिया खंडात शिस्त, वक्तशीरपणा आणि सुरक्षिततेचे आदर्श निर्माण केले, त्याच 'बेस्ट' सेवेची वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रतिष्ठा धोक्यात आली आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# आचार्य प्रल्हाद केशव अत्रे : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व

दिवंगत साहित्यिक प्रल्हाद केशव अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला. अष्टपैलू साहित्यिक, शिक्षणतज्ञ, चित्रपटनिर्माते-दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, वक्ते आणि नेते म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्राला परिचित होते. त्यांनी जन्म गाव सासवड, पुणे, मुंबई आणि लंडन येथून बी.ए.,बी.टी.,टी. डी. पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. भारतात परतण्यापूर्वी हॅरो येथे त्यांनी अध्यापन केले. पुण्यातील कॅम्प एज्यूकेशन सोसायटीच्या शाळेत अत्रे अध्यापक होते. या शाळेचे ते पुढे मुख्याध्यापकही झाले. नवयुग वाचनमालेद्वारे त्यांनी लिहिलेली शालेय क्रमिक पुस्तकं हे त्यांचं शैक्षणिक क्षेत्रातील मोठं योगदान मानले जाते. त्यांची टोकदार लेखणी, बोचरा विनोद आणि दिलदार वृत्तीला महाराष्ट्र कधीही विसरू शकणार नाही. प्रल्हाद केशव अत्रे हे महाराष्ट्रातील एक झंझावाती व्यक्तिमत्व होतं. साहित्य, शिक्षण, नाटक, चित्रपट, राजकारण व पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात त्यांना आपला ठसा उमटवला. या सर्वच क्षेत्रामध्ये त्यांचा विलक्षण दबदबा होता. जनमानसावर त्यांचा प्रचंड पगडा होता. ते फर्डे वक्ते होते. आपल्या वक्तृत्वाने ते श्रोत्यांना भारावून टाकत असत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. काही काळ ते महाराष्ट्र विधानसभेत आमदारही होते. त्यांच्या काळातही विद्वान व साहित्यिकांबरोबर त्यांचे वादही खूप गाजले. आचार्य ही बिरुदावली त्यांना प्राप्त झाली होती. तेव्हाचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांचे 'रायटर ॲन्ड फायटर ऑफ महाराष्ट्र' असे यथार्थ वर्णन केले होते. आचार्य अत्रेंनी १९३३ मध्ये नाट्य व चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. मास्टर विनायक यांनी दिग्दर्शित केलेल्या 'ब्रम्हचारी' 'ब्रॅन्डीची बाटली' या चित्रपटांच्या कथा पटकथा त्यांनी लिहिल्या. पायाची दासी, 'धर्मवीर' हे त्यांचे आणखी काही उल्लेखनीय चित्रपट आहेत. साने गुरुजींची 'श्याम ची आई' या पुस्तकावर त्यांनी १९५३ साली चित्रपट बनविला. १९५४ साली या चित्रपटाला पहिले राष्ट्रपती पदक मिळाले. याशिवाय महात्मा फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाची निर्मितीही त्यांनी केली. अत्र्यांच्या बहुतांशी चित्रपटांमध्ये विनोद आणि सामाजिक आशय यांचं चपखल मिश्रण आढळून येतं. त्यांनी हिंदी चित्रपटाचीही निर्मिती केली. आचार्य अत्रे कोणत्याही एका क्षेत्रात फार काळ टिकून राहिले नाहीत. कधी विडंबनकार, कधी विनोदवीर, कधी लहान मुलांवर प्रेम करणारे शिक्षक अशी त्यांची वेगवेगळी रूपे आहेत. 'आयुष्याला जीवन म्हणतात ते उगाच नाही. जीवन म्हणजे पाणी. आयुष्य हे पाण्यासारखे प्रवाही असावे. जे एका ठिकाणी साचून राहते, ते कसले जीवन? ते डबके!' जगात जीवन थोडे, डबकी फार. लोकप्रिय वक्ते म्हणूनही त्यांचा मोठा लौकिक होता. अत्र्यांचे भाषण म्हणजे हशा व टाळ्यांच्या माध्यमातून परखड विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे हुकमी साधन होते. फार काय, तर आचार्य अत्रेंच्या घणाघाती भाषणांमुळेच संयुक्त महाराष्ट्र मिळाला असे मानले जाते. नाशिक येथे १९४२ मध्ये भरलेल्या सत्ताविसाव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अडतिसावे नाट्यसंमेलन (बेळगाव, १९५५), दहावे मराठी पत्रकार-संमेलन (१९५०) आणि बडोदे, इंदूरफव ग्वाल्हेर येथील प्रादेशिक साहित्यसंमेलने यांची अध्यक्षपदेहीत्यांनी विभूषित केली होती. १३ जून १९६९ मुंबई येथे त्यांचे निधन झाले.



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१३ जून
१) श्री. विलास दत्तात्रेय नाईक मापगाव, १३-६-१९६२
२) श्री. अविनाश काशिनाथ घरत चौल, १३-६-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

सौ प्राजक्ता प्रदीप गोडबोले, अधिक मास निमित्ताने अलिबाग

कु. श्रावणी श्रद्धा पाटील, व कु. अस्मिन श्रद्धा पाटील., पुरुषोत्तम (अधिक) मास निमित्ताने, रेवदंडा अलिबाग

## सहा फुटी अजगराला जीवदान



**वेणगाव :** कर्जत तालुक्यात मोठे वेणगाव बौद्ध वस्तीतील ग्रामस्त माजी पोलीस कर्मचारी भगवान पंडित यांच्या घराच्या मागील बाजूस परड्यात त्यांच्या कोंबड्यांच्या पिंजऱ्यात एक सहा फुटी अजगर रात्री येऊन बसला होता. नेहमीप्रमाणे सकाळी कोंबड्या सोडण्यासाठी भगवान पंडित कोंबड्यांच्या पिंजऱ्याजवळ गेले असता, पिंजऱ्याच्या एका खणात मोठा साप आडी मारून बसला असल्याचे त्यांना दिसले. त्यांनी लगेच पिंजऱ्यातील सर्व कोंबड्या बाहेर सोडून दिल्या. त्या सापाची नीट पाहणी केली असता सदर साप हा अजगर जातीचा असल्याचे त्यांना समजले. भगवान पंडित यांच्या जवळील कोंबड्यांपैकी एक कोंबडा अजगराने खाल्ला होता. अजगराला कोणतीही इजा दुखापत न होता लगेच वनविभागाला आमच्या येथे अजगर आल्याची खबर दिली. कर्जत येथील सर्प मित्र सौरभ म्हसे यांना बोलावून पिंजऱ्यात असलेल्या अजगराला सौरभ म्हसे याने बाहेर काढून पकडला. त्यानंतर या अजगराला सुखरूप मानवी वस्तीपासून लांब जंगलात सोडण्यात आले.

# एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक

## • मेट्रो, रेल्वे, बससह इतर वाहतुकीसाठीही फायदेशीर




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी लवकरात लवकर कार्डची नोंदणी करून ते सक्रिय करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ अधिक सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने देण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड योजना राबविण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत जवळपास ५१ लाख नागरिकांनी या कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी जवळपास २५ लाख कार्ड सक्रिय करण्यात आली असून उर्वरित लाभार्थ्यांनीही लवकर प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण आणि नोंदणी प्रक्रिया राज्यभरातील जवळपास ४ हजारांहून अधिक अधिकृत केंद्रांवर सुरू आहे.

या केंद्रांवर कार्ड मिळविणे, नोंदणी करणे तसेच कार्ड सक्रिय करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रतीक्षा न करता जवळच्या केंद्रावर जाऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

१ ऑगस्टपूर्वी सर्व पात्र लाभार्थ्यांनी एनसीएमसी स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते सक्रिय करावे. जेणेकरून प्रवास सवलतींचा लाभ अखंडपणे मिळू शकेल, असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

### चार हजारांहून अधिक वितरण केंद्र

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात चार हजारांहून अधिक एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे, यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल.

## लहान मुलीसह विवाहिता बेपत्ता

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील वाशिवली येथून लहान मुलीसह विवाहित महिला दि. ९ जून २०२६ पासून बेपत्ता झाल्याची घटना घडली असून कुणाल दंडप्राणी साहू (३५) याने आपली पत्नी मिनाक्षी साहू (२५) व मुलगी शिवाणी साहू (५) या बेपत्ता झाल्याची माहिती रसायनी पोलीस ठाण्यात दिली आहे. कुणाल दंडप्राणी साहू हे कामावरून घरी आले असता मुलगी शिवाणी ही मोबाईल घेऊन बसली होती. मुलीकडे मोबाईल का दिला म्हणून पत्नी मिनाक्षीला विचारले असता त्यांच्यात किरकोळ वाद झाला. या वादामुळे मिनाक्षी साहू ही शिवाणीला घेऊन कुठेतरी निघून गेली आहे. मिनाक्षी साहू हिचे वर्णन रंगाने सावळी, चेहरा गोल, उंची ५ फूट, अंगाने मध्यम, अंगामध्ये सफेद रंगाचा पंजाबी ड्रेस निळ्या रंगाचा सलवार, काळ्या रंगाची ओढणी, पायात सफेद रंगाची चप्पल, डाव्या हातात बांगडी असे वर्णन आहे. तर शिवाणी कुणाल साहू रंगाने सावळी, चेहरा गोल, उंची २.५ फूट, अंगाने सडपातळ, अंगामध्ये घातलेला लाल रंगाचा फ्रॉक, पायात जांभळ्या रंगाची सँडल असे वर्णन आहे. रसायनी पोलीस ठाण्यामध्ये मिसिंग तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## गायमुख शाळेचे आधुनिक शिक्षणाच्या दिशेने पाऊल



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रायगड जिल्हा परिषद शाळा, गायमुख येथे डिजिटल शिक्षणाला चालना देण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.

शाळेसाठी आवश्यक असलेल्या इंटरॲक्टिव्ह बोर्ड खरेदीसाठी मा. आशा भट्टाचार्य (मिरा रोड, जि. ठाणे) यांनी आर्थिक सहाय्य दिले असून, कृष्णा महाडिक यांच्या विशेष प्रयत्नातून ९० हजार रुपये रकमेचा धनादेश गावचे अध्यक्ष कृष्णा खांडेकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या आधुनिक इंटरॲक्टिव्ह बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दृकश्राव्य स्वरूपात शिक्षण घेता येणार असून, अध्यापन अधिक प्रभावी, रंजक व तंत्रज्ञानाधारित होणार आहे. डिजिटल साधनांच्या वापरामुळे विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढण्यास तसेच शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी आशा भट्टाचार्य यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच कृष्णा महाडिक यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शाळेला ही महत्त्वपूर्ण मदत मिळाल्याबद्दल त्यांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी करण्यात आलेले हे योगदान निश्चितच प्रेरणादायी असून, गायमुख शाळेच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा देणारे ठरणार आहे.

# पावसाअभावी शेतीची कामे खोळंबली



**। तळा । प्रतिनिधी ।**

लांबलेल्या पावसामुळे बळीराजा मेटाकुटीला आला असून पावसाअभावी जिल्ह्यातील शेतकऱ्यांची शेतीची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे पावसाची वाट बघत शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागून राहिले आहेत.

यंदाच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांपुढे पेरणीचे मोठे संकट निर्माण झाले आहे. जिल्ह्याभरातील शेतकरी अद्यापही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या काही दिवसांपासून तळा तालुक्यात केवळ रिमझिम स्वरूपाचा पाऊस पडत असल्याने शेतीसाठी आवश्यक ओलावा निर्माण झालेला नाही. त्यामुळे पेरणी करावी की आणखी काही दिवस थांबावे? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. अपुऱ्या पावसामुळे घाईने पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, शासनानेही शेतकऱ्यांना घाईघाईने पेरणी न करता योग्य पावसाची वाट पाहण्याचे आवाहन केले आहे. हवामान खात्यानेही पावसाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी राहण्याचे संकेत दिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत अधिक भर पडली आहे.

## प्रसाद पाटील यांचा सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

भारत सरकारचे सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करीत असते. भजन क्षेत्रातील केलेल्या सेवेबद्दल महाराष्ट्र भजनभूषण कर्जतचे गजानन पाटील यांचे सुपुत्र प्रसाद गजानन पाटील यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भजनभूषण गजानन बुवांच्या पावलावर पाऊल ठेऊन भजन क्षेत्रातील सेवेसाठी आणि समाज प्रबोधनात्मक कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. केंद्रीय सामाजिक न्याय विभागाचे राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. नॅशनल सिव्हीक अँड इन्व्हरमेंट प्रोटेक्शन कॉन्सिल यांच्या माध्यमातून ही पुरस्कार दिले जातात.

या सन्मानामुळे भजन क्षेत्रातील कार्याला राष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाला असून सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक योगदानाची दखल घेण्यात आली आहे, अशी भावना भजन क्षेत्रातील गायक व्यक्त करीत आहेत.



## सीसीटीव्ही खांबाची दयनीय अवस्था

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

करंजाडे येथील सेक्टर ६ परिसरात नागरिकांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या खांबाला अज्ञात वाहनाने धडक दिली. त्यामुळे त्याची दयनीय अवस्था झाली आहे. खांब वाकलेल्या स्थितीत असून तो रस्त्यावर कोसळला आहे. या सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत होते. मात्र खांबाचे नुकसान झाल्यामुळे कॅमेऱ्याच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक रहिवाशांनी संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून खांबाची दुरुस्ती करावी, तसेच सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ववत कार्यान्वित करावी, अशी मागणी केली आहे.

## क्रीडा दंत चिकित्सा शिबीर




**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या विद्यमाने प्राचार्य डॉ. प्रो. प्रिया पारकर यांच्या आशीर्वादाने गुरुवारी (दि.११) सायंकाळी 'क्रीडा दंत चिकित्सा' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दंत चिकित्सक डॉ. श्रेया सिंधी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. तीर्थ भूतडा, डॉ. श्रेता पाटील यांच्या टीमने खेळाडू विद्यार्थ्यांना याची माहिती दिली.

कबड्डी हा घुसमुळेपणाचा खेळ असल्याने शरीराच्या कोणत्याही अवयवाला दुःखापत होऊ शकते. ती झाल्यानंतर उपचारावर भरमसाट पैसा खरंच करण्यापेक्षा तो होऊ नये व झालाच तर त्याची तीव्रता कशी कमी होईल, याची योग्य माहिती डॉ. सिंधी यांच्या टीमने दिली. त्याकरिता डॉ. सिंधी यांनी खास 'डेंटल कॅप' तयार केली असून त्यांनी खेळाडूंना ती वापरण्याचा सल्ला दिला. या शिबिरात राणाप्रताप तिवारी, शशी राऊत, वर्षा भोसले यांनी काही प्रश्न विचारून आपले समाधान करून घेतले. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाच्या कबड्डीप्रेमी प्राचार्य डॉ. प्रो. पारकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार घालून करण्यात आले.

या शिबिरास क्रीडा अधिकारी अनिल घुगे, राणाप्रताप तिवारी, वर्षा भोसले, दिपक मसुरकर, राजेंद्र अधटराव, विद्याधर घाडी, अनिल पाटील व शशी राऊत आदी मंडळी उपस्थित होती.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक निधीची तरतूद | नवी मुंबई महानगरपालिकेला निवेदन**

# विरंगुळा केंद्रांचे करार पाच वर्षांचे होणार



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांच्या कराराचा कालावधी लवकरच पाच वर्षाचा होणार आहे.

नवी मुंबईतील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रांचा कराराचा कालावधी पाच वर्षावरून एक वर्षाचा केल्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांमध्ये असंतोष होता. ज्येष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांना या करारासाठी कागद पत्राचा सतत पाठपुरावा करावा लागतो. ज्येष्ठ नागरिकांना करारासाठी होणारा त्रास दूर व्हावा, म्हणून सानपाडा नागरिक संघाच्यावतीने विरंगुळा केंद्रांचे करार कायमस्वरूपी करावे. त्याचप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेने ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्थसंकल्पात आर्थिक निधीची तरतूद केली आहे. हा निधी विरंगुळा केंद्राना उपलब्ध करून केंद्रांच्या विकासासाठी वापरावा, अशी लेखी मागणी महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री मा.गणेश नाईक यांच्याकडे करण्यात आली. सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी विरंगुळा केंद्रांच्या कराराबाबत योग्य बाजू मांडल्यानंतर ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री व वनमंत्री मा. गणेश नाईक यांनी विरंगुळा केंद्रांचे करार पाच वर्षाचे करा, अशा प्रकारचे आदेश नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्यामुळे आता लवकरच विरंगुळा केंद्रांच्या कराराचा कालावधी पाच वर्षाचा होणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक अंदाजपत्रकात ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक निधीची तरतूद केल्याबद्दल सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ११ जून रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात ग्रहात झालेल्या जनता दरबारप्रसंगी नवी मुंबईचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री, पालघर तसेच ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गणेश नाईक यांचा संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव आणि माजी अध्यक्ष राम काजरोलकर यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी शिवसेनेचे (उबाठा पक्षाचे) उपशहर प्रमुख अजय पवार यांनी सानपाडा येथील पाणी टंचाईबाबत आणि पामबीचमार्गे येणारी पाण्याची ४००मिमी पाईप लाईन रेल्वे कारशेड जवळील रेल्वे ट्रॅक खालून जोडून देण्यासाठी लेखी निवेदन मंत्री महोदयांना दिले. मंत्री महोदयांनी नवी मुंबईतील वाढती लोकसंख्या, पाऊस वेळेत न पडल्यामुळे मोरबे धरणातील पाण्याचा तुटवडा, रायगड जिल्ह्यात नवीन धरणाची निर्मिती, नवी मुंबईकरांना भविष्यात मिळणारे पाणी याबाबत सविस्तर माहिती दिली.

## निवडक



### वृक्षारोपण सोहळा उत्साहात

**माथेरान :** आपली वसुंधरा अधिक सुंदर, हिरवीगार आणि प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने गुरुवारी (दि.११) भव्य वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईमधील वृक्षप्रेमी अजित गोखले, चिकेरूर आणि सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा यांच्या माध्यमातून हा भव्य वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आजी, माजी लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे, सर्वपक्षीय पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. करंज, बेल, फणस, बकुळ, वड, पेरू, कदंब, कडुलिंब, कांचन, पळस अशा विविध प्रकारच्या रोपांची लागवड रेल्वे स्टेशन भागातील मुख्य रस्त्यालगत, श्रीराम मंदिराच्या आवारात सर्वांच्या सहकार्याने यावेळी करण्यात आली. वृक्ष हेच आपल्या जीवनाचा खरा आधार आहेत. येणाऱ्या पिढीला शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि निरोगी जीवन देण्यासाठी वृक्षारोपण ही आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. या पवित्र आणि सामाजिक कार्यात सर्वांचे अनमोल योगदान अनमोल लाभले आहे. 'एक वृक्ष लावा, भविष्यासाठी आशेचे बीज रुजवा!' ही संकल्पना सर्वांनी मिळून राबविण्यात यावी, असे मत माथेरानमधील सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा यांनी व्यक्त केले.




### अल्काईल अमाईन्सतर्फे शाळेला मदत

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील अल्काईल अमाईन्स केमिकल्स लिमिटेड, पाताळगंगा यांनी आपल्या सीएसआर वचनबद्धतेतून सामाजिक बांधिलकीचा उत्तम आदर्श घालून दिला आहे. ९ मे रोजी आलेल्या अचानक वादळामुळे जिल्हा परिषद शाळा, वावंढळ येथील किचन आणि वर्गखोल्यांच्या वरील ६३ पत्र्यांचे मोठे नुकसान झाले होते. पावसाळा तोंडावर आल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शिक्षणाचे सातत्य धोक्यात आले होते. शाळेच्या प्रिन्सिपल योगिता पाटील यांनी त्वरित अल्काईल अमाईन्सला या बाबतीत तातडीने मदत करण्याची विनंती केली. अल्काईल अमाईन्स कंपनीने त्वरित दखल घेत आपत्कालीन दुरुस्तीचे काम हाती घेऊन शाळा सुरू होण्यापूर्वीच सर्व ६३ पत्रे बदलून नवीन पत्रे बसवून दिले. वेळेत काम पूर्ण झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळले व आता सुरक्षित वातावरणात शाळा सुरू होऊ शकेल, याबद्दल शाळा व्यवस्थापन, ग्रामस्थ व पालकांनी अल्काईल अमाईन्स केमिकल्स लिमिटेडचे विशेष आभार मानले आहेत.




### संपदा चव्हाण पुरस्काराने सन्मानित

**पाली/बेणसे :** सविधान अमृत महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सेवा प्रतिष्ठान संगमनेर जिल्हा अहिल्यानगर येथे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. रविंद्र घोसाळे यांच्या संकल्पनेनुसार हा महोत्सव साजरा करण्यात आला. यामध्ये पेण येथील भारतीय बौद्ध महासभेच्या माजी जिल्हाध्यक्ष तथा ज्येष्ठ प्रवचनकार संपदा चव्हाण यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घराण्याशी एकनिष्ठ राहून गेली अनेक वर्ष त्यांनी बौद्ध महासभेच्या धार्मिक संघटनेत काम करत असताना आजवर संपदा चव्हाण यांनी विविध पदांवर काम केले असून त्या उत्कृष्ट वक्त्या आहेत. बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार अधिक व्हाव या दृष्टिकोनातून त्यांनी प्रयत्न केले आहेत. संपदा सतोष चव्हाण या असून त्या उच्च विद्याविभूषित आहेत. त्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील करंजाडे येथे वास्तव्यास असून, शिक्षण क्षेत्रात मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. उरण तालुक्यातील धुतूम येथील शाळेत त्या विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कारांचेही धडे देत आहेत. गेली पंचवीस वर्षे त्यांनी बौद्ध समाजात धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यांचे महत्वपूर्ण कार्य सातत्यांने केले आहे. बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार अधिक व्हावा, या दृष्टिकोनातून त्यांनी रायगड जिल्ह्यात महिलांचे संघटन मजबूत केले आहे. त्यांच्या या कार्यादखल घेत सेवा प्रतिष्ठान संगमेनर तर्फे त्यांना भिमरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### प्रवाशांसाठी नवा जोडणी पूल

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकातील प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून विविध सुविधा उभारण्याची कामे वेगाने सुरू आहेत. स्थानक परिसरात प्रवाशांच्या सोयीसाठी आणखी एका नवीन जिन्याचे बांधकाम सुरू असून त्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. याशिवाय स्थानकाच्या पुढील व मागील बाजूस असलेल्या दोन पादचारी पुलांना जोडणारा मोठा जोडणी पूल (कनेक्टिंग ब्रिज) उभारण्यात येत आहे. हा पूल सुरू झाल्यानंतर प्रवाशांना एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जाण्यासाठी होणारी धावपळ व गर्दी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. दरम्यान, पनवेलकर्जत रेल्वे मार्गावरील प्लॅटफॉर्म विकासाचे कामही सुरू असून त्या ठिकाणी नवीन जिना उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर पनवेल रेल्वे स्थानकातील प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुलभ आणि सोयीस्कर होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# 'रेनबो स्कूल स्क्रीनिंग प्रोग्राम'मधून लाखो विद्यार्थ्यांना नवदृष्टी

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

शाळकरी मुलांमधील दृष्टीदोषांचे वेळेवर निदान करून त्यांना योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने शंकरा आय हॉस्पिटलतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'रेनबो स्कूल स्क्रीनिंग प्रोग्राम'ने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. जून २०२२ ते मार्च २०२६ या कालावधीत देशभरातील ५६३ शाळांमधील तब्बल २ लाख ३३ हजार ३५७ विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करण्यात आली असून हजारो मुलांना याचा लाभ झाला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमधील दृष्टीसंबंधित समस्या लवकर ओळखून त्यावर उपचार करण्यावर भर देण्यात आला. तपासणीदरम्यान दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना ७ हजार ८०१ चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच गंभीर नेत्रविकारांचे निदान झालेल्या ३२ मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना नवदृष्टी देण्यात आली.

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रम तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने ही मोहीम ठाणे, उरण, मुंबईसह आरोग्यसेवांपासून वंचित असलेल्या अनेक भागांत राबविण्यात आली. त्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध झाली.

याबाबत माहिती देताना शंकरा आय हॉस्पिटल, पनवेलचे मुख्य वैद्यकीय अधिकारी व कॉर्निया तज्ज्ञ डॉ. गिरीश शंकर बुधराणी यांनी सांगितले की, अनेक मुलांना स्वतःलाच दृष्टीदोष असल्याचे समजत नाही. याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर, आत्मविश्वासावर आणि सर्वांगीण विकासावर होतो. शाळांमधील नियमित नेत्रतपासणीमुळे अशा समस्या लवकर ओळखता येतात आणि वेळेवर उपचार करणे शक्य होते.

**मुरूड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड**
**निविदा सूचना सन २०२६-२७**
**जा.क्र.मुनप/निविदा/५५०/२०२६-२७**

मुख्याधिकारी, मुरूड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून 'मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीत स्वच्छतेविषयक माहिती शिक्षण व प्रसार कार्यक्रम राबविणे'या कामाची निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील व अटी-शर्ती मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात दिनांक १३/०६/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक १९/०६/२०२६ आहे.

दिनांक : १२/०६/२०२६

सही/-
**(सचिन बच्छाव)**
मुख्याधिकारी
मुरूड जंजिरा नगरपरिषद

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. वसंत परशुराम म्हात्रे, रा. पळी, आंबेघर, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी मौजे कुरकुंडी कोलटेंभी येथील खालील वर्णनाची मिळकत संबंधित मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| कुरकुंडी कोलटेंभी | १२३ | जिरायत १-२१-०० पो.ख. ०-१७-०० एकूण १-३८-०० यापैकी ०-२५-०० | १.९४ | श्री. लालचंद गंगाधर पाटील |

वर नमूद मिळकतीपैकी गट नं.१२४ च्या लगतची पुर्व, पश्चिम व दक्षिणेकडील क्षेत्र ०-२५-०० हे.आर. ही मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले आहे. सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्याचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, रस्त्याच्या वहिवाटीचे हक्क, वारसा हक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास त्यांनी अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांच्यावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध व हक्क नाही. अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे. असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १३-०६-२०२६

सही/-
**ॲड. विक्रांत विनायक पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

## टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री गंगाधर कारभारी जाधव रा. वाकस, ता. कर्जत, जि. रायगड यांनी त्यांचे अविभक्त सामाईक मालकी हिश्याची खालील शेतजमीन मिळकत सौ. सितेश छारी यांना कायमचे विकण्याचे ठरविलेले आहे. सबब सदरील मिळकती संबंधीचे त्यांचे मालकी हक्काबाबत टायटल व्हेरीफिकेशनसाठी हरकती मागविल्या आहेत.

**मौजे वाकस, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील**

| गट नं./हिस्सा नं. | एकुण क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ५२/६अ | १-००-०० पो.ख.०-०५-०० | १-३१ |

पैकी श्री. गंगाधर कारभारी जाधव यांचे अविभक्त हिश्याचे ०-१३-०० हे.आर.पॉ.इतके क्षेत्र

सबब सदर मिळकतीचे टायटल संबंधाने सबब सदर शेतजमीन मिळकतीचे टायटल संबंधाने कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास, गहाण, दान, लीन, अन्नवस्त्र, बँकबोजा हक्क अधिकार, हितसंबंध, करारमदार, साठेखत, जनरल मुखत्यार अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवावी. नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल. यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कर्जत
दि. १३/०६/२०२६

सही/
**ॲड. नवनाथ कालिदास साळुंके**
ॲडव्होकेट आणि नोटरी
२०६, विंग-४, तुलसी आंगण सोसायटी,
स्टेशन रोड, PWD ऑफिस शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. पिन - ४१०२०१.
फोन: - ९८८१८४७०००
E-mail- adv.nksalunke@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १.श्री.अहमदअली मुनावरअली कुरेशी, २.श्री.जाकीर मुनावरअली कुरेशी - ३. श्रीमती समीम बनो अयुब बडगुजर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतींचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे-सावेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| १९ | ५ | ०-१७-८० या पैकी विकत दिलेले क्षेत्र ०-१३-९० | ०-१७ |

वर नमुद मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १२/०६/२०२६

**ॲड. प्रविण पुंडलिक कराळे**
पत्ता. ओमकार अपा. मु. डिकसळ पो. कोषाणे
ता. कर्जत, जि. रायगड मो. ९९७५०९०३०४

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रामदास लक्ष्मण कावजी रा.मु.पो.खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| खंडाळे ता.अलिबाग जि.रायगड | १४९ | ०-३३-५० ०-०६-८० एकूण ०-४०-३० | ७.९६ |

सदरहू ०-४०-३० हे.आर.या क्षेत्रापैकी ०-१६-० हे.आर. इतक्या क्षेत्राची मिळकत.

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी,चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट,कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारती हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारची हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ११-०६-२०२६

सही/-
**ॲड. नंदकुमार पां. तांबडकर**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु.पो. सुडकोली, ता. अलिबाग,
जि. रायगड मो.नं.९०११७७९०८१

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे तलवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक अनंत लक्ष्मण सावंत यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| तलवडे ता.अलिबाग जि.रायगड | १८१ | क्षेत्र ०.४१.४० पो.ख. ०.००.०० एकूण क्षेत्र ०.४१.४० | ४.०३ |

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ११/०६/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग,
जि. रायगड. मो.नं. ९८२२१८६७४०

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. मीना सुनिल पोफळे, श्री. सुनिल हरिपंत पोकळे यांचे मालकीची, ताबेकब्जा, वहिवाटीची आहे. सदर मिळकत ही आमचे अशिलांना विकण्याची आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे. सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध नाही.

सदर मिळकतीची आम्ही विक्री करत असल्याने सदर व्यवहारास कोणाची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| कोळगाव ता. अलिबाग | ३५७ | ०-५४-०० पो. ख ०-१६-८० एकुण क्षेत्र ०-७०-८० | ०.८२ |
| कोळगाव ता. अलिबाग | ३५६/२ | ०-३१-६० पो. ख ०-०४-४० एकुण क्षेत्र ०-३६-०० | ०.५० |

वर नमुद मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक- १२/०४/२०२६

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय-रायगड, ता. अलिबाग,
जि. रायगड मोबाईल नं ९७६४२१४०१०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे महाळुंगे बु., ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या वरकस मिळकतीचे विद्यमान मालक रेश्मा निलेश जैन, निलेश भवरलाल जैन, संतोष रतनचंद जैन, विनीत संतोष जैन, राजेश रतनचंद जैन उर्फ गांधी, कांचन भवरलाल जैन, सुरेश लादमल जैन, ललिता सुरेश जैन व राहुल सुरेश जैन, सर्व रा. मु.पो. रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली वरकस मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| महाळुंगे बु. ता.मुरुड | ४०/५/अ | - | २-१९-०० पो.ख. ०-२८-०० एकूण २-४७-०० | २.२५ |

सबब सदरहू वरकस मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक ११/०६/२०२६

सही /-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे कोर्लई, ता. मुरुड, जि. रायगड येथील विद्यमान मालक तौफिक अब्दुल सत्तार नागोठणेकर यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या बिनशेती मिळकतींच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. विद्यमान मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व त्या विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ठ**
**ता. मुरुड, जि. रायगड येथील**

| मौजे | सर्व्हे क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| कोर्लई | ५७/१ | ०-३२-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-३३-०० | ०.६२ |
| कोर्लई | ५७/२ | ०-२५-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-२६-०० | ०.४७ |

अलिबाग
तारीख : १३/६/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/ मा. अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ महाराष्ट्र
दिनांक :- ११/०६/२०२६

मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

केसरीया अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सिटी सर्व्हे नं. २८ब/२अ, मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड यांनी विकासक व जागामालक, १. श्री हिरालाल शेषमल ओसवाल, रा. पहिला मजला, केसरीया अपार्टमेंट, सरकारी दवाखाना जवळ, आंबेडकर चौक, ता. कर्जत, जि.रायगड- ४१०२०१, २. श्री मोहनलाल केसरीमल ओसवाल, रा. दुसरा मजला, केसरीया अपार्टमेंट, सरकारी दवाखाना जवळ, आंबेडकर चौक, ता. कर्जत, जि.रायगड- ४१०२०१, ३.श्री कुंदनमल नरसीलाल ओसवाल, रा. प्रितम अपार्टमेंट, पहिला मजला, जैन मंदिर जवळ, महावीर पेठ, ता.कर्जत,जि. रायगड-४१०२०१, ४ श्री प्रकाश मोहनलाल ओसवाल, रा. दुसरा मजला, केसरीया अपार्टमेंट, सरकारी दवाखाना जवळ,आंबेडकर चौक, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०२०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
रायगड जिल्ह्यातील ता.कर्जत, मौजे कर्जत येथील नगर भूमापन क्रमांक-२८ब/२अ, क्षेत्र ८७१ चौ.मी.,

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २३/०६/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक- ११/०६/२०२६

**(त.सं.पाटील)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे बामणगांव, ता.अलिबाग येथील मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणगांव | १६८/१ | १-७४-२० पो.ख. ०-१४-२० १-८८-४० | २५.४४ |


पैकी श्रीम. वनश्री बाळाराम थळे व श्री. सुबोध बाळाराम थळे यांच्या मालकीची १ हे. २६.४० आर एवढ्या क्षेत्रापैकी ० हे. ६० आर ही मिळकत

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. १३/०६/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

**रवि. दि. २८ जून सायं. ५ वा.**
**पीएनपी नाट्यगृह (अलिबाग)**
ऑनलाईन तिकिट विक्री bookmyshow सुरु
तिकिट विक्री २५ जूनपासून नाट्यगृहावर सुरु


तिकिटांसाठी संपर्क - चंद्रकांत पानकर ९८८१४६२४६६
संपर्क - विकास पावसकर ९९२०६२९९२३, सुनील पानकर ९४२२६३०१०५

**अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ. व रि.), महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
क्र. आरटीएस-२८२२/प्र.क्र.७१६/ज-४ अ प्र. क्र. ३९९ (०३) २०२५ / अवपु

**श्री. अफताब शेरीफ मर्चेट** ...अर्जदार
**विरुध्द**
**सिटी सर्व्हे ऑफिसर, अलिबाग व इतर** ...गैरअर्जदार

न.भू. अलिबाग येथील न.भू.क्र. १२३८ क्षेत्र ५६६ चौ. मी. या वादमिळकतीबाबतच्या, प्रकरणातील उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांचे आदेश अपील क्र. ९५३/२००८ दि. ०५/०९/२००९ रोजीच्या आदेशाविरूध्द प्रस्तुत अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २५७ व २५८ अन्वये महाराष्ट्र शासनाकडे दाखल केलेल्या पुनरिक्षण अर्जावर अपर मुख्य सचिव (अपिल व रिव्हीजन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

२. सदर फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने दि. २९/०५/२०२६ रोजी आयोजित सुनावणी-दरम्यान अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. ४, ६ तसेच ९क हे फेरतपासणी अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने त्यांना सदर प्रकरणी नोटीस बजावणे शक्य नसल्याचे ह्या न्यायालयाच्या निर्दशनास आणुन दिले. सबब सदर गैरअर्जदारांना दि. २०/०८/२०२६ रोजी या प्रकरणी आयोजित सुनावणीबाबत उपस्थित राहण्याबद्दल कळविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याचे निर्देश दि. २९/०५/२०२६ रोजीच्या सुनावणीदरम्यान देण्यात आले.

| अ. क्र. | गैरअर्जदाराचे नाव | गैरअर्जदाराचा पत्ता |
|---|---|---|
| १ | श्रीम. रजनी श्याम विचारे | सुभाष नगर, रामदेव खिल्जी नायक चौक बांद्रा (पु.) मुंबई |
| २ | श्रीम. सबिना अमीराली मर्चेट | ९७/२०१, पुनम चेंबर्स, शांती पार्क, मीरा रोड (पु.) जि. ठाणे - ४०११०७ |
| ३ | श्रीम. जयश्री आशिष म्हात्रे | हॉटेल सनग्लो, फेस रोड नगर पालिका रोड अलिबाग |

**नोटीस पोहोच न होण्याचे कारण :** नमुद पत्त्यावर राहत नसल्यामुळे

३. सदर पक्षकार उक्त नमुद दिनाकांस सुनावणीच्या वेळी उपस्थित न राहिल्यास, सदर फेरतपासणी अर्जावर त्यांच्या अनुपस्थितीत एकतर्फी निर्णय पारित करण्यात येईल.

४. सदर समन्स मा. अपर मुख्य सचिव, अपिल व रिव्हिजन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई या न्यायालयाचे आदेश क्र. प्र. क्र. ३९९ (०३) २०२५ / अवपु दि. ०१/०६/२०२६ निर्देशानुसार प्रसिद्ध करणयात येत आहे.

## जाहीर नोटिस

**महसूल व वन विभाग**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय**
**कचेरी रोड, माणगांव, ता.माणगांव, जि. रायगड**
Email ID : altmangaon@gmail.com

जाहीर सुनावणी नोटीस — EQJ COURT NO. 85/2025
प्रति, — दावा क्रमांक: ८५/२०२५
१. श्रीम. सरस्वती गणपत लोंढे — वादी
रा. नानवली ता. तळा जि. रायगड
विरूद्ध
१. अनुसया विश्वनाथ पोतदार (मयत) वारस
१.१ अनंत विश्वनाथ पोतदार १.२ गजानन विश्वनाथ पोतदार — प्रतिवादी
१.३ दत्तात्रेय विश्वनाथ पोतदार १.४ सरला शामराव चोनकर
१.४ कुंदा सुमन हाटे
रा. तळा ता. तळा जि. रायगड

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवुन मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक ०३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वत: वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवुन न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसुची**

| गावाचे नांव | स.नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| नानवली ता. तळा | १६/६/ड | ०-१४-५० | ०-३१ |

ठिकाण:- माणगांव
दिनांक:- १२/०६/२०२६

सही/-
**(दिप्ती देसाई)**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव**

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
Email : panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०५/२१२/२६ दिनांक :-११/०६/२०२६

प्रति
श्री/श्रीमती.....
मा. सदस्य/ सदस्या,
पनवेल महानगरपालिका

संदर्भः
१. पनवेल महानगरपालिका सर्व साधारण सभा क्र.५, बुधवार दिनांक २०/०५/२०२६ रोजीची विषयपत्रिका.
२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडील दिनांक १८/०५/२०२६ रोजीचे पत्र.
३. पनवेल महानगरपालिका, सचिव कार्यालय यांचे दिनांक १९/०५/२०२६ रोजीचे शुद्धीपत्रक. ४. मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडील दिनांक ०५/०६/२०२६ रोजीचे पत्र.

महोदय/ महोदया,

संदर्भ क्र. १ अन्वये पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र. ५ बुधवार, दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. तथापि, संदर्भ क्र. २ अन्वये भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा करण्यात आल्याने रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू झाली. त्यानुषंगाने, संदर्भ क्र. ३ अन्वये पनवेल महानगरपालिकेची दिनांक २०/०५/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली सर्वसाधारण सभा आचारसंहिता कालावधीकरिता स्थगित करण्यात आली होती. संदर्भ क्र. ४ अन्वये रायगड - रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध झाल्याने आदर्श आचारसंहिता संपुष्टात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आलेली पनवेल महानगरपालिकेची दिनांक २०/०५/२०२६ रोजीची सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता महापालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर सभेचे कामकाज सर्वसाधारण सभा क्र. ०५, दिनांक २०-५-२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेनुसार करण्यात येईल.

(मा. महापौर यांचे आदेशान्वये व मंजुरीने)

सही/-
**नानासाहेब कामठे**
महापालिका सचिव
पनवेल महानगरपालिका

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*
● दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८
● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : जुनी येणी अनपेक्षितरित्या वसूल होतील. आत्मविश्वास वाढीस लागेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृषभ** : मुलांची चिंता राहील. व्यवसायात अडचणींचा सामना कराल. प्रवास शक्यतो लांबणीवर टाकावा.
- **मिथुन** : आप्तेष्टांच्या भेटीनं समाधान लाभेल. नोकरीत उत्कर्षाच्या संधी लाभतील. कामाचा ताण राहील.
- **कर्क** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. घरगुती वाद शक्यतो टाळावे. ज्येष्ठांची प्रकृती सांभाळावी.
- **सिंह** : दिलासादायक घटना घडतील. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. नव्या योजनांना गती मिळेल.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात मनाजोगी प्रगती होईल. नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्याव्या. बाकी चिंता नसावी.
- **तूळ** : कलाकारांना उत्तम संधी लाभतील. महत्त्वाच्या खरेदीला चालना मिळेल. अनावश्यक खर्च टाळावा.
- **वृश्चिक** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. यंत्रांचा वापर काळजीपूर्वक करावा. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **धनु** : चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. कामावरील लक्ष विचलित होईल. मुलांच्या प्रकृतीकडे लक्ष द्यावं.
- **मकर** : हाती घेतलेली कामं व्यवस्थित पार पडतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. पैसा हाती येईल.
- **कुंभ** : फार धावपळ, दगदग करू नका. विद्यार्थ्यांना मनाजोग्या संधी मिळतील. अनावश्यक खर्च टाळावा.
- **मीन** : कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल. धाडसानं काही निर्णय घ्यावे लागतील. प्रेमिकांना दिलासा मिळेल.

ब्युटी टॉक

## तंत्र फेस मास्क वापराचं

बाजारात विविध प्रकारचे फेस मास्क मिळतात. मात्र आपल्या गरजेनुसार आणि त्वचेच्या प्रकारानुसार त्याची निवड करायला हवी. फेस मास्क निवडताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं याविषयी...

उद्देशानुसार फेस मास्कचा प्रकार बदलतो. म्हणजे त्वचेला ओलावा देण्यासाठी, मृत त्वचा काढण्यासाठी, त्वचा उजळवण्यासाठी वेगळा फेस मास्क वापरायचा असतो. त्यामुळे फेस मास्क लाऊन आपण काय साधणार आहोत, हे आधी समजून घ्या. त्वचेला ओलावा द्यायचा असेल तर मॉईश्चरायझिंगचे घटक असणाऱ्या फेस मास्कचा वापर करा. चेहरा उजळवायचा असेल तर क जीवनसत्त्व किंवा कॉजिक ॲसिडयुक्त फेस मास्क निवडा. मृत त्वचा काढण्यासाठी रेटिनॉल किंवा अ जीवनसत्त्व असणारा फेस मास्क विकत घ्या. फेस मास्कमधले प्रमुख घटकच त्यात शोषले गेलेले असतात. इतर फक्त नावालाच असतात. दुसरं म्हणजे फेस मास्ककडून वास्तववादी अपेक्षा ठेवा. त्यानुसार त्यातले घटक निवडा. **(क्रमश:)**

## १३ जून — दिनविशेष

- **१९६९** : सुप्रसिद्ध लेखक प्रल्हाद केशव अत्रे यांचे निधन.
- **२०००** : पोप जॉन पॉल (द्वितीय) यांच्यावर हल्ला करणाऱ्या महंमद अली आग्काला इटलीने माफ केले.
- **२०१३** : धनबाद–पाटणा इंटरसिटी एक्स्प्रेसवरील हल्ल्यात रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानासह तीन ठार.
- **२०१७** : पाचशे रुपयांची नवी नोट जारी.
- **२०१८** : कार्ती चिदंबरम यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल.

टेक फन

## मायक्रोसॉफ्टचं ‘सीईंग व्हीआर’

दोस्तांनो, मध्यंतरी मायक्रोसॉफ्टने एक व्हर्च्युअल रिॲलिटी हेडसेट तयार केला. यामुळे दृष्टी अधू असली तरी गेम्स खेळता येतात. व्हर्च्युअल रिॲलिटी या तंत्रज्ञानाचा वापर करून हा हेडसेट तयार करण्यात आला आहे. व्हर्च्युअल रिॲलिटीचा भन्नाट अनुभव तुम्हाला मिळू शकतो. गेम्स खेळताना व्हर्च्युअल रिॲलिटी तुम्हाला आकर्षित करू शकते. पण चष्मा असणाऱ्यांना कमकुवत दृष्टीमुळे व्हीआरचा चांगला अनुभव घेता येत नाही.

मायक्रोसॉफ्टने सीईंग व्हीआर नावाचं एक किट तयार केलं. यात १४ टूल्स आहेत. बायोफोकल लेंस, मॅग्नीफायर, ब्राईटनेस आणि कॉन्ट्रास्ट कमी किंवा जास्त करण्याची सुविधा, डेप्थ मॅनेजमेंटसारख्या टूल्सचा यात समावेश आहे. या टूल्सच्या मदतीने युजर्सना उत्तम अनुभव मिळू शकतो. या व्हीआर टूल किटची चाचणी घेण्यात आली आहे. यासाठी अकरा जणांची निवड करण्यात होती. या अकरा जणांची नजर कमकुवत होती. मात्र या किटच्या वापरामुळे त्यांना व्हीआरचा खूप भन्नाट अनुभव मिळाला.

### पंचांग

**शनिवार, १३ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ कृ. १३, चंद्रराशी : मेष,
नक्षत्र : कृत्तिका, योग : सुकर्मा,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१५

### फॉरवर्ड्स

**जिनकीं जड़े बंज़र ज़मीन में पनपीं हों...**

**उनकां वजूद क़भी गिरें हुए पत्तों सें नहीं आँकते...!**

आरोग्यमंत्र

## हा तर मनोविकार!

शरीराप्रमाणे मनालाही विविध आजार जडतात. घरात मोठं भांडण होणं, जवळच्या व्यक्तीचा मृत्यू, अचानक संपत्ती जाणं, जीवघेणा अपघात होणं यासारख्या घटनांमुळे मनावर प्रचंड ताण येतो. स्त्रियांना घरात आणि समाजात दुय्यमत्त्व दिलं जातं. त्यामुळे मुळातच मानसिक कोंडमारा असतो. त्यामध्येच अनेकविध आघात झाले तर ते सोसण्याची ताकद, क्षमता अंतर्मनात नसते. ज्या व्यक्ती दुसऱ्यांच्या कलाने वागणाऱ्या असतात; स्वतःचे निर्णय घेता येत नाहीत; दुसऱ्यांनी दिलेल्या सूचना स्वीकारतात अशांच्या आंतरिक मनाचं गोदाम व्यथा–वेदनेनं लवकर भरतं. त्यामुळे काही उपाय करून अंतर्मनातील ताणाचा निचरा करणं ही गरज बनते. काही वेळा बाह्य तणावाचं कारण नसतानाही व्यक्ती झपाटल्यासारखी वागू लागते. म्हणजेच तिचं बाह्य मन आणि अंतर्मन यांतील सुसंवाद संपुष्टात येतो. अशा वेळी व्यक्तीच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलतात. आवाज बदलतो. ती व्यक्ती डोळे मिटून गिरक्या घ्यायला लागते. हातात हात गुंफून घुमायला लागले. तिला कपड्यांची शुद्ध रहत नाही. आजूबाजूच्या वास्तवाचं भान उरत नाही. हे असं का घडतं याची बहुतेकांना कल्पना नसते. व्यक्तींमध्ये देवीचा संचार होतो अथवा तिला भुतानं झपाटलं असल्यामुळे ती असं विक्षिप्त वर्तन करते, या पारंपारिक विचारांचा पगडा असल्यामुळे अशा वर्तनाला भुताचं झपाटणं वा देवी अंगात येणं म्हणतात. मात्र हा गैरसमज आहे.




### फॅशन पॅशन

फॅशनविश्वातला कोणताही ट्रेंड साधारण दोन दशकांनी परत येतो. त्याचप्रमाणे ८० आणि ९० चं दशक गाजवणारा ओव्हरसाईज्ड ट्रेंड पुन्हा लोकप्रिय ठरला आहे. ढगळ कपडे बारीक आणि उंच मुलांना शोभून दिसतात. हा ट्रेंड फॉलो करण्याआधी काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. खालपासून वरपर्यंत ओव्हरसाइज्ड कपडे घालणार असाल तर बेल्ट बॅग किंवा इतर काही ॲक्सेसरीज कॅरी करा. उन्हाळ्यात ही ओव्हरसाइज्ड फॅशन अधिक चांगल्या पद्धतीने कॅरी करता येते. लेअरिंगचे फंडेही तुम्ही वापरू शकता. त्यामुळे शर्टचा साइज थोडा मोठा असेल तर तो बदलून घ्यायची काहीच गरज नाही.

करिअरवाटा

## ...म्हणून शेफ महत्त्वाचा

सध्याच्या घराबाहेर खाणाऱ्यांची संख्या वाढलेली असल्याच्या जमान्यात शेफला मिळणारी प्रसिद्धी आणि पैसा लपून राहिलेला नाही. हा हॉटेल इंडस्ट्रीतला अत्यंत महत्त्वाचा घटक ठरतो आहे. हॉटेलची प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी तिथं मिळणाऱ्या खाद्य पदार्थाच्या चवीवर अवलंबून असते आणि ती चव शेफ निर्माण करत असतो. एखाद्या हॉटेलचा शेफ बदलला तर चवही बदलते आणि त्याचा परिणाम ग्राहकांच्या संख्येवर होतो. त्यामुळे शेफ जपण्याचा प्रयत्न केला जातो. शेफच्या दोन जबाबदाऱ्या महत्त्वाच्या असतात. पहिली म्हणजे खाद्यपदार्थ तयार करण्याचं नियोजन करून त्याप्रमाणे आचाऱ्यांना सूचना करणं. हे नियोजन करताना त्याला संभाव्य ग्राहक कोणत्या राज्यातील आहे, त्याच्या खाण्याच्या सवयी काय आहेत याचा विचार करावा लागतो. आजकाल मोठ्या हॉटेलांमध्ये जगाच्या कानाकोपऱ्यातील ग्राहक येतात. सातत्याने भ्रमंती करणारे अनेक प्रवासी विविध प्रकारच्या अन्नाची चव घेऊन कंटाळलेले असतात. त्यांना आपल्या घरच्यासारखं अन्न खावंसं वाटतं. म्हणूनच शेफला बहुतांश देशातील पदार्थ तयार करण्याची कला अवगत असणं आवश्यक असतं. एकंदर त्याच्यावरच हॉटेलची प्रतिष्ठा अवलंबून असते.



खेचाखेची

## पहिला विमानप्रवास

वत्सला काकू वयाच्या सत्तराव्या वर्षी प्रथमच विमान प्रवास करत होत्या. त्यामुळे त्या बऱ्याच अस्वस्थ होत्या. विमानात चढल्यावर त्या पायलटला भेटल्या आणि म्हणाल्या, अरे, मला सुखरुप परत उतरवशील ना ?

पायलट म्हणाला, खर सांगू का आजी. मी पंधरा वर्षं विमान चालवत आहे. पण अजून कुणाला आकाशात सोडून आलेलो नाही.


वेगळं काही

नायजेरियातल्या एका शाळेने मुलांकडून फी म्हणून प्लास्टिक बाटल्या घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे मुलांना दप्तरासोबतच प्लास्टिक बाटल्यांनी भरलेली पिशवीही न्यावी लागते. या बाटल्यांचं वजन केल्यानंतर मिळणारी किंमत त्यांच्या एकूण फीमधून वजा केली जाते. या उपक्रमामुळे कुटुंबावरचा आर्थिक बोजा कमी झाला शिवाय देशही प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागला. आफ्रिकन क्लीन अप मोहिमेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत असून रिसायकलिंग करणाऱ्या संस्थांचं सहकार्यही यासाठी घेतलं जात आहे. इथल्या मॉरिट इंटरनॅशनल स्कूलने यासाठी पुढाकार घेतला आहे. इतर काही शाळांमध्येही अशाप्रकारे प्लास्टिक बाटल्या स्वीकारल्या जातील.

कुटुंबकबिला

## मुक्या मित्राचं स्वास्थ्य...

पावसाळा सुरू होत आहे. या दिवसात आपण स्वत:ची, घरातील सदस्यांची काळजी घेतो. अशा वेळी लाडक्या पाळीव कुत्र्याला विसरता कामा नये. या दिवसात त्यांना संसर्ग होण्याची शक्यता असते. कुत्री घाण पाण्यात जाणार नाही याची काळजी घ्यावी. अशा पाण्यामुळे त्यांना पारवो व्हायरल होण्याची शक्यता असते. जुलाब, अतिसार अशी त्याची लक्षणं आहेत. त्याची तीव्रता वाढली तर गॅस्ट्राईटिस होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच दिवसात कुत्र्यांचा विणीचा काळही असतो. त्यामुळे भटकी कुत्री त्याच्या आसपास फिरकणार नाहीत याची काळजी घ्या. कुत्री पावसात भिजून किंवा चिखलात लोळून आली तर सर्वप्रथम कोरड्या टॉवेलने पुसून घ्या. त्यानंतर अंग ड्रायरने कोरडं करा. यामुळे खाज किंवा इतर संसर्गाचा धोका राहणार नाही. या दिवसात कुत्र्यांना हेवी डाएट देऊ नये. कच्ची अंडी देण्याऐवजी उकडून द्या. आहारात द्रव पदार्थाची मात्रा असेल याची काळजी घ्या. पावसाळ्यात अनेकदा कुत्र्याला फिरायला नेणं शक्य होत नाही. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागू शकतो. हे टाळण्यासाठी त्याला घरातच जिने चढणं आणि उतरण्याचा व्यायाम करू द्या.



## सुडोकू ११५


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ४ | ८ | | | | ७ | |
| ५ | | ९ | | ६ | | ८ | | |
| २ | | ८ | ९ | | ७ | | ५ | |
| | | ६ | ३ | | | | | ५ |
| ८ | ५ | | | | | | ३ | ७ |
| ३ | | | | | ८ | ४ | | |
| | ८ | | ७ | | १ | ९ | | २ |
| | | २ | | ८ | | ७ | | ३ |
| | ६ | | | | ९ | ५ | १ | ८ |

**टीप –**
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १ | ५ | ९ | ८ | ३ | २ | ४ | ६ |
| ३ | ६ | ४ | ५ | ७ | २ | १ | ९ | ८ |
| ९ | ८ | २ | ४ | ६ | १ | ३ | ७ | ५ |
| ८ | ३ | ६ | ७ | ९ | ५ | ४ | २ | १ |
| ४ | ५ | १ | २ | ३ | ८ | ९ | ६ | ७ |
| २ | ७ | ९ | ६ | १ | ४ | ८ | ५ | ३ |
| ५ | ९ | ८ | १ | ४ | ६ | ७ | ३ | २ |
| ६ | ४ | ३ | ८ | २ | ७ | ५ | १ | ९ |
| १ | २ | ७ | ३ | ५ | ९ | ६ | ८ | ४ |

## शब्दकोडे क्रमांक ११५



**आडवे शब्द :–**
१) निरोप
४) नीच,दुष्ट
६) सूर्योदयापूर्वीचे तीन तास
९) अपमानरीत्या हाकलून देणे
११) झकास
१२) समुद्रातील एक मोठा प्राणी
१४) थरथर
१५) वस्ती
१७) कर्जाऊ रक्कम देणारा
१८) एक प्रकारची मांडी
१९) जोरदार गतीचा(गोलंदाज)
२१) फांदी तुटतानाचा आवाज
२३) उत्कर्षाचा काळ
२६) झाडाभोवतीचा कट्टा
२८) प्रत्येक व्यवहारासाठी सक्तीचे केलेले कार्ड,टेका
२९) नम्रतेने मान खाली घातलेला
३२) महाभारतातील एकशे पांच भाऊ
३४) एक धान्य
३६) हजार शेराचे वजन
३७) दुष्ट,भांडखोर
३९) तलाव,विहीर इ.पाण्याच्या साठ्याची जागा
४१) पंकज
४२) चांगला
४४) आणि,शिवाय
४५) पोते
४७) राक्षस
४९) विश्व,दुनिया
५१) शिल्लक राहिलेली रक्कम
५२) दानी,दातृत्व असलेला
५४) लाकडी पादत्राण
५६) कमीतकमी
५८) मला
५९) आकाश
६०) नूतन
६२) माराची उमटलेली खूण
६३) नेहमी,खाली न पडू देता
६७) रसाळ
६९) चकणा
७१) खणखणीत दिलेले उत्तर,सडेतोड
७४) ✲✲✲ प्रदान,देवाण घेवाण
७५) द्रव्य,पैसा अडका
७६) हानी,तोटा
७९) हाट
८०) सप्तस्वरातील पहिला स्वर
८१) सवाद्य (मिरवणूक)
८४) मावा,एक दुग्धजन्य पदार्थ
८६) धैर्य,हिंमत
८७) तफावत
८८) राजपुत्राचे मातापिता

**उभे शब्द:–**
१) युद्ध
२) नगर
३) संगीतातील एक राग
४) हेकट
५) मोठी कळशी
६) योग्य,उचित
७) दुर्दशा
८) मीठ
१०) एक फळ
११) हेतू,कारण
१३) श्रीविष्णूच्या मूर्तीसमोर गरुडाची मूर्ती उभी करण्यासाठी बांधलेला चबुतरा
१५) घरातील मोठी वयस्कर माणसे
१६) उपस्थित
१७) समुद्रकिनारा
१८) विहीर
२०) (प्रेत) जाळणे
२२) लाकूड कापण्याचे दातेरी हत्यार
२४) शंकर,प्रत्येक
२५) महागच्या विरुद्ध
२७) रस्ता
३०) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
३१) भाळ,ललाट
३२) समुद्रमंथनातून निघालेल्या चौदा रत्नापैकी एक
३३) गणितातील उणे करण्याच्या पद्धतीचे नाव
३४) स्वत:ला
३५) हिंदीत जर
३८) मगज
३९) जन्म मृत्यू
४०) जेव्हा
४३) कुळाची अब्रू चव्हाट्यावर आणणारा
४६) मोठा भाऊ
४८) नखाच्या टोकावर मावण्याइतके
५०) अजागळ
५१) पायविहीर
५३) विद्युलता
५५) उणीव,चणचण
५७) जहाज लुटणारे
६१) काळ्या तोंडाचे मोठे माकड
६४) कणीदार पीठ
६५) उसनवारी
६६) जल
६८) क्वचित
६९) धूर्त,लबाड,संधिसाधू
७०) उद्योग,व्यवसाय
७२) नवऱ्याची दुसरी पत्नी
७३) मुलगा,पुत्र
७४) दर्पण
७७) कचरा,केर
७८) आकर्षक हावभाव, नट्टापट्टा
८२) सोन्याचा धागा
८३) गोमाता
८५) किराणा व्यापारी,वाचा

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ना | व | ड | ती | चे | मी | ठ | अ | ळ | णी | | प | सा | य | दा | न |
| मां | जा | | ज | | ठ | | ने | | | चु | | य | | भ | |
| त | | का | | हो | | वा | क | डा | ति | क | डा | | क | ण | व |
| र | म | त | ग | म | त | | वे | ग | | त | स | न | स | | न |
| | हि | | ज | | सा | प | ळा | | त | मा | | र | | मा | रा |
| वि | ना | का | र | ण | | र | | क | न | क | चं | प | क | | ज |
| ना | | म | गो | | ग | त | ध | वा | | त | | ती | र | | |
| य | दा | | टा | गो | र | | म | ल | म | | वा | | वं | द | न |
| क | स | म | | रा | ज | धा | नी | | न | क्ष | त्र | | द | | व |
| | बो | ल | का | | वं | | | मा | मा | | ट | प | | स | नी |
| म | ध | मा | शी | | त | ड | का | फ | ड | की | | गा | | पा | त |
| हि | | स | | क | | ग | | क | | र | ख | र | खा | ट | |
| ला | ज | | क | ल | क | ला | ट | | | | र्च | | ने | | आ |
| | र | ज | त | प | ट | | च | म | त्का | र | | व | सु | दे | व |
| रा | त | सा | र | | क | र | | ग | | य | क्ष | | मा | | र |
| ख | र | | ण | | ट | ण | त्का | र | | त | | प | री | क्ष | ण |

# कलासक्त

रंगबहार

शरद कोरडे

# मंत्रमुग्ध करणारे सूर हरपले



गेली सहा दशके रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या व त्यांच्या सुरांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या गायिका सुमन कल्याणपुर यांचे ३१ मे २०१६ मध्ये मुंबईतील अंधेरी येथील त्यांच्या निवासस्थानी वार्धक्यामुळे निधन झाल्याने त्यांच्या चाहत्यांनी व तमाम मराठी रसिकांनी दुःख व्यक्त केले आहे. सुमन कल्याणपुर यांचा अखंड हिंदुस्थानातील बंगालमधील ढाका शहरांत २८ जानेवारी १९३७ रोजी जन्म झाला. त्यांचे वडील शंकरराव हेमाडी हे कर्नाटक राज्यातील उडुपी जिल्ह्यातील कुंदापूर तालुक्यातील हेमाडी गावच्या सारस्वत कुटुंबातील होते, ते सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये उच्च पदावर कार्यरत होते. आणि त्यांची दीर्घकाळ ढाका येथे नियुक्ती झाली होती. आई सीता हेमाडी आणि वडिलांशिवाय कुटुंबात पाच मुली आणि एक मुलगा होता, ज्यामध्ये सुमन ह्या आपल्या भावंडांतील सर्वात मोठ्या होत्या. हेमाडी यांचे कुटुंब मुंबईमध्ये १९४३ मध्ये येऊन स्थायिक झाले. जिथे सुमन हेमाडे यांनी संगीताचे शिक्षण घेतले. त्यांना चित्रकलाही अवगत होती आणि आवडतही होती. त्यामुळे त्यांनी मुंबई येथील प्रसिद्ध सेंट कॉलम्व्हा हायस्कूल मधून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील चित्रकलेच्या अभ्यासासाठी त्यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये प्रवेश मिळविला. त्यावेळी त्यांनी पुणे येथील प्रभात फिल्मचे संगीत दिग्दर्शक व जवळचे स्नेही, कौटुंबिक मित्र पंडित केशवराव भोळे यांच्याकडून शास्त्रीय गायन शिकण्यास सुरुवात केली. गायन हा त्यांचा केवळ छंद होता, परंतु काही काळानंतर त्यांना संगीतांत रुची निर्माण झाली. मग त्यांनी उस्ताद खान, अब्दुल रेहमान खान आणि गुरुजी मास्टर नवरंग यांच्याकडून व्यवसायिकरित्या शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यांचे धाकटी बहीण श्यामा हेमाडी ही सुद्धा गायिका होती. सुमन हेमाडी यांनी १९५८ मध्ये मुंबईतील व्यावसायिक रामनंद कल्याणपुरकर यांच्याशी विवाह केला, आणि त्या सुमन कल्याणपूर झाल्या. त्यानंतर त्यांनी अनेक सांगितिक कार्यक्रमात भाग घेण्यास सुरुवात केली, काही ऑर्केस्ट्रा मधूनही त्या गाऊ लागल्या. त्यांचा एक कार्यक्रम सुप्रसिद्ध गायक तलत मेहमूद यांनी ऐकला व त्यांच्या आवाजाने ते प्रभावित झाले. त्यावेळी ते शेख मुख्तार यांच्या 'मंगू' या चित्रपटांतील गाणी गात होते, त्यांनी संगीतकार मोहम्मद शफी यांना सुमन कल्याणपुर यांच्याकडून गाणे गाऊन घेण्याची विनंती केली. त्यानुसार सुमन कल्याणपूर यांना प्रथमच हिंदी चित्रपटात गाणे गायची संधी मिळाली. ते गाणे होते 'कोई पुकारे धीरे से तुझे, आँखके तारे' हे तलत मेहमूद यांच्यासोबत गायलेले गाणे त्यावेळी खूप गाजले होते. त्यामुळे अनेक हिंदी चित्रपटात त्यांना गायची संधी मिळाली. त्याच वर्षी त्यांना मराठीमध्ये 'शुक्राची चांदणी' या चित्रपटांतही गाण्याची संधी मिळाली. संगीतकार ओ. पी.नय्यर यांनी संगीत दिलेला गुरुदत्त फिल्मचा 'आरपार' या चित्रपटात त्यांना मोहम्मद रफी व गीता दत्त यांच्यासोबत गाण्याची संधी मिळाली. त्यात 'मोहब्बत करलो जी भरलो किसी ने रोका है', हे गाणे रसिकांच्या पसंतीस उतरले. परंतु या गाण्यांचे श्रेय सुमन कल्याणपुर यांना मिळाले नाही, त्या त्यावेळी शिक्षण घेत असल्यामुळे त्यांचे नाव रेकॉर्डवर आले नाही. त्यांचे नाव येऊ नये असा त्यांच्या आई-वडिलांचा आग्रह होता.

१९६० च्या सुमारास सुमन कल्याणपुर यांना 'मिया बीबी राजी'-१९६०, 'बात एक रात की'-१९६२, 'दिल एक मंदिर'-१९६३, 'दिल्ली दूर है :-१९६३, शगुन-१९६४,' 'जहा आँरा',-१९६४, सांज और सवेरा-१९६४ , नूर जहाँन -१९६७, साथी-१९६८ पाकीजा- १९७१ या चित्रपटांतील गाणी संगीतकार शंकर जय किशन, रोशन, मदनमोहन, एस.डी. बर्मन, एन. दत्ता, हेमंत कुमार, चित्रगुप्त, नौशाद, वसंत देसाई, रवी, लक्ष्मीकांत प्यारेलाल, उषा खन्ना आदी संगीतकारांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सुमारे ७४० चित्रपटांतून गाणी गायली. मोहम्मद रफी यांच्यासोबत १४० युगलगीते गाण्याची संधी सुमन कल्याणपुर यांना मिळाली. आणि त्यांना भारतभर प्रसिद्धीही मिळाली.

याच काळात त्यांनी मराठीमध्ये भावगीते, भक्तीगीते व चित्रपट गीते ही गायली. १९५६ मध्ये त्यांनी संगीतकार वसंत प्रभू यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली 'पसंत आहे मुलगी' या चित्रपटांतील 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी', हे गीत गायले. सुमन कल्याणपुर यांनी मराठी चित्रपटात गायलेले हे पहिले गाणे होते. हा चित्रपट राजा परांजपे यांनी दिग्दर्शित केला होता व यांत राजा गोसावी, रेखा, रमेश देव, धुमाळ व बाबुराव पेंढारकर यांनी भूमिका केल्या होत्या.त्यानंतर सुमन कल्याणपुर यांनी वेगवेगळ्या संगीत दिग्दर्शकासोबत गाणी गायली त्यानंतर दशरथ पुजारी यांच्यासह, 'अक्रुरा नेऊ नको माधवा , आकाश पांघरून जग शांत झोपलेले, केशवा माधवा तुझ्या नामांत रे गोडवा, जुळल्या सुरेल तारा, नकळत सारे घडले. सं.कमलाकर भागवत यांच्यासोबत त्यांनी 'उठा उठा चिऊताई सारीकडे उजाडले' व 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' ही गाणी गायली. अशोक पत्की यांच्यासह त्यांनी 'केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर', 'नाविका रे वारा वाहे रे', 'वाट इथे स्वप्नातील' आदी गाणी गायली. विश्वनाथ मोरे यांच्या संगीतात त्यांनी 'शब्द शब्द जपून ठेव' हे गीत गायले होते. संगीतकार एन. दत्ता यांच्या चित्रपटात, 'सांग कधी कळणार तुला भाव माझ्या मनातला'- (अपराध) व 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई' हे ('बाळा गाऊ कशी अंगाई) हि गाणी गायली,' ही गाणी खूप लोकप्रिय झाली होती. सुमन कल्याणपुर यांनी मराठी, हिंदी या भाषेखेरीज बंगाली, भोजपुरी, कन्नड, आसामी ,ओडिसी आदी भाषांतही गीते गायली होती.

सुमन कल्याणपुर यांचा आवाज हूबेहूब लता मंगेशकर यांच्या आवाजाशी मिळता जुळता होता. त्यांच्या आवाजाचा स्वर, गाण्याची शैली सारखीच असल्याने बऱ्याच रेकॉर्डवर त्यांच्या नाव ऐवजी लता मंगेशकर यांचे नाव प्रिंट झाले असायचे. या सारखेपणामुळे त्यांच्या कारकिर्दीवर प्रतिकूल परिणाम झाला. काही वेळेला त्यांच्यावर अन्यायही झाला, पण त्याबाबत त्यांनी त्याची कुठेही व केव्हाही वाच्यता केली नाही. मोहम्मद रफी आणि लता मंगेशकर यांच्यामध्ये गायकांना रॉयल्टी मिळावी की नाही याबाबत मतभेद झाल्याने काही काळ त्यांनी एकत्र युगलगीते गायले नाहीत. या काळात अशी युगलगीते मोहम्मद रफी व सुमन कल्याणपुर यांच्याकडून गाऊन घेतली जात.या काळात सुमन कल्याणपुर यांना रफिं सोबत अनेक गीते गायनाची संधी मिळाली व त्याची त्यांनी सोने केले. शेवटी एस. डी. बर्मन यांनी दोघांमध्ये सलोखा घडवून आणला व 'ज्वेल् थीप' मध्ये रफी व लता यांनी एकत्र युगलगीत गायिले.१९५२ मध्ये त्यांनी ऑल इंडिया रेडिओवर गायिका म्हणून काम केले. रेडिओ सिलोनवर प्रसारित झालेल्या त्यांच्या गाण्यांत गायकाचे नाव सांगितले जात नसे. सुमन कल्याणपुर म्हणतात 'मी लता मंगेशकर यांच्या आवाजाने खूप प्रभावीत असे, कॉलेज जीवनात मी त्यांची गाणी म्हणत असे. कारण माझा आवाज नाजूक व पातळ होता, त्यामुळे ऐकणाऱ्या श्रोत्यांचाही गोंधळ होत असे'. सुमन ताईंची लोकप्रिय ठरलेली काही हिंदी गाणी खालील प्रमाणे आहेत.

'तुमसे ओ हसीना कभी मोहब्बत ना मैंने करनी थी' (फर्ज). 'ना तुम हमे जाने ना हम तुम्हे जाने' (बात एक रात की). छोडो छोडो मेरे बाहे, (मिया बीबी राजी). दिल दिल गम से जल रहा है, (दिल ही तो है). मेरे संग गा गुन गुना, (जानवर). मेरे मेहबूब ना जा, (नूर महल). जिंदगी इम्तिहान लेती है, ( नसीब) शराबी शराबी ये सावन का मौसम, (नूर जहाँ). बहना ने भाई की कलाई से प्यार बांधा है, (रेशम की डोरी). दिल एक मंदिर है, (दिल एक मंदिर), आजकल तेरे मेरे प्यार की चर्चा हर जुबान पर, (ब्रह्मचारी). नाना करते प्यार तुम्ही से कर बैठे, (जब जब फुल खिले), मेरा प्यार भी तू है , (साथी). ही गाणी खूप लोकप्रिय होती. तसेच मराठीमध्ये रिमझिम धरती श्रावण धारा, शब्द शब्द जपून ठेव, केशवा माधवा तुझ्या नामांत रे गोडवा, ओंकार प्रधान रूप गणेशाचे, जेथे सागरा धरणे मिळते, भक्तीच्या फुलांचा बोलतो सुवास, या लाडक्या मुलांनो, सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले, ही गाणी ही खूप लोकप्रिय होती. महाराष्ट्र सरकारने सुमन कल्याणपुर यांना, लता मंगेशकर पुरस्कार सन २००९ मध्ये देऊन त्यांचा सन्मान केला, तसेच गदिमा प्रतिष्ठानने 'गदिमा पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने २६ जानेवारी २०२३ मध्ये 'पद्मविभूषण' हा प्रतिष्ठेचा नागरी पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. २०२४ मध्ये महाराष्ट्र टाईम्सने 'महाराष्ट्र भूषण पुरस्कार' देऊन सुमन कल्याणपुर यांचा गौरव केला. ३१ मे २०२६ ला अंधेरी येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्समधील त्यांच्या निवासस्थानी वयाच्या ८९ व्यावर्षी त्यांना वार्धक्यामुळे मृत्यू आला आणि त्यांचा सांगीतिक प्रवास थांबला. लेखिका आणि निवेदिका मंगला खाडिलकर यांनी त्यांचे चरित्र 'सुमन सुगंध' नावाने प्रकाशित केले आहे. पुनश्च त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ●●

# रंगणार हेलन-करिष्मा जुगलबंदी!

रहस्याचा गडद आणि थरारक वेढा असणारी 'ब्राऊन' ही बहुप्रतिक्षित क्राइम थ्रिलर वेब सीरिज झी ५ वर प्रदर्शित होत आहे. झी स्टुडिओज निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन अभिनय देव यांनी केले असून, यात करिश्मा कपूर मुख्य भूमिकेत (रीता ब्राउन या पोलीस अधिकाऱ्याच्या रूपात) कमबॅक करत आहे. तिच्यासोबत ज्येष्ठअभिनेत्री हेलन आणि सुप्रसिद्ध अभिनेते सुशांत सिंग प्रमुख भूमिकेत आहेत, तर सोनिया बाल्शानी आणि जितिन गुलाटी यांनी महत्त्वाच्या सहाय्यक भूमिका साकारल्या आहेत. या सीरिजचे बहुतांश चित्रीकरण कोलकाता येथील गजबजलेल्या गल्ल्या, जुन्या वास्तू आणि हावडा ब्रिजच्या परिसरात झाले आहे.

चित्रीकरणादरम्यान कोलकात्याच्या कडक उन्हात आणि गर्दीत शूटिंग करताना करिश्मा कपूरला पाहण्यासाठी हजारो चाहत्यांनी गर्दी केली होती. त्यामुळे क्रूला अनेकदा रात्रीच्या वेळी गुप्तपणे शूट करावे लागले. दुसरा किस्सा म्हणजे, ज्येष्ठ अभिनेत्री हेलन बऱ्याच वर्षांनी कॅमेऱ्यासमोर येत असल्याने संपूर्ण सेटवर प्रचंड आदराचे वातावरण होते; एका कठीण भावनिक दृश्यानंतर हेलन यांच्या उत्कृष्ट अभिनयासाठी दिग्दर्शकांसह संपूर्ण युनिटने उभे राहून टाळ्या वाजवल्या होत्या.



# ऑफिसमधील प्रेमाची हळूवार कहाणी

ऑफिसमधील कामाच्या धावपळीत नवीन प्रेम बहरते आणि चार भिंतींच्या आत एक सुंदर रोमँटिक कहाणी सुरू होते, असे कथानक लवकरच पहायला मिळणार आहे. कॉर्पोरेट जगातील गोड-आंबट नात्यांची गुंफण असणारी 'ऑफिस रोमान्स' ही हलकी फुलकी रोमँटिक ड्रामा वेब सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. 'धर्माटिक एंटरटेनमेंट' निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन शकुन बत्रा यांनी केले असून, यात तृप्ती डिमरी आणि रोहित सराफ मुख्य भूमिकांमध्ये पाहायला मिळतील. त्यांच्यासोबत पंकज त्रिपाठी आणि सुप्रिया पाठक यांनी महत्त्वाच्या सहाय्यक भूमिका साकारल्या आहेत. या सीरिजचे मुख्य चित्रीकरण मुंबईतील बीकेसी मधील आधुनिक कॉर्पोरेट ऑफिस, सायबर सिटी गुरुग्राम आणि गोव्यातील एका नयनरम्य रिसॉर्टमध्ये झाले आहे. चित्रीकरणादरम्यानचे दोन किस्से अत्यंत मजेशीर आहेत. पहिला म्हणजे, एका गंभीर ऑफिस मीटिंगच्या दृश्यात पंकज त्रिपाठी यांनी अचानक संवादांची अशी काही पेरणी केली की, समोर बसलेल्या तृप्ती आणि रोहितला आपले हसू आवरता आले नाही आणि सलग पाच रिटेक घ्यावे लागले. दुसरा किस्सा म्हणजे, गोव्यातील एका गाण्याच्या शूटदरम्यान अचानक पाऊस सुरू झाला; परंतु दिग्दर्शकांनी शूटिंग न थांबवता तो पावसाला पण कथेचा भाग बनवले.



# हटके प्रेमकहाणी

काळजाला भिडणाऱ्या निखळ प्रेमाचा प्रवास असणारी 'एव्हरी इयर आफ्टर' ही भावनिक रोमँटिक ड्रामा सीरिज प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होत आहे. एक्सेल एंटरटेनमेंट निर्मित या सीरिजचे दिग्दर्शन झोया अख्तर यांनी केले असून, यात सिद्धांत चतुर्वेदी आणि वामिका गब्बी मुख्य भूमिकेत पाहायला मिळतील. दरवर्षी एका विशिष्ट दिवशी भेटणाऱ्या दोन प्रेमींची ही कथा असून, यात नसीरुद्दीन शाह आणि शेफाली शाह यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. या सीरिजचे चित्रीकरण हिमाचल प्रदेशमधील सिमला, जुने मनाली आणि मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर झाले आहे. सिमला येथील कडाक्याच्या थंडीत एका भावनिक दृश्याचे शूट सुरू असताना अचानक बर्फवृष्टी सुरू झाली. निसर्गाच्या या जादूमुळे ते दृश्य पूर्वलिखित कल्पनेपेक्षाही कमालीचे सुंदर चित्रित झाले. दुसरा किस्सा म्हणजे, एका गंभीर संवादाच्या वेळी पडद्यामागे नसीरुद्दीन शाह यांनी सेटवरील तरुण कलाकारांना अभिनयाचे काही खास तंत्र शिकवले; यामुळे प्रभावित होऊन संपूर्ण युनिटने दिग्दर्शकांसह कौतुकाचा वर्षाव केला.





# साहित्यप्रभा

साहित्यप्रभा हे पीएनपी कलाविकास मंडळ, अलिबाग अंतर्गत साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नवोदित साहित्यिकांसाठी कार्यरत असलेले एक सर्जनशील साहित्यिक व्यासपीठ आहे. साहित्याची आवड जपणे, नवोदित प्रतिभांना संधी उपलब्ध करून देणे, वैचारिक देवाणघेवाण घडवून आणणे आणि दर्जेदार साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन देणे हा मंडळाचा मुख्य उद्देश आहे.

साहित्यप्रभा मंडळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ पारंपरिक विषयांपुरते मर्यादित न राहता दर रविवारी एक वेगळा, आगळावेगळा आणि विचारप्रवर्तक विषय दिला जातो. त्या विषयावर साहित्यिक, कवी आणि लेखक आपल्या कल्पना, भावना, अनुभव आणि सर्जनशील विचार कविता, लेख, कथा किंवा इतर साहित्यप्रकारांच्या माध्यमातून व्यक्त करतात. अशा विषयांमुळे नव्या कल्पनांना चालना मिळते, विचारांची क्षितिजे विस्तारतात आणि साहित्यिक अभिव्यक्ती अधिक समृद्ध होते. याशिवाय, दर शनिवारी सदस्यांना कोणत्याही विषयावरील स्वतःचे स्वलिखित साहित्य समूहात सादर करण्याची संधी दिली जाते. यामुळे लेखकांना मुक्तपणे अभिव्यक्त होता येते आणि साहित्यिकांमध्ये सकारात्मक संवादाचे वातावरण निर्माण होते. साहित्यप्रभा मंडळातर्फे वेळोवेळी काव्यसंमेलन, साहित्यकट्टा, कथावाचन, कथालेखन, अभिवाचन, साहित्य संमेलन, कवी संमेलने, साहित्यिक चर्चासत्रे तसेच विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांमुळे साहित्यिकांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते, नवोदित लेखकांना मार्गदर्शन मिळते आणि साहित्य क्षेत्रात नवे विचार व नवी ऊर्जा निर्माण होते. साहित्यप्रभा हे केवळ एक साहित्यिक मंडळ नसून शब्दांवर प्रेम करणाऱ्या आणि साहित्याच्या माध्यमातून समाजाशी संवाद साधणाऱ्या साहित्यिकांचे एक प्रेरणादायी कुटुंब आहे. नवोदित आणि अनुभवी साहित्यिकांना समान व्यासपीठ उपलब्ध करून देत हे मंडळ साहित्याचा दीप सतत प्रज्वलित ठेवण्याचे कार्य करत आहे. ''शब्दांना अभिव्यक्ती, विचारांना दिशा आणि सर्जनशीलतेला नवी प्रभा'' या ध्येयाने प्रेरित होऊन साहित्यप्रभा साहित्य, संस्कृती आणि सर्जनशीलतेचा वारसा जपण्याचे कार्य सातत्याने करत आहे. साहित्यप्रभाच्या या साहित्यिक परिवारात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि रसिकांनी ८०८०७ ५७३४७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## पदर

पदर, साडीची एक बाग आहे,
साडीला पदर सुरेख,
तर रूपाला अनेक रंग आहे.
काठपदर असो वा अजून काही वेगळे,
प्रत्येक पदर सुंदर,
त्याचे रंग-ढंग निराळे.
काही डोक्यावरून घेतात,
काही कमरेत खोचतात.
काही पदर लांब ठेवतात,
तर काही शोभेसाठी सावरून मिरवतात.
पदर म्हणजे पदरच असतो,
त्याचे महत्त्व स्त्रीलाच कळत असते.
पदर साडीची शोभा आहे,
तो एक सुरक्षा-कवचही आहे.
म्हणूनच पदर जपावा,
कारण त्यात संस्कृतीचा आणि मायेचा स्पर्श
दडलेला असतो.

**- अर्चना अनिल पाटील**

## आईचा पदर

आईच्या पदराची सावली लाभली
साऱ्या जगाला,
आईसारखी माया करणारी नाही
कुणी या विश्वाला...
बापाच्या रागातून कवेत घेऊन जपणारी आई
असते, मायेची पक्षीण जशी पिलांना पंखांच्या
पदराखाली सांभाळते...
आईची माया गाईच्या वात्सल्यासारखी निर्मळ
असते, आई नसली जवळी तरी बापच आधार
बनत असते...
लेकरांच्या सुखासाठी रात्रंदिवस झिजणारी
माऊली, तिच्या कष्टांच्या घामातूनच फुलते
घराची फुलवेली...
पारंब्यांचा वृक्ष होऊन बाप बनतो
संसाराचा आधारवड,
उन्हा-तहानात राबून लेकरांसाठी
झिजतो अखंड...
काळ बदलला, वेशभूषाही बदलली
जगाची सारी,
पण आईच्या पदराची ऊब
आजही तशीच प्रेमळ भारी..

**- मनोज हर्षला हरिश्चंद्र डिके**

## मायेचा ममत्वाचा पदर

नभा एवढं काळीज तिचं
मायेचा तो अथांग सागर,
जिथे मिटतात सगळी दुःखं
तो म्हणजे मायचा पदर...
कधी मायेची ऊब देणारा
कधी सुखाची शाल होतो,
दिला तिने कपाळावर
मुका की जीव हा खुशाल होतो...
उन्हातान्हात राबता राबता
घामाच्या धारा ती टिपते,
त्याच पदराच्या सावलीत
अख्खी ऊब धरणीची जपते...
हात सुटला जगाचा तरी
हा पदर कधी सुटत नाही,
यात गुंफलेलं मायेचं नातं
जन्मात कधी तुटत नाही...
काळ्या आईच्या कुशीत
जेव्हा ती घामाचे मोती पेरते,
तेव्हा याच पदराने माय संसाराची धुरा पेलते...
मखमलीच्या या दुनियेत
जरी सुखाचे लाख ढीग असतील,
पण मायेच्या एका पदरापुढे सारे वैभव फिके पडतील...

**- प्रतिक उमवणे (शब्दांचा शेतकरी)**

कधी मायेची ऊब, कधी संस्कारांची सावली,
आईच्या पदराखालीच अख्खी सृष्टी मावली.
बालपणीचे ते अश्रू ज्याने हळूच टिपले,
त्या एका पदरात अवघं ब्रह्मांड जणू लपले.
लज्जेची ती झालर अन् शृंगाराचा साज,
नवरीच्या रूपाला चढवतो नवाच बाज.
कधी प्रेमाचा इशारा, कधी आडोशाची ओढ,
या पदराच्या सोबतीला असते काहीतरी गोड.
घाम कष्टाचा पुसायला हाच पदर पुढे येतो,
संसार सांभाळताना तोच
कंबर कसणं शिकवतो.
अन्यायाविरुद्ध लढताना कधी
तलवारीची ढाल होतो,
तर कधी अब्रू राखायला
तोच पदर विस्तव होतो.
केवळ कापडाचा तुकडा नाही,
हा तर तिचा मान आहे,
स्त्रीच्या स्वाभिमानाचे आणि
प्रेमाचे ते निशाण आहे.
सुख-दुःखाच्या प्रत्येक
वळणावर जो सोबत देतो,
तो पदरच स्त्रीच्या
अस्तित्वाला पूर्णत्व देतो.

**- अनिल पवार**

## हरवलेला पदर

मराठ मोळ साज आसलेला हा पदर
जेव्हा जन्माला आला आसेल तेव्हा तो किती
सुखावला आसेल जयश्री गडकर बाई ने त्याला
शृंगार दिला पदरावरती जरतारीचा मोर नाचरा
हवा आई मला नेसव शालू नवा तोच पदर
नवजात बाळाला अमृत पान करतांना आडोसा
झाला. तर नववधूचा लाजरा चेहेरा झाकण्याचा
सौभाग्य ल्याला नवरा बायकोच्या नात्यात पण
पदर रोमांचित झाला. नवरा जेव्हा पदराला
हात तोंड पुसतो तेव्हा पत्नी लडिवाळ रागावते
खरी पण तीला ही ते आवडतं आसायच तोच
पदर मुलांना वाचवण्यासाठी पण कामी आला
तर कधी कंबरेला खोचून लढवय्या पण झाला
आजीच्या पदरात तर कीती माया नातंवंडान
साठी खाऊ लपवताना कधी नाही माखला पण
आता बाकी तो हरवत गेला जसा पदर हरवला
तसी लाज उघड्यावर पडली
आसतो आता आधुनमधुन डोकावत पण कीती
ही आधुनिकता आली तरी पदर बाकी येतंच
रहाणार भेटीला

**-रजनी तेरडे**

## पदर

पदरा खाली झाकलेलं
संस्कृतीने राखलेलं
समाजाच्या भीती पोटी
आजवर न उलगडलेलं
आत्ताच्या पिढीने टाकलंय
पदराचं अस्तित्व जणु संपलंय
बदल, स्वातंत्र्य, विकृतीने
ह्याला हल्ली अदृश्य केलंय
पदरचे विचार बुरसटलेत
पदरचे पैसे सुद्धा संपलेत
पदरमोड करण्याचे दिवस
केव्हाच काल-बाह्य झालेत
हल्ली चपातीला सुद्धा पदर सुटत नाही
पदरा आड लपवण्यासारखे हाती काहीचं नाही
बोथट भावना, स्वार्थी वृत्ती,
विषयाची आसक्ती..
फोफावलीय रंगेल भक्ती,
आता देवळात देव शिल्लक नाही.

**- भुषण धनंजय पांडुरंग पाटील**
**नेरुळ, नवी मुंबई ९९६९७८१९८१**

## छोटासा विमानप्रवास

नवल

विमान प्रवासाचे नाव ऐकताच आपल्या मनात आकाशात उडणाऱ्या लांब पल्ल्याच्या भल्यामोठ्या विमानांचे चित्र उभे राहते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, जगातील सर्वात लहान उड्डाण किती अंतराचे असू शकते?




मुलांनो, जगात उड्डाणानंतर अगदी काही सेकंदांचा प्रवास पूर्ण करून धावपट्टीवर उतरणारे विमान आहे. हो, आता आपण स्कॉटलंडच्या ऑर्कने बेटांवर असणाऱ्या वेस्ट्रे आणि पापा वेस्ट्रे बेटांदरम्यानच्या उड्डाणाबद्दल बोलत आहोत. हे कोणतेही सामान्य उड्डाण नाही, तर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात लहान अंतराचे व्यावसायिक उड्डाण म्हणून नोंद झालेले विमान उड्डाण आहे. या प्रवासाचे अंतर अवघे २.७ किलोमीटर असून, विमानाला ते पूर्ण करण्यासाठी सरासरी ८० सेकंद लागतात. वाऱ्याची दिशा अनुकूल असताना तर हा वेळ ५३ सेकंदांपर्यंत कमी होतो.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, इतक्या कमी अंतरासाठी विमान का वापरले जाते? या दोन बेटांमध्ये कोणताही रस्ता किंवा पूल नाही आणि समुद्री असा आहे की बोटीने प्रवास करणे शक्य नाही. म्हणूनच ही हवाई सेवा डॉक्टर, शिक्षक आणि स्थानिक लोकांसाठी एखाद्या जीवनरेषासारखी आहे. या प्रवासासाठी अगदी लहान ब्रिटन-नॉर्मन बीएन२बी २६ आयलंडर विमान वापरले जाते. त्यातून एका वेळी ८-१० प्रवासी प्रवास करू शकतात. हे अनोखे उड्डाण केवळ स्थानिक लोकांसाठीच सोयीची नाही, तर जगभरातील पर्यटकांनादेखील ते आकर्षित करते.

## पक्ष्यांमधली कलाकारी

रंजक विज्ञान

काही पक्षी अत्यंत सुंदर, मजबूत आणि हुशारीने घरटी बांधतात. सुगरण हा छोटासा पक्षी गवत, काड्या आणि झाडांच्या तंतूंचा वापर करून सुंदर लटकते घरटे विणतो. बाटलीसारखे दिसणारे हे घरटे फांदीला टांगलेले असते. विशेष म्हणजे, नर सुगरण हे घरटे बांधतो. मादी पक्षी येऊन ते पाहते. तिला घरटे मजबूत आणि सुंदर वाटले, तरच ती तिथे राहायला तयार होते. शिंपी पक्षी कोळ्याचे जाळे, बारीक धागे किंवा वनस्पतींचे तंतू वापरून दोन-तीन पाने जोडतो आणि आत मऊ घरटे तयार करतो. हे घरटे बाहेरून सहज दिसत नाही, त्यामुळे पिले सुरक्षित राहतात.



सुतार पक्षी झाडाच्या खोडावर चोचीने भोक पाडतो आणि त्यात राहतो. अबाबील नावाचा पक्षी चिखल, गवत आणि लाळ वापरून भिंतींना चिकटणारी घरटी बनवतो. ही घरटी खूप मजबूत असतात. गरुड आणि घार उंच झाडांवर मोठी घरटी बांधतात. ती एवढी मजबूत असतात की, अनेक वर्षे वापरली जातात. कबूतर काही काड्या गोळा करून साधे घर बनवते. काही पेंग्विन बर्फाळ प्रदेशात छोटे दगड रचून घरट्यासारखी जागा तयार करतात. चिमण्या माणसांच्या घरातच घरटी बांधतात. काड्या आणि कापूस गोळा करून लहानसे घरटे बनवतात. अंडी घालण्यासाठी, पिलांना वाढवण्यासाठी आणि शत्रूपासून संरक्षण मिळवण्यासाठी प्रत्येक पक्षी आपल्या गरजेनुसार वेगळ्या प्रकारचे घरटे बांधतो.

कोकिळा स्वतः घरटे बांधत नाही. ती बहुतेक कावळ्याच्या घरट्यात आपली अंडी घालते. कावळा ती अंडी स्वतःची समजून उबवतो आणि पिलांनाही वाढवतो. हॉर्नबिल म्हणजे धनेश पक्षी इतर पक्ष्यांनी बनवलेल्या किंवा नैसर्गिकरीत्या तयार झालेल्या झाडातील पोकळी राहतो. घुबड आणि काही पोपटही अनेकदा सुतार पक्ष्याने तयार केलेल्या घरात राहतात. काही बदके इतर पक्ष्यांची रिकामी घरटी वापरतात. याचा अर्थ, सगळे पक्षी घर बांधत नाहीत, तर तयार घर शहाणपणाने वापरतात.

## पर्यावरणाचे रक्षक बना!

काळजी घ्या




अलीकडेच आपण जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. खरे तर वर्षातून एकदाच नव्हे, तर प्रत्येक दिवसच 'पर्यावरण दिन' म्हणून पाळला जाणे गरजेचे आहे. जागतिक तापमानवाढ, हवामानातील असामान्य बदल आणि नामशेष होत जाणाऱ्या प्राणी आणि पक्ष्यांची वाढती संख्या बघता, याचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नाही. आपण पर्यावरणाचे रक्षण केले नाही, तर पृथ्वीवरील जीवन राखणे कठीण होईल.


पर्यावरणाच्या संवर्धनासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि लोकांना निसर्गाचा समतोल राखण्यास प्रेरित करण्यासाठी आता प्रत्येकानेच पुढे यायला हवे. संयुक्त राष्ट्रांनी १९७२ मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. दरवर्षी हा विशेष दिवस एका खास थीमसह साजरा केला जातो. या निमित्ताने पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकला जातो. प्लास्टिक प्रदूषण ही आज जगातील सर्वात मोठ्या पर्यावरणीय समस्यांपैकी एक बनली आहे. प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणाला संकटात टाकत आहे. यामुळे प्राण्यांनाही नानाविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सूक्ष्म प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी घातक ठरत आहेत.

दरवर्षी लाखो टन प्लास्टिक वापरले जाते पण त्यातील छोटासा भागच पुनर्वापरासाठी उपयोगात आणला जातो. तसेच प्लास्टिक विघटित होत नसल्यामुळे कशातही मिसळत नाही. स्वाभाविकच प्लास्टिकचे प्रदूषण वेगाने वाढत आहे. समुद्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक टाकले जात असल्यामुळे सागरी जीव गुदमरत आहेत. म्हणूनच प्लास्टिकचे प्रदूषण नियंत्रित करणे खूप महत्त्वाचे आहे. तुम्हीही दररोज हे भान ठेवा आणि प्लास्टिक कचरा टाळण्याचा प्रयत्न करा. पर्यावरणाचे भक्षक नको, तर रक्षक बना!

## पिरेनीज पर्वतरांग : नैसर्गिक सीमारेषा

गोष्टी पर्वतरांगांच्या

पिरेनीज ही युरोप खंडातील एक महत्त्वाची आणि निसर्गसौंदर्याने नटलेली पर्वतरांग आहे. ही पर्वतरांग मुख्यतः स्पेन आणि फ्रान्स यांच्या सीमेवर पसरलेली असून, मध्ये छोटासा अँडोराहा देशही येतो. पिरेनीज पर्वतरांगेची लांबी सुमारे ४९० किलोमीटर आहे. पश्चिमेला अटलांटिक महासागरापासून सुरू होऊन ती पूर्वेकडील भूमध्य समुद्रापर्यंत पसरलेली आहे. ही पर्वतरांग नैसर्गिक सीमा म्हणूनही ओळखली जाते.



पिरेनीज पर्वतरांगेची निर्मिती लाखो वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पृष्ठभागातील हालचालींमुळे झाली. पृथ्वीवरील मोठ्या खडकांच्या पट्ट्यांची टक्कर झाल्याने येथे उंच पर्वत तयार झाले. या पर्वतरांगेत अनेक उंच शिखरे, खोल दऱ्या, हिमनद्यांनी तयार केलेले प्रदेश, स्वच्छ नद्या आणि हिरवीगार जंगले आढळतात. फ्रान्समधून वाहाणारी गारोन नदी, स्पेनमधील एब्रो आणि ओरेगॉन नद्या तसेच फ्रान्सच्या दिशेने वाहणार्यार टेक आणि टेट या नद्या पिरेनीज पर्वतरांगेतच उगम पावतात. त्यामुळे हा प्रदेश अतिशय सुंदर आणि जैवविविधतेने समृद्ध मानला जातो.

अनेतो शिखर हेया पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर आहे. त्याची उंची सुमारे ३४०४ मीटर आहे. हिवाळ्यात या भागातील अनेक पर्वत बर्फाने झाकले जातात. त्यामुळे येथे स्कीइंग, स्नोबोर्डिंग यांसारखे हिवाळी खेळ मोठ्या प्रमाणावर खेळले जातात. उन्हाळ्यात गिर्यारोहण, ट्रेकिंग, सायकलिंग आणि निसर्गभ्रमंतीसाठी जगभरातून पर्यटक येथे येतात.

पिरेनीज प्रदेशात अनेक दुर्मिळ वनस्पती आणि प्राणीही आढळतात. पर्वतीय शेळ्या, गरुड, तपकिरी अस्वल यांसारखे प्राणी येथे पाहायला मिळतात. काही भाग राष्ट्रीय उद्याने म्हणून संरक्षित आहेत, ज्यामुळे पर्यावरणाचे जतन केले जाते.

इतिहासात पिरेनीज पर्वतरांगेला मोठे महत्त्व होते. फ्रान्स आणि स्पेन यांच्यामधील नैसर्गिक अडथळा म्हणून ती ओळखली जात असे. युद्धकाळात शत्रूंची हालचाल थांबवण्यासाठी या पर्वतरांगेचा उपयोग झाला. आज मात्र हा प्रदेश पर्यटन, शेती, जलविद्युत निर्मिती आणि साहसी क्रीडांसाठी प्रसिद्ध आहे. बर्फाच्छादित शिखरे, सुंदर दऱ्या आणि शांत वातावरणामुळे पिरेनीज पर्वतरांग जगातील आकर्षक पर्वतरांगांपैकी एक मानली जाते.

## 'गेट' सेट गो!

कार्यानुभव

इंजिनिअरींगची पदवी मिळवल्यानंतर पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना 'गेट' परीक्षा द्यावी लागते. 'गेट' म्हणजे ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरींग. इंजिनिअरींगसह तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट ही आव्हानात्मक आणि कठीण स्पर्धापरीक्षांपैकी एक. गेट परीक्षेतल्या गुणांवर सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते. म्हणूनच इंजिनिअरींगमध्ये करिअर करण्याची इच्छा असणारे विद्यार्थी पुढे सरकारी कंपन्यांमध्ये नोकरी मिळवू शकतात.




✻ गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे योग्य उमेदवारांची निवड केली जाते. या उमेदवारांची यादी तयार करून त्यांना मुलाखतीला बोलवण्यात येतं. काही वेळा गेट परीक्षेतल्या गुणांवर नोकरी मिळते.

✻ सार्वजनिक क्षेत्रातल्या ६० पेक्षा अधिक कंपन्या गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे कर्मचाऱ्यांची निवड करतात. पण बरेच विद्यार्थी महारत्न कंपन्यांची निवड करत असल्यामुळे या क्षेत्रात खूप स्पर्धा असते.

✻ सेल, भेल, एनटीपीसी, ओएनजीसी, आयओसीएल, सीआयएल, गेल, बीपीसीएल अशा सार्वजनिक क्षेत्रातल्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये

## गार्नेटची गाथा

खनिजांची माहिती

गार्नेट हे एक सुंदर आणि उपयुक्त खनिज आहे. ते मुख्यतः रत्न म्हणून ओळखले जाते. पण त्याचा उपयोग फक्त दागिन्यांपुरता मर्यादित नाही. गार्नेटचा रंग बहुतेक वेळा गडद लाल असतो. पण गार्नेट हिरवा, पिवळा, नारिंगी, तपकिरी आणि काळसर रंगातही आढळू शकतो. हे खनिज काचेसारखे चमकदार दिसते. गार्नेट जमिनीच्या आत खडकांमध्ये तयार होते. पृथ्वीच्या आत खूप उष्णता आणि दाब असतो. काही खडकांवर दीर्घकाळ उष्णता व दाब पडल्यावर त्यातील घटक बदलतात आणि त्यातून गार्नेट तयार होते. त्यामुळे हे खनिज मुख्यतः बदललेल्या खडकांमध्ये सापडते. भारतामध्ये राजस्थान, ओडिशा, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि केरळ या भागांमध्ये गार्नेट सापडते. काही वेळा नदीकिनारी किंवा समुद्रकिनाऱ्याच्या वाळूमध्येही त्याचे छोटे चमकदार कण मिळतात. जगात भारत, श्रीलंका, अमेरिका आणि आफ्रिकेतील काही देशांमध्ये गार्नेट मोठ्या प्रमाणात मिळते. गार्नेट खडकांमधून किंवा वाळूमधून गोळा केले जाते. नंतर त्यातील माती, वाळू आणि इतर दगड वेगळे केले जातात. दागिन्यांसाठी वापरायचे गार्नेट निवडून त्याला आकार दिला जातो आणि घासून चमक आणली जाते. त्यामुळे ते अधिक सुंदर दिसते.



गार्नेटचा उपयोग मुख्यतः दागिन्यांमध्ये होतो. अंगठ्या, माळा, कानातील दागिने आणि बांगड्यांमध्ये गार्नेट बसवले जाते. त्याचा गडद लाल रंग आकर्षक वाटत असल्यामुळे अनेकांना ते आवडते. पण गार्नेटचा उपयोग फक्त रत्न म्हणूनच नाही. हे खनिज कठीण असल्यामुळे काही वस्तू घासण्यासाठीही वापरले जाते. लाकूड, काच किंवा धातू गुळगुळीत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही कागदांमध्ये गार्नेटचे बारीक कण असतात. काही उद्योगांमध्ये कापण्याच्या आणि साफसफाईच्या कामांसाठीही त्याचा उपयोग होतो. गार्नेट मौल्यवान असण्याचे कारण म्हणजे त्याचे सुंदर रंग, चमक आणि टिकाऊपणा. मात्र माणिक किंवा हिऱ्यासारखे ते खूप महाग नसते. दागिने, घासण्याची साधने आणि उद्योग अशा अनेक ठिकाणी त्याचा उपयोग होत असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व आहे.

## फोटो येतील सुरेख

कार्यानुभव



कुठेही फिरायला गेल्यावर सर्वांत आधी आपण प्राधान्य कशाला देतो? नक्कीच, फोटोंना! प्रत्येकाला आपण जगलेल्या क्षणांची आठवण हवी असते. त्यासाठी तुम्ही फोटो काढता. घरातल्या लग्नकार्यातही बरेच फोटो काढले जातात. व्हिडिओ शूट केले जातात. फोटो आणि व्हिडिओ चांगले येण्यासाठी काही टिप्स :

✻ फोटो काढताना किंवा व्हिडिओ रेकॉर्ड करताना मोबाईल फोनच्या मागच्या कॅमेऱ्याचा वापर करा. सेल्फी कॅमेऱ्याच्या तुलनेत मागच्या कॅमेऱ्याचं रेझोल्यूशन जास्त असतं. स्वतःचे व्हिडिओ रेकॉर्ड करण्यासाठी मागचा कॅमेरा वापरा. फ्रंट कॅमेऱ्याने व्हिडिओ रेकॉर्ड करायचा असेल तर लँडस्केप मोडचा वापर करता येईल.

✻ दर्जेदार व्हिडिओ बनवण्यासाठी तो लँडस्केप मोडमध्ये रेकॉर्ड करा. पोर्टेट किंवा इतर मोडमध्ये रेकॉर्ड केलेला व्हिडिओ स्मार्टफोनमध्ये चांगला दिसतो. पण हा व्हिडिओ टीव्ही किंवा कॉम्प्युटरवर बघताना चांगला वाटणार नाही. त्यामुळे व्हिडिओ नेहमी लँडस्केप मोडमध्ये रेकॉर्ड करा.

✻ कॅमेरा हातात धरून रेकॉर्ड करण्यापेक्षा वेगळे अँगल टिपा. काही इफेक्ट्स वापरा. एकाच ठिकाणाहून रेकॉर्ड करू नका. कॅमेरा पुढे मागे करा. क्लोज अप शॉट घ्या. यामुळे तुमच्या व्हिडिओचं खूप कौतुक होईल.

## स्वत:साठी वेळ

ध्यानात घ्या

शाळेत किंवा वर्गात काही मुलं खूप दंगा करतात. वर्गातल्या शांत मुलांना उगाचच त्रास देतात. लहानग्यांची मस्करी करतात. एखाद्याची वही, दप्तर, पेन लपवून ठेवतात. काही मुलं दादागिरी करतात. थोडी धिटुकली मुलं त्यांची शिक्षकांकडे तक्रार करतात. काही मुलं घरी सांगतात. पण घाबरून कोणाला काही न सांगणारीही मुलं असतात. तुम्हाला कोणी त्रास देत असेल तर त्याबद्दल बोलायला हवं. शिक्षकांना, आई-बाबांना सांगायला हवं. मुख्य म्हणजे, यामुळे निराश होऊ नका. प्रत्येक परिस्थितीला सामोरं जायला हवं.



स्वत:कडे अजिबात दुर्लक्ष करू नका. दररोज स्वत:साठी काहीतरी करा. आवडत्या गोष्टींसाठी वेळ द्या. गाणी ऐका, पुस्तकं वाचा. यामुळे तुम्हाला थोडं बरं वाटेल. ताण कमी होईल. उगाचच घरात बसून राहू नका. मैदानी खेळ खेळा, व्यायाम करा. शारीरिक हालचालीमुळे अँडॉर्फिन नावाच्या हार्मोनची निर्मिती होते. या हार्मोनमुळे आनंदी आणि उत्साही वाटू लागतं.

इतर मुलं आपल्याला का त्रास देतात, आपल्यात काही कमी आहे का, असे विचार मनात येतात. कधीकधी खूप निराश वाटतं. अशा वेळी अंगचे चांगले गुण, कौशल्यांचा विचार करा.

### स्मार्ट टिप्स


#### अभ्यास करा हुशारीने!

अभ्यास नेहमीच खूप हुशारीने करायला हवा. फक्त घोकंपट्टी किंवा पाठांतर करून काहीच होणार नाही. अभ्यासातही स्मार्टनेस यायला हवा. यासाठी वर्गात नीट लक्ष द्या. शिक्षक शिकवत असतानाच महत्त्वाचे मुद्दे नोंदवून ठेवा. पुस्तक वाचत असतानाही तुम्ही काही मुद्दे टिपून ठेवू शकता. यामुळे परीक्षेचा अभ्यास करताना तुम्हाला अडचणी येणार नाहीत.



### ट्राय इट

#### गार्लिक ब्रेड स्टीक्स



तुम्ही वेगवेगळे पदार्थ बनवू शकता. असाच एक पदार्थ म्हणजे गार्लिक ब्रेड स्टीक्स. यासाठी सात ते आठ लसूण पाकळ्या सोलून घ्या. थोडी कोथिंबिर, १०० ग्रॅम बटर, एक चमचाभर चिली फ्लॅक्स,आठ ब्रेड स्लाईस, १०० ग्रॅम मॉझरेला चीझ, अर्धा कप उकडलेले स्वीट कॉर्न, दोन हिरव्या मिरच्या हे साहित्य घ्या. लसूण ठेचून किंवा मिक्सरमध्ये वाटून घ्या. त्यात चिरलेली कोथिंबिर, थोडं बटर, चिली फ्लॅक्स घालून नीट मिक्स करा. आता चार ब्रेड स्लाईस घ्या. या स्लाईसच्या एका बाजूला गार्लिक बटर लावून घ्या. त्यावर किसलेलं मॉझरेला चीझ घाला. थोडे मक्याचे दाणे आणि मिरच्यांचे तुकडे घाला. त्यावर दुसरा ब्रेड स्लाईस ठेवा. ब्रेडच्या वरच्या बाजूलाही गार्लिक बटर लावा. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर हे सँडविच ठेवा. दुसऱ्या बाजूलाही बटर लावून घ्या.

### प्राणीजगत

#### उंटांची न्यारी दुनिया



उंट वाळवंटात राहतात. वाळवंटात खूप कमी पाणी असतं. म्हणूनच पाणी सापडल्यावर एक उंट एकाच वेळी ४० गॅलन पाणी पिऊ शकतो. उंट एका तासात ४० मैल अंतर कापू शकतात. उन्हात गेल्यावर आपल्याला घाम येतो. पण सतत कडक उन्हात राहणाऱ्या उंटांना घाम येत नाही. त्यामुळे त्यांना सारखी तहान लागत नाही. उंटांच्या शरीराचं तापमान १०६ फॅरनहिटवर गेल्यानंतर त्यांना घाम यायला सुरुवात होते.

### योगा टाइम

#### तंदुरुस्तीवर्धक अर्धचंद्रासन!



योगासनांचे बरेच प्रकार आहेत. प्रत्येक योगासनामुळे वेगळे लाभ होतात. काही योगासनांमध्ये उंची वाढायला मदत होते तर काही योगासनं केल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. तुम्हाला तंदुरुस्त रहायचं असेल तर अर्ध चंद्रासन करता येईल. अर्ध चंद्रासन थोडं कठीण आहे. पण सरावाने ते सहज जमेल. मग अर्ध चंद्रासन नक्की शिकून घ्या.

## निवडक




### भारतीय संघ पुन्हा अव्वल

**नवी दिल्ली :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने पुरुष एकदिवसीय क्रमवारी जारी केली आहे. भारतीय क्रिकेट संघाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व कायम ठेवत पुरुष वनडे संघ क्रमवारीत अव्वल स्थान कायम राखले आहे. आयसीसी क्रमवारीत भारतीय संघाचे ११८ रेटिंग गुण आहेत. तर, न्युझीलंड ११३ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयसीसीच्या वार्षिक अपडेटनंतरही भारतीय संघ आयसीसी वनडे क्रिकेटमधील आपली बादशाही कायम राखली आहे. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियासारखे बलाढ्य संघ पाठलाग करत असले तरी भारत अजूनही शिखरावर विराजमान आहे. त्यामुळे आगामी मालिकांमध्ये हे स्थान टिकवून ठेवण्यासाठी भारतीय संघासमोर मोठे आव्हान असणार आहे. वार्षिक अपडेटनंतर भारताच्या रेटिंगमध्ये एका गुणाची घट झाली असली तरी त्यांचे अव्वल स्थान कायम आहे. दुसरीकडे न्यूझीलंडने दोन गुणांची वाढ नोंदवत ११३ गुणांसह दुसरे स्थान मजबूत केले आहे. गतविजेता ऑस्ट्रेलिया १०९ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर कायम आहे. टॉप १० एकदिवसीय संघ
भारत ११८ रेटिंग गुण, न्युझीलंड ११३ रेटिंग गुण, ऑस्ट्रेलिया १०३ रेटिंग गुण, दक्षिण आफ्रिका १०२ रेटिंग गुण, पाकिस्तान - १०० रेटिंग गुण, श्रीलंका ९६ रेटिंग गुण, अफगाणिस्तान ९३ रेटिंग गुण, इंग्लंड ८९ रेटिंग गुण, बांगलादेश ८६ रेटिंग गुण आहेत.

### आयसीसी विश्वचषक रंगणार तीन देशात

**नवी दिल्ली :** क्रिकेट जगतातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठेची स्पर्धा म्हणजेच 'आयसीसी एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक'च्या तारखां जाहीर झाल्या आहेत. हा महासंग्राम दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामीबिया या तीन देशांच्या संयुक्त यजमानपदाखाली खेळवला जाणार आहे. आयसीसी एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक २०२७ मध्ये होणार आहे. मात्र, त्याच्या तारखा अद्याप समोर आल्या नव्हत्या. दरम्यान आयसीसी एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक ४ ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबर या कालावधीत होण्याची शक्यता आहे. लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. तीन देशांमध्ये हा विश्वचषक होणार असला तरी सर्वाधिक वाटा हा दक्षिण आफ्रिकेचा असणार आहे. ५४ पैकी ४१ सामने एकट्या दक्षिण आफ्रिकेत होणार आहेत. झिम्बाब्वेमध्ये ८ ते १० सामने होऊ शकतात. तर तब्बल २४ वर्षांनी आफ्रिका खंडात पुरुष एकदिवसीय विश्व चषकाचे आयोजन करण्यात येणार आहे.








### सुदेशना ठरली वेगवान धावपटू

**सातारा :** कसल्याच सुविधा नसताना मातीच्या ट्रॅकवर सराव करून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदकांवर स्वतःचे नाव कोरणारी साताऱ्याची सुदेशना शिवणकर देशातील सर्वात वेगवान धावपटू ठरली आहे. अवघ्या ११.५६ सेकंदांची विक्रमी वेळ नोंदवत १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिनं सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीने संपूर्ण देशाचे लक्ष तिनं वेधून घेतले आहे. मैदानावर पळता पळता सुदेशनाने दम्याच्या आजारालादेखील पळवून लावले आहे. आता ती पूर्पपणे तंदुरुस्त असून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा फडकवण्याचे सुदेशनाचे स्वप्न आहे. सातारा जिल्ह्यातील खर्शी या छोट्याशा गावातील सुदेशना शिवणकर ही शाळेत खेळकर मुलगी होती. वयाच्या १२ व्या वर्षापासून ती धावण्याच्या स्पर्धेत भाग घ्यायला लागली. सुरूवातीला तिला यश मिळाले नाही. त्यामुळे दोन-तीन वेळा ती निराश झाली होती. परंतु, २०१८ मध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेत धावताना तिला तत्कालीन क्रीडा अधिकारी बळवंत बाबर यांनी पाहिले. त्यांनी सुदेशनाकडून मातीच्या ट्रॅकवर सराव करून घेत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये चमकवले.

### निखिलची ऑस्ट्रेलिया संघात निवड

**नवी दिल्ली :** बांगलादेश दौऱ्यावर असलेल्या ऑस्ट्रेलियन संघात एक मोठा बदल करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाने दिल्लीत जन्मलेल्या निखिल चौधरीला ट्रॅव्हिस हेडचा बदली खेळाडू म्हणून टी-२० संघात स्थान दिले आहे. निखिल चौधरीला बांगलादेशविरुद्ध पदार्पण करण्याची संधी मिळाली, तर ६० पेक्षा जास्त वर्षांनंतर ऑस्ट्रेलियासाठी खेळणारा तो पहिला भारतीय वंशाचा खेळाडू ठरू शकतो. सध्या ऑस्ट्रेलिया आणि बांगलादेश दरम्यान ३ सामन्यांची वनडे मालिका खेळवली जात आहे. यानंतर, १७ जूनपासून ३ सामन्यांच्या टी-२० मालिकेला सुरुवात होणार आहे. ट्रॅव्हिस हेड वैयक्तीक कारणांमुळे रजेवर असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी अंतिम अकरा खेळाडूंच्या संघात निखिलची निवड झाली, तर १९६४ मधील लेग-स्पिनर रेक्स सेलर्सनंतर ऑस्ट्रेलियाकडून खेळणारा चौधरी हा भारतात जन्मलेला पहिलाच क्रिकेटपटू ठरणार आहे. लेग-स्पिनर रेक्स सेलर्स यांनी १९६४ ची कोलकाता कसोटी खेळली होती. त्यानंतर एकाही भारतीय वंशाच्या खेळाडूला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य राष्ट्रीय संघात स्थान मिळालेले नाही.




# फिफा विश्वचषकाचे भव्य उद्घाटन

- मेक्सिकोचा दक्षिण आफ्रिकेवर विजय
- दुसऱ्या सामन्यात चेकियाचा पराभव

**। मेक्सिको । वृत्तसंस्था ।**


फिफा विश्वचषक २०२६ ची सुरुवात एका भव्य आणि आकर्षक उद्घाटन सोहळ्याने झाली, ज्याने जगभरातील फुटबॉल चाहत्यांना मंत्रमुग्ध केले. संगीत, रोषणाई आणि नेत्रदीपक आतषबाजीनं सजलेल्या या सोहळ्यात लोकप्रिय बँड माना, लॅटिन पॉप स्टार बेलिंडा, कोलंबियन गायक जे बाल्विन, जागतिक पॉप आयकॉन शकीरा आणि नायजेरियन कलाकार बर्ना बॉय यांनी दमदार सादरीकरण केले

सह-यजमान मेक्सिकोने फिफा विश्वचषक २०२६ च्या उद्घाटन सामन्यात दक्षिण आफ्रिकेला २-० ने पराभूत करुन उत्कृष्ट कामगिरी केली. मेक्सिको सिटी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, यजमानांनी ज्युलियन क्विनोनेस आणि राऊल जिमेनेझ यांच्या गोलच्या जोरावर विजयासह आपल्या मोहिमेची सुरुवात करत, सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवले. तर दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात दक्षिण कोरियाने चेकियाला २-१ ने पराभूत करत मोहिमेची विजयी सुरुवात केली.

मेक्सिकोने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला आणि नवव्या मिनिटाला त्याचे फळ मिळवले. ज्युलियन क्विनोनेसने आफ्रिकेचा बचाव भेदून एक शानदार गोल केला आणि संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. सुरुवातीलाच एक गोल करुनही, मेक्सिकोने सामन्यावर नियंत्रण ठेवलं आणि प्रतिस्पर्ध्यावर दबाव कायम ठेवला.

१७ व्या मिनिटाला टेबोहो मोकोएनाला फाऊल केल्याबद्दल आफ्रिकेला पहिला धक्क बसला. यानंतर, खेळाडूंना विश्रांती देण्यासाठी २५ व्या मिनिटाला स्पर्धेतील पहिला हायड्रेशन ब्रेक घेण्यात आला. पहिल्या हाफच्या अखेरपर्यंत आफ्रिकेला प्रभावी प्रत्युत्तर देता आले नाही.

इंज्युरी टाइममध्ये मेक्सिकोलाही धक्का बसला. अंतिम शिट्टी वाजताच मेक्सिकोने २-० असा दणदणीत विजय मिळवला विजयी सुरुवात केली.




### दक्षिण कोरियाचा विजय

**दक्षिण कोरियाने पिछाडीवरून जोरदार पुनरागमन करत चेकियाला २-१ ने पराभूत केले आणि फिफा विश्वचषकात विजयी सुरुवात केली. दक्षिण कोरिया आणि चेकिया यांच्यातील सामना अत्यंत रोमांचक होता. पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांनी एकही गोल केला नाही, परंतु दुसऱ्या हाफमध्ये एकूण तीन गोल झाले, ज्यामुळे दक्षिण कोरियाला आघाडी घेता आली. चेकियाने ५९व्या मिनिटाला गोल करुन १-० अशी आघाडी घेतली. लादिस्लाव क्रेजीनं चेकियासाठी पहिला गोल केला. मात्र, दक्षिण कोरियाला रोखणे अशक्य होते आणि ६७व्या मिनिटाला हाँग इन-बॉमनं बरोबरी साधली. त्यानंतर ओ ह्योन-ग्यूनं दक्षिण कोरियासाठी दुसरा गोल करुन २-१ अशी आघाडी घेतली. चेक संघ शेवटपर्यंत ही आघाडी कमी करु शकला नाही परिणामी त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.**




## कोल्हापुरात मेस्सी,रोनाल्डोचे फ्लेक्स

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

देशभरात विविध क्रिकेट स्पर्धांदरम्यान क्रिकेटप्रेमींचा नेहमीच उत्साह दिसून येतो. क्वचितच इतर क्रीडा स्पर्धांबाबत क्रीडाप्रेमींची उत्सुकता आणि उत्साह दिसून येतो. मात्र, कोल्हापूर शहर त्याला अपवाद आहे. फुटबॉलची विश्वचषक आजपासून सुरू होत असताना शहरातील फुटबॉलप्रेमींचा उत्साह दिसून आला.

चार वर्षांनी येणारा फुटबॉलचा महाकुंभ फिफा विश्वचषक स्पर्धा आजपासून अमेरिका, मेक्सिको, कॅनडा या देशांमध्ये खेळवली जाणार आहे. तब्बल ४८ देश, १०४ सामने या स्पर्धेदरम्यान खेळले जाणार आहेत. यासाठी जगभरातील फुटबॉल शौकिनांमध्ये उत्साहवर्धक वातावरण पाहायला मिळत आहे. कोल्हापुरातही मंगळवार पेठ, शिवाजी पेठ, जुना बुधवार पेठ या पारंपारिक पेठांमधील फुटबॉल प्रेमी विश्वचषकासाठी सज्ज झाले आहेत.

कोल्हापुरातील मंगळवार पेठेत असणाऱ्या गुलाब गल्लीत चॅलेंज ग्रुपच्या सदस्यांनी संपूर्ण गल्लीत प्रत्येक देशाचे झेंडे आणि फुटबॉल खेळाडूंचा फोटो पताका करून गल्लीला सजावट केली आहे. फुटबॉल विश्वचषक जरी प्रत्यक्ष पाहायची संधी मिळत नसली तरी मनमुराद फुटबॉल प्रेम करून आपल्या आवडत्या खेळाडूला क्रीडा नगरी कोल्हापुरातून आम्ही पाठिंबा देत आहेत.

कोल्हापुरातील शाहू स्टेडियमवर ऑक्टोबर, नोव्हेंबरपासून दरवर्षीचा फुटबॉल हंगाम सुरू होतो. यासाठी कोल्हापूर शहरातील तालमी आणि पेठांचे संघ सहभागी होतात. हे सामने पाहण्यासाठी लक्षणीय गर्दी स्टेडियमवर पाहायला मिळते. यासोबतच पेठमध्ये जगभरातील अनेक देशांच्या प्रसिद्ध खेळाडूंचे फॅन्स क्लब आहेत.

## जसपाल राणा यांचे निधन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचे प्रसिद्ध नेमबाज आणि ऑलिम्पिक पदक विजेते प्रशिक्षक जसपाल राणा यांचे ४९ व्या वर्षी निधन झाले आहे. भारतीय राष्ट्रीय रायफल संघटनेने त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे. जसपाल राणा हे भारताचे अत्यंत यशस्वी नेमबाज होते. त्यांनी १९९४ च्या हिरोशिमा आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत तब्बल १५ पदके (९ सुवर्ण, ४ रौप्य, २ कांस्य) जिंकली आहेत. .ते सध्या भारतीय पिस्तूल नेमबाजांचे हाय-परफॉर्मन्स कोच म्हणून काम करत होते. त्यांनी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर हिच्यासह सौरभ चौधरी, अनिश भानवाला आणि चिंकी यादव अशा अनेक युवा खेळाडूंना उत्तम प्रकारे घडवले होते. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी त्यांना १९९४ मध्ये अर्जुन पुरस्कार आणि



## शिवम दुबेचा झंझावात : आर्क्स अंधेरीची फायनलमध्ये धडक

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात कर्णधार शिवम दुबेने आपल्या नेतृत्वाला साजेशी खेळी करत आर्क्स अंधेरी संघाला मुंबई टी-२० लीग२०२६ च्या अंतिम फेरीत पोहोचवले. आकाश टायगर्स मुंबई वेस्टर्न सबर्क्सविरुद्ध झालेल्या या अटीतटीच्या सामन्यात अंधेरीने ५ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. गोलंदाजांच्या शिस्तबद्ध कामगिरीमुळे आकाश टायगर्सला १५० धावावर रोखल्यानंतर, अंधेरीने दुबेच्या स्फोटक सावरण्याचा प्रयत्न केला, पण शम्स मुलाणीने लागोपाठ दोन धक्के देत टायगर्सला सामन्यात परत आणले. पाठोपाठ अजित यादवने १३ व्या षटकात प्रसाद पवार (२६) आणि प्रग्नेश कानपिल्लेवार (१८) या दोघांना बाद केल्यामुळे अंधेरीची अवस्था ५ बाद ९२ अशी बिकट झाली होती. मात्र, कठीण प्रसंगी कर्णधार शिवम दुबेने सामन्याची सूत्रे हाती घेत अवघ्या २६ चेंडूत ५ षटकार आणि १ चौकारासह नाबाद ४५ धावा ठोकल्या. त्याने गौरव जठारसोबत (नाबाद ११) ५९ धावांची अभेद्य भागीदारी करत संघाला दिमाखात फायनलचे तिकीट मिळवून दिले. तत्पूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या आकाश टायगर्सची सुरुवात वेगवान झाली. कर्णधार सरफराज खानने १७ चेंडूत ३४ धावा तर सलामीवीर जय बिस्ताने ३५ धावा केल्या. मात्र, मधल्या फळीत ठराविक अंतराने विकेट्स गेल्यामुळे टायगर्सला मोठी धावसंख्या उभारता आली नाही आणि त्यांचा डाव २० षटकांत ७ बाद १५० धावांवर मर्यादित राहिला. अंधेरीकडून आशुतोष घागरेने २१ धावांत २ बळी घेतले, तर अर्जुन, शिवम, अजय मिश्रा, मुशीर आणि प्रसून सिंग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. आता शनिवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात अंधेरीचा सामना नॉर्थ मुंबई पँथर्स आणि एमएससी मराठा रॉयल्स यांच्यातील दुसऱ्या उपांत्य फेरीच्या विजेत्याशी होईल.



## वैभवचे भारताकडून पदार्पण लांबणीवर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

युवा सुपरस्टार वैभव सूर्यवंशी, सध्या भारत 'अ' संघाकडून मैदान गाजवत आहे. भारताच्या आगामी आयर्लंड व इंग्लंड दौऱ्यासाठी वैभवची निवड झाली आहे आणि त्यामुळे सीनियर संघाकडून त्याच्या पदार्पणाची सर्वांना प्रतीक्षा आहे. पण, वैभवचे पदार्पण लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण बेलफास्टमध्ये सुरू असलेल्या नागरी अशांततेमुळे भारताच्या आगामी आयर्लंड दौऱ्यावर अनिश्चिततेचे सावट आहे. त्यामुळे ही मालिका रद्द होण्याची चर्चा सुरू आहे.

आयर्लंड येथे या महिन्याच्या अखेरीस दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका आयोजित होणार आहे. पण, नागरी अशांततेमुळे या मालिकेवर संकट निर्माण झाले आहे. शहरात झालेल्या एका क्रूर चाकू हल्ल्याच्या घटनेनंतर, गेल्या काही दिवसांत बेलफास्टमध्ये तीव्र नागरी अशांतता आणि स्थलांतरितांविरोधी हिंसक दंगली उसळल्या आहेत. या गोंधळामुळे मोठ्या प्रमाणावर व्यत्यय निर्माण झाला असून सार्वजनिक सुरक्षेबद्दलची चिंता वाढली आहे.

क्रिकेट आयर्लंड सर्व उपलब्ध पर्यायांचा आढावा घेत आहे. सुरक्षेची चिंता कायम राहिल्यास सामने बेलफास्टहून डब्लिनला हलवण्याचा एक पर्याय विचाराधीन आहे. याबाबत बीसीसीआयकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. ही मालिका रद्द झाल्यास वैभवचे पदार्पण लांबणीवर पडू शकते.






## वाईत रंगला 'मैत्री चषक'

**। वाई । प्रतिनिधी ।**

सातारा जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली शिवशक्ती क्रीडा मंडळ आणि अंबिका स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'मैत्री चषक' या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मोरगिरी येथील मोरणा विद्यालयाच्या मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत ४० वर्षे व त्यापुढील वयाच्या जिल्ह्यातील अनेक माजी आणि दिग्गज खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या चुरशीच्या स्पर्धेत पाचगणीच्या स्थानिक व्यायाम मंडळाच्या संघाने आपल्या बहारदार आणि अनुभवाच्या जोरावर अटीतटीच्या लढतीत तृतीय क्रमांक पटकावून पाचगणीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे जिल्ह्यातील जुन्या जाणत्या कबड्डी पटूंना पुन्हा एकदा मैदानावर उतरून आपला दम दाखवण्याची संधी मिळाली, ज्यामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. वाढत्या वयातही खेळाडूंचा शारीरिक आणि मानसिक फिटनेस पाहून उपस्थित तरुण वर्ग कमालीचा प्रोत्साहित झाला.

या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या पाचगणीच्या व्यायाम मंडळाच्या संघात संतोष गोळे, संदेश कासुर्डे, रवी गोळे, राजू काकडे, दीपक पारठे, शशिकांत भिलारे, राजू दुधाने, अमोल कळंबे, जाधव आणि संजय राजपुरे या कसलेल्या खेळाडूंचा समावेश होता.

## विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहरातील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयांतर्गत असलेले जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, कुस्ती आणि जिम्नॅस्टिक्ससाठी उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करत आहे. तळागाळातील क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन देणे आणि योग्य मार्गदर्शन करणे हा या विशेष उपक्रमाचा उद्देश आहे. मुंबई शहर जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि खाजगी क्रीडा क्लबमधील खेळाडूंना या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन मोठ्या संख्येने शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.



मुंबई प्रशासनाने दोन्ही खेळांसाठी वेगवेगळ्या तारखांना आणि ठिकाणी प्रशिक्षणाची व्यवस्था केली आहे. जिम्नॅस्टिक्स प्रशिक्षण शिबिर ९ जून ते १८ जून २०२६ या कालावधीत होणार आहे. यासाठी मुंबईतील वडाळा येथील बीपीसीए कॉलेजला प्रशिक्षण केंद्र म्हणून निश्चित करण्यात आले आहे.


कुस्ती प्रशिक्षण शिबिर १५ जून ते २४ जून २०२६ या कालावधीत माटुंगा येथील लाल बहादूर शास्त्री व्यायामशाळेत आयोजित केले जाईल. तुम्हाला किंवा तुमच्या मुलांना या उन्हाळी शिबिरात सहभागी व्हायचे असल्यास, अधिक माहिती आणि नोंदणीसाठी तुम्ही क्रीडा विभागाने दिलेल्या या क्रमांकांवर थेट संपर्क साधू शकता. सहभागी खेळाडूंकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. इतकेच नव्हे तर, क्रीडा विभागाने शिबिरात सहभागी होणाऱ्या सर्व उत्साही खेळाडूंसाठी मोफत नाश्त्याचीही व्यवस्था केली आहे.

**१७ जूनला होणार खेळाडूंची निवड चाचणी | पात्र खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन**

## अमरावतीत कुस्तीसाठी क्रीडा निपुणता केंद्र

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत कुस्ती या क्रीडा प्रकारासाठी विभागीय क्रीडा निपुणता केंद्राची स्थापना अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुलात करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणी १७ जून २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता मोर्शी येथील उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी या निवड प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती विभागाचे उपसंचालक (क्रीडा व युवक सेवा) गणेश जाधव यांनी केले आहे.



या केंद्रामध्ये निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार आणि तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश-विदेशातील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागाची संधी; तसेच वैद्यकीय विमा संरक्षण अशा विविध सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

निवड चाचणीसाठी २५ वर्षांखालील मुले व मुली पात्र असून, त्यांनी जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, शाळा किंवा महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र तसेच पालकांचे संमतीपत्र यांसह उपस्थित राहावे, असही कळविण्यात आले आहे.

राज्यस्तरीय पदक विजेते अथवा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंच्या मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. त्यांना क्रीडा कौशल्य व शारीरिक तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र ठरणे आवश्यक राहील; तसेच शासनमान्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. संजय तिरथकर (९४२२८३८२३७), डॉ. रणवीरसिंग राहल - कुस्ती (७०२०४९१०४५), अनिल इंगळे (९९७००७११७२) किंवा अनुप वानखेडे (९८८१९८०२८२) यांच्याशी संपर्क साधावा, असेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)